
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, १४ फेब्रुवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ९८ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### सलग सातव्या दिवशी बाजारात घसरण

**मुंबई** : देशांतर्गत शेअर बाजारांतील घसरण गुरुवारीही सुरूच होती. सुरुवातीच्या व्यवहारात चांगली तेजी असूनही बाजार सलग सातव्या दिवशी घसरणीसह बंद झाला. ३० शेअर्सवर आधारित मुंबई बाजाराचा निर्देशांक अवघ्या ३२ अंकांनी, तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १४ अंकांनी खाली आला. मुंबई बाजारातील ३० पैकी १६ शेअर्स तेजीत होते. टाटा स्टील, बजाज फिनसर्व्ह, बजाज फायनान्स आणि कोटक महिंद्राचे शेअर्स वधारले होते. सर्वाधिक ३ टक्के वाढ सन फार्माच्या शेअर्समध्ये दिसून आले. याउलट, अदानी पोर्ट्स, इन्फोसिस, टीसीएस, एसबीआय आणि नेस्ले इंडियाच्या शेअर्समध्ये घसरण दिसून आली.



### व्हीआयची ५-जी सेवा पुढील महिन्यापासून

**नवी दिल्ली** : भारतीय टेलिकॉम कंपनी व्होडाफोन-आयडिया लिमिटेडने ५-जी रोलआऊट स्ट्रॅटेजीला मंजुरी दिली आहे. त्यामुळे येत्या मार्चपासून कंपनीच्या ग्राहकांना ५-जी सेवा मिळू शकणार आहे. मार्च महिन्यात मुंबईत याचे व्यावसायिक लाँचिंग होणार असून, त्यानंतर एप्रिलमध्ये दिल्ली, बंगळुरू, चंदीगड आणि पाटणा येथे व्हीआयची ५-जी सेवा उपलब्ध होईल. सोबतच कंपनी ४-जी नेटवर्कचा विस्तार करण्यावरही लक्ष केंद्रित करणार आहे.

### सत्येंद्र दास यांना शरयूत जलसमाधी

**अयोध्या** : रामललाचे मुख्य पुजारी सत्येंद्र दास यांना गुरुवारी शरयू नदीत जलसमाधी देण्यात आली. त्यांचे पार्थिव अयोध्येच्या रामघाटावरील आश्रमात दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. त्यानंतर त्यांना दुपारी शरयूत जलसमाधी देण्यात आली. सत्येंद्र दास यांनी सुमारे ३३ वर्षे राममंदिराची सेवा केली. १ मार्च १९९२ रोजी सत्येंद्र दास यांची नियुक्ती भाजपा खासदार विनय कटियार, विहिंप नेते अशोक सिंघल यांच्या संमतीने करण्यात आली.

### ३१ मार्चला बँका सुरू राहणार

**नवी दिल्ली** : भारतीय रिझर्व्ह बँकेने सरकारी व्यवहार करणाऱ्या सर्व बँकांना ३१ मार्च २०२५ रोजी बँका सुरू ठेवण्याचा निर्देश दिला आहे. ३१ मार्च रोजी ईद उल फित्र (रमजान ईद) असल्याने यादिवशी सार्वजनिक सुटी असते. पण, आर्थिक व्यवहारातील गोंधळ टाळण्यासाठी रिझर्व्ह बँकेने हा निर्णय घेतला आहे. रमजान ईद निमित्त हिमाचल प्रदेश आणि मिझोराम वगळता सर्व राज्यांमध्ये ३१ मार्च रोजी बँक हॉलिडे जाहीर करण्यात आला होता. ३१ मार्च २०२५ रोजी संपणाऱ्या २०२४-२५ या आर्थिक वर्षात पावत्या आणि देयकांसह सर्व सरकारशी संबंधित आर्थिक व्यवहारांचा योग्य हिशेब करण्यासाठी या दिवसाची सुटी रद्द करण्यात आली आहे. ३१ मार्च रोजी सरकारचे आर्थिक वर्ष संपते. म्हणजेच सरकारी महसूल, देयके आणि सेटलमेंटशी संबंधित सर्व व्यवहार नवीन आर्थिक वर्ष सुरू होण्यापूर्वी करणे आवश्यक असते. ३१ मार्च २०२५ रोजी प्राप्तिकर, जीएसटी, सीमाशुल्क आदी सार्वजनिक व्यवहार सुरू राहणार आहेत.

# मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू

## मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर केंद्राचा निर्णय



**नवी दिल्ली/इम्फाळ, १३ फेब्रुवारी**

गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने हिंसाचाराचा सामना करीत असलेल्या मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे. मैतेई आणि कुकी समुदायांमधील हिंसाचारामुळे मणिपूरमधील कायदा आणि सुव्यवस्थेची गंभीर स्थिती निर्माण झाली आहे. सातत्याने प्रयत्न करूनही ही परिस्थिती आटोक्यात आणता आलेली नाही. त्यानंतर आता केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले आहे.

मणिपूरमध्ये २१ महिन्यांपासून सुरू असलेल्या जातीय हिंसाचारामुळे ३०० जणांचा मृत्यू झाला आहे. यामुळेच एन. बिरेनसिंह यांच्यावर मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्यासाठी खूप दबाव होता. विरोधी पक्षानेही या मुद्यावरून भाजपाला धारेवर धरले होते. काही दिवसांपूर्वीच बिरेनसिंह यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा राज्यपालांना सोपवला होता. त्यानंतर मुख्यमंत्रिपदासाठी नव्या चेहऱ्याचा शोध असल्याचे बोलले जात होते. मात्र, स्थिती स्पष्ट न झाल्याने बुधवारी सायंकाळपासूनच राज्यात राष्ट्रपती शासन लागू होण्याची शक्यता वर्तवली जात होती.

एन. बिरेनसिंह यांनी राजीनामा दिल्यानंतर चार दिवसांतच राज्यात राजकीय अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले होते आणि सत्तारूढ भाजपानेही मुख्यमंत्रिपदासाठी कोणत्याही नेत्याचे नाव निश्चित केले नव्हते. (वृत्तसंस्था)

### का लागली राष्ट्रपती राजवट?

घटनेच्या कलम १७४(१) नुसार, कोणत्याही राज्याच्या विधानसभेच्या सत्राची अंतिम बैठक सहा महिन्यांच्या आत बोलावणे गरजेचे असते. मणिपूरमध्ये विधानसभेची शेवटची बैठक १२ ऑगस्ट २०२४ रोजी झाली होती. यासाठी नव्या सत्रासाठीची मुदत बुधवारी संपली. बिरेनसिंह यांनी राजीनामा देताच राज्यपाल अजय भल्ला यांनी सोमवारपासून सुरू होणारे अर्थसंकल्पीय अधिवेशन सत्र रद्द केले होते.

### हिंसाचाराची स्थिती कायमच

दरम्यान, ३ मे २०२३ पासून मणिपूरमधील कुकी-मैतेई समुदायामध्ये हिंसाचार सुरू आहे. मैतेई-कुकी समुदायामध्ये सुरू झालेल्या हिंसाचाराला ६०० पेक्षा अधिक दिवस उलटून गेले आहेत. मात्र, अद्याप तो कायम आहे. मणिपूरमध्ये मे २०२३ ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीत गोळीबाराच्या ४०८ घटनांची नोंद झाली आहे. नोव्हेंबर २०२३ ते एप्रिल २०२४ पर्यंत ३४५ गोळीबाराच्या घटना घडल्या.

### दलाई लामांना मिळणार झेड श्रेणीची सुरक्षा

**नवी दिल्ली, १३ फेब्रुवारी**

बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांना आता झेड श्रेणीची सीआरपीएफ सुरक्षा मिळणार आहे. आयबीच्या अहवालानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाने हा निर्णय घेतला आहे.

गुप्तचर विभागाने गृह मंत्रालयाला एक अहवाल सादर केला होता. यामध्ये दलाई लामा यांना धोका असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती.

१९३५ मध्ये ल्हामो थोंडुप यांचा जन्म झालेल्या दलाई लामा दोन वर्षांचे असतानापासून तिबेटी आध्यात्मिक नेते म्हणून त्यांच्या पूर्वसुरींचा पुनर्जन्म मानले जाते. १९४० मध्ये तिबेटची राजधानी ल्हासा येथे त्यांना १४ वे दलाई लामा म्हणून तिबेटी आध्यात्मिक नेते म्हणून मान्यता देण्यात आली. (वृत्तसंस्था)



फ्रान्स येथून अमेरिकेच्या वॉशिंग्टन डीसी येथे पोहोचल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत करण्यात आले

# अंगणवाडी सेविका-मदतनीसांची १८,८८२ पदे भरणार

### आदिती तटकरे यांची माहिती

**मुंबई, १३ फेब्रुवारी**

महिला व बालविकास विभागाच्या अंतर्गत एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविकांची ५,६३९ व मदतनीसांची १३,२४३ अशी एकूण १८, ८८२ पदे भरण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी गुरुवारी दिली. १४ फेब्रुवारी ते २ मार्च या कालावधीत मुख्यसेविका या पदाची सरळसेवा व निवडीद्वारे ३७४ पदभरतीची परीक्षा होणार आहे. सरळसेवेने ८०, तर निवडीद्वारे १०० टक्के पदे भरली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महिला सहकारी संस्था, महिला बचत गट, महिला मंडळ व अंगणवाडीबाबतच्या विविध प्रश्नांबाबत तसेच कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या पदभरतीसंदर्भात मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी मंत्री तटकरे यांनी सर्व कामांचा आणि पदभरतीसंदर्भात आढावा घेतला आणि राज्य शासन ७५ हजार पदभरती करणार आहे यापैकी १८ हजारांपेक्षा जास्त पदभरती महिला बाल विकास विभाग करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

महिला बचत गटांनी एकत्रितरीत्या पोषण आहारासाठी आदर्श कम्युनिटी किचन करावे, यासाठी सर्वोतोपरी निधी उपलब्ध करून दिला जाईल. पुरक पोषण आहार बंद केलेला पुरवठा त्वरित सुरू करण्यात यावा. आहारासाठी प्रत्येक लाभार्थीची रक्कम वाढविण्यात यावी. अंगणवाडी आहार पुरवठ्याच्या कामासाठी एका संस्थेला पाच अंगणवाड्या दिल्या जातात. लाभार्थी महिला विकास संस्थेच्या कामाच्या अहवालानंतर अंगणवाड्यांची संख्या वाढविणे अथवा कमी करणेबाबत निर्णय घेण्यात येईल. (तभा वृत्तसेवा)

# नवीन आयकर दुरुस्ती विधेयक लोकसभेत सादर

● संसदीय स्थायी समितीकडे व्यापक चर्चेसाठी पाठवले

**नवी दिल्ली, १३ फेब्रुवारी**

संपूर्ण देशाचे लक्ष लागलेले नवीन आयकर दुरुस्ती विधेयक गुरुवारी लोकसभेत सादर करण्यात आले. वक्फ दुरुस्ती विधेयकावरून लोकसभेत गदारोळ सुरू असताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी नवीन आयकर कायद्यासंदर्भातील विधेयक सभागृहात सादर केले.

व्यापक चर्चेसाठी हे विधेयक संसदेच्या स्थायी समितीकडे पाठवण्याची शिफारसही त्यांनी केली. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला या समितीतील सदस्यांची नावे लवकरच जाहीर करतील. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात या समितीला आपला अहवाल सादर करायचा आहे. निर्मला सीतारामन यांनी संसदेत अर्थसंकल्प सादर करताना नवीन आयकर कायद्याचे सुतोवाच केले होते.

नवीन आयकर कायदा १९६१ च्या आयकर कायद्याची जागा घेणार आहे. या विधेयकाचा मसुदा बुधवारी प्रकाशित करण्यात आला होता. करप्रणाली अधिक सुलभ बनवण्यासाठी तिचे डिजिटलीकरण करणे, कररचनेत सुधारणा करणे तसेच करचोरीच्या घटना रोखण्यासाठी व्यापक तरतुदी नव्या आयकर कायद्यात राहणार आह

### वक्फवरील 'जेपीसी'चा अहवाल संसदेत सादर

**नवी दिल्ली** : वक्फ दुरुस्ती विधेयकावरील संयुक्त सांसदीय समितीचा (जेपीसी) अहवाल गुरुवारी संसदेच्या दोन्ही सभागृहांत सादर करण्यात आला. लोकसभेत हा अहवाल जेपीसीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी, तर राज्यसभेत समितीच्या सदस्य मेधा कुलकर्णी यांनी सादर केला. पाल यांनी हा अहवाल लोकसभेत सादर करताच प्रचंड गदारोळ झाला. विरोधी सदस्यांनी अध्यक्षांसमोरील मोकळ्या जागेत धाव घेत घोषणाबाजी केली. जेपीसीच्या अहवालात विरोधी पक्षांच्या प्रतिकूल मतांना स्थान देण्यात आले नाही तसेच हा अहवाल पूर्णपणे एकतर्फी असल्याचा विरोधकांचा आरोप होता. नियमानुसार विरोधकांच्या आक्षेपांना समितीच्या अहवालात तुम्ही स्थान दिल्यास त्याला आमची हरकत राहणार नाही, असे गृहमंत्री शाह यांनी स्पष्ट केले.

# काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी हर्षवर्धन सपकाळ

● विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी विजय वडेट्टीवार

**नवी दिल्ली, १३ फेब्रुवारी,**

बुलढाण्याचे माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे नवे अध्यक्ष म्हणून नाना पटोले यांच्या जागेवर निवड झाली आहे. विजय वडेट्टीवार यांच्याकडे काँग्रेस विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदाची जबाबदारी काँग्रेसचे महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी सोपविली.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचा दारुण पराभव झाल्यानंतर नाना पटोले यांना प्रदेश अध्यक्षपदावरुन हटवले जाईल, अशी चर्चा सुरू झाली होती. काही दिवसांपूर्वी पटोले यांनी दिल्ली येथे पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाची भेट घेतल्यानंतर या चर्चे ला बळ मिळाले. या भेटीत पटोले यांनी अध्यक्षपदचा राजीनामाही दिला होता, असे म्हणतात. नाना पटोले यांचा प्रदेश अध्यक्षपदाचा राजीनामा मान्य करत काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी गुरुवारी महाराष्ट्राचे नवे अध्यक्ष म्हणून हर्षवर्धन सपकाळ यांची नियुक्ती केली. तरुण वयापासूनच ते गाडगे महाराज, तुकडोजी महाराज व गांधीवादी सर्वोदयी कार्यकर्ता म्हणून परिचित आहेत. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस संलग्नित राजीव गांधी पंचायत राज संघटनचे विद्यमान अध्यक्ष आहेत. भारतीय राष्ट्रीय विद्यार्थी संघटना (NSUI) च्या माध्यमातून राजकीय जीवनात सक्रीय झाले.






# उजनी धरणातील वाळू माफियांना दणका

## १३ बोटी बुडवून नष्ट; सोलापूर, इंदापूर प्रशासनाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १३ फेब्रुवारी-**

उजनी जलाशयात इंदापूर तालुक्यातील माळवाडी जॅकवेल ते करमाळा तालुक्यातील बिटरगाव, वांगी येथे पाठलाग करून वाळू माफियांच्या १३ बोटी पकडल्या. त्या सर्व बोटी बुडवून नष्ट केल्या. माळवाडी जॅकवेलजवळ तीन सेक्शन बोट पकडून कारवाई करण्यात आली.

ही कामगिरी गुरुवारी पुणे व सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या मदतीने महसूल उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर, इंदापूरचे तहसीलदार जीवन बनसोडे, सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाचे सामान्य प्रशासन तहसीलदार श्रीकांत पाटीलव, इंदापूरचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांच्या नेतृत्त्वाखाली महसूल व पोलीस प्रशासनाने केली. या कारवाईमध्ये इंदापूरचे निवासी नायब तहसीलदार अविनाश डोईफोडे, करमाळ्याचे निवासी नायब तहसीलदार विजय लोकरे, इंदापूरचे मंडळ अधिकारी श्याम झोडगे, माळवाडी मंडळ अधिकारी औदुंबर शिंदे, मंडल अधिकारी काटी, मल्लाप्पा ढाणे, ग्राम महसूल अधिकारी अशोक पोळ, भूषण सुरवडकर तसेच तहसील कार्यालय करमाळा येथील सहाय्यक महसूल अधिकारी जितेंद्र कदम, ग्राम महसूल आधिकारी चंद्रकांत नावाडे, गोरक्षनाथ ढोकणे, यादव ठोंबरे, मंगलसिंग गुसिंगे, इंदापूर तालुक्यातील पोलीस पाटील सुनील राऊत, प्रदीप भोई, अरुण कांबळे, विजयकुमार करे, बाळासाहेब कडाळे तसेच पोलीस कर्मचारी विनोद रासकर, लक्ष्मण सूर्यवंशी, होमगार्ड गणेश वडवे, भारत लोखंडे तसेच जिल्हाधिकारी कार्यालय येथील द्रोण सर्व्हे अर संकेत बाबर यांनी भाग घेतला.



### 'बोलावा विठ्ठल'चे सूर विसावले

# प्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. प्रभाकर कारेकर यांचे निधन

**मुंबई, १३ फेब्रुवारी-**

प्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. प्रभाकर कारेकर यांचे बुधवारी रात्री निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. त्यांच्या कुटुंबीयांनी गुरुवारी ही माहिती दिली. पं. कारेकर यांनी मुंबईतील शिवाजी पार्क राहत्या घरी अखेरचा श्वास घेतल्याचे कुटुंबीयांनी सांगितले.



ते काही काळापासून आजारीही होते. गोव्यात जन्मलेले पं. प्रभाकर कारेकर हे त्यांच्या प्रसिद्ध भजन 'बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल' आणि 'वक्रतुंड महाकाय'साठी ओळखले जात होते. ते उत्कृष्ट शास्त्रीय गायक होते. ऑल इंडिया रेडिओ आणि दूरदर्शनवरही अनेक वर्षे रसिकांनी त्यांच्याकडून सांगीतिक पर्वणी अनुभवली. शास्त्रीय आणि नाट्य संघातील धारदार आवाज ही पं. प्रभाकर कारेकर यांची ओळख होती. पं. प्रभाकर कारेकर यांचा जन्म १९४४ मध्ये गोव्यात झाला होता. पं. सुरेश हळदणकर, पं. जितेंद्र अभिषेकी आणि पं. सी. आर. व्यास यांच्याकडून त्यांनी शास्त्रीय संगीताचे धडे घेतले. ते एक उत्कृष्ट गायकच नव्हे, तर उत्तम शिक्षक होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कारेकर यांच्या निधनावर तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### डीएव्ही शैक्षणिक संकुलात महर्षी दयानंद सरस्वती जन्मोत्सव साजरा

**करकंब, दि. १३ फेब्रुवारी-**

आर्य समाजाचे संस्थापक व महान विचारवंत महर्षी दयानंद सरस्वती यांचा २०१ वा जन्मोत्सव रामभाऊ जोशी हायस्कूल व डीएव्ही महात्मा आनंद स्वामी सरस्वती ज्यु. कॉलेज करकंब येथे दयानंद शिक्षण संस्था नवी दिल्ली अध्यक्ष पद्मश्री पूनम, दयानंद शिक्षण संस्था सोलापूर स्थानिय सचिव महेश चौप्रा, प्रशासक डॉ. उबाळे व प्राचार्य हेमंत कदम यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. आर्यवेद सुमन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली होम, हवन करण्यात आले. हे यज्ञकार्य महादेव पुजारी, श्री व सौ. रमेश कविटकर, मिथून चंदनशिवे व रोहित गायकवाड यांनी केले. यावेळी ॲड. एस. आर.जोशी, मारुती व्यवहारे, ग्रामसेवक माळी, मेजर कवडे, हरी जोशी उपस्थितीत होते. यावेळी वक्तृत्व, निबंध व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.




### प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानला महाराष्ट्र एनजीओ आयकॉन अवॉर्ड प्रदान

**करमाळा, दि. १३ फेब्रवारी-**

रावगांव (ता. करमाळा) येथील प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानला ज्ञानरचना सोशल फाउंडेशन ठाण्यातर्फे महाराष्ट्र एनजीओ अवॉर्ड अहिल्यानगर येथे पद्मश्री राहीबाई सोमा पोपेरे यांच्या हस्ते देण्यात आला. उद्‌घाटन समाजसेवक सीए शंकर घनश्यामदास अदानी यांनी केले. यावेळी प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामदास कांबळे, सरोज आलाट, स्पर्श सेवाभावी संस्थेचे खजिनदार अमोल आलाट, स्पर्श सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा शितल साळवे, ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या डायरेक्टर सुप्रिया चौधरी, ज्ञानरचना सोशल फाउंडेशनचे डायरेक्टर नितीन साळवे, ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या डायरेक्ट सारिका शेलार उपस्थित होते.



### बार्शीत विश्वकर्मा जयंती साजरी

**बार्शी, दि. १३ फेब्रुवारी-**

येथील गाडी लोहार समाजाच्यावतीने श्री विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. श्री विश्वकर्मा जयंतीच्या दिवशी सकाळी समाज बांधवांनी एकत्र येऊन श्री विश्वकर्मा भगवानची विधीवत पूजन केले. पूजेनंतर दादासाहेब लोहार यांचे मर्दानी खेळाचे प्रात्यक्षिक झाले. तसेच समाज बांधवांसाठी प्रा. शिवाजी पवार यांचे पारंपरिक व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड या विषयी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी समाजातील ज्येष्ठ मंडळी, महिला भगिनी आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### बचेरी येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन

**पिलीव, दि. १३ फेब्रुवारी**

कै. मच्छिंद्रमामा खुर्द यांच्या ८४ व्या जयंती व कै. मच्छिंद्रमामा खुर्द वाचनालयाच्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त बचेरी (ता. माळशिरस) येथे रविवारी १६ फेब्रुवारी रोजी ग्रंथमित्र पुरस्कार वितरण व विद्यार्थी गुणगौरव सोहळा होणार असल्याचे अध्यक्ष सदाशिव शिंदे यांनी सांगिलते. यावेळी उपाध्यक्ष दत्तात्रय यादव, सचिव हैबत शिंदे उपस्थित होते. जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष विजयकुमार पवार, ग्रंथपाल विलास कदम, मुख्याध्यापिका अश्विनी शेंडगे व पिलीव येथील पत्रकार संजय पाटील यांना ग्रंथमित्र पुरस्कार जाहीर झाला असून नुकतीच मुंबई पोलीसपदी निवड झालेल्या काजल कोकरे व प्रियांका बरकडे यांचा सन्मान करण्यात येणार आहे. यावेळी प्राचार्य संतोषकुमार शेंडगे, मुख्याध्यापक जगदीश गोडस उपस्थित राहणार आहेत.

### विजयपुरात रविवारी बहुभाषा कवीसंमेलन

**विजयपूर, दि. १३ फेब्रुवारी-**

कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेतर्फे विजयपूर जिल्हा करामसापच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभानिमित्त रविवारी १६ फेब्रुवारी रोजी बहुभाषा कविसंमेलन सेटलाईट बसस्थानकसमोरील हॉटेल भवानी सभागृहात होणार आहे. उद्‌घाटन अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे उपाध्यक्ष व करामसाप कलबुरगी राज्य अध्यक्ष गुरय्या रे. स्वामी हे करणार आहेत. यावेळी कलबुरगी करामसाप कार्यवाह प्रभाकर सलगरे, बागलकोट करामसाप अध्यक्षा कवी सुधा बेटगेरी, चिक्कोडी करामसाप अध्यक्षा कवी लता माने संकेश्वर, कवी प्रकाश राजपूत यांच्यासह कवी सहभागी होणार आहेत. अध्यक्षपद करामसाप विजयपूर जिल्हाध्यक्ष दीपक शिंत्रे भूषविणार आहेत. यावेळी करामसाप विजयपूर जिल्हा पदाधिकारी डॉ. सदाशिव पवार, कन्हैया पेठकर, प्रा. गंगाधर गेंड, सुधाकर शिंदे, डॉ. एस. जे. जहागिरदार, श्रीपाद पाटणकर, रुपा हिबारे, प्रा. रेखा अध्यापक, प्रा. रेवती कट्टी, प्रा. उल्का जाधव यांचा सत्कार करण्यात येणार आहे.

# विश्व कल्याणासाठी ज्ञानेश्वरांनी मागितले पसायदान

## ● ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी : बार्शीत शिवशक्ती बँकेच्या व्याख्यानमालेला सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ फेब्रुवारी-**

विश्व कल्याण आणि समस्त जगताच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी श्री संत ज्ञानेश्वरांनी गुरुतत्त्वाकडे पसायदान मागितले. पसायदान ही विश्व प्रार्थना निरामयतेचा अविष्कार आहे, असे निरुपण ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी यांनी केले.



कर्मवीर व्याख्यानमाला पुष्प पहिले

येथील शिवशक्ती अरबन को-ऑप. बँकेच्यावतीने कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त आयोजित चौदाव्या कर्मवीर व्याख्यानमालेत घळसासी 'पसायदान श्री संत ज्ञानदेवांचे' या विषयावर बोलत होते. यावेळी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, शिवशक्ती बँकेचे चेअरमन डॉ. प्रकाश बुरगुटे, सचिव पी. टी. पाटील, यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुणदादा बारबोले आदी मान्यवर उपस्थित होते.

घळसासी म्हणाले, संतांचे जीवन कार्य आणि साहित्य हा आपल्या महाराष्ट्रीयन संस्कृतीमध्ये उपलब्ध मोठा ठेवा आहे. संतांनी जातीपंथ धर्मांच्या भिंती मोडल्या. अध्यात्मिकतेचे आकाश मोकळे केले. मात्र आजकाल पोपटपंची करुन प्रपंच भागविणाऱ्या कथित हभपची चलती झाली आहे. कीर्तनकारांना, प्रवचनकारांना साधनेच्या अधिष्ठान असली पाहिजे. विश्वचेतनेशी अनुसंधान साधण्याची क्षमता असणाऱ्या सात पुरुषांकडूनच सामाजिक परिवर्तन घडू शकते. त्यामुळे संतत्वाकडे जाणे ही मोठी कसोटी आहे. संतांनी आपल्या कर्मातून आणि भक्तीतून परमेश्वराची आराधना केली. सावता माळींनी आपल्या मळ्यात विठ्ठलाची भक्ती केली. त्यामुळे विठ्ठलाची पालखी त्यांच्या गावात येते. आपल्या कर्मामध्येच परमेश्वर प्राप्ती आहे. हा संदेश संतांनी दिला. आपले जीवन विकारमुक्त झाले तर आध्यात्मिक उन्नती होते. सामान्य माणसांनी आपल्या नरदेहाचा नारायण केला. त्यामुळे संत चरित्र हे आदर्शवत आहे. श्री संत ज्ञानेश्वरांनी देह धारी नव्हे तर अनंत रुपात उपलब्ध असलेल्या गुरुतत्त्वाकडे पसायदान मागितले. पसायदानामध्ये समस्त मानव जातीच्या कल्याणाचा विचार आहे. अज्ञानाचा अंधकार हटवून ज्ञान प्रकाशाचा उदय व्हावा यासाठी प्रार्थना आहे. खलप्रवृत्ती मधला वाईटपणा आपल्यासहित नष्ट व्हावा, असे मागणे आहे. प्रास्ताविकामध्ये बँकेचे संचालक डॉ. प्रशांत मोहिरे यांनी बँकेच्या वाटचालीचा आढावा घेतला. नीता देव यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले. व्याख्यानमालेच्या यशस्वीतेसाठी व्हाईस चेअरमन अशोक वाघमारे, व्यवस्थापक भारत उमाटे, सहाय्यक सहव्यवस्थापक गणेश बारंगुळे, शाखाधिकारी स्वप्निल राऊत, शाखाधिकारी विजय शिखरे आदी परिश्रम घेत आहेत.

### आता धर्मपरायणता सोडून अर्थपरायणेत वाढ

सर्व विषयांचे ज्ञान भंडार भावार्थ दीपिकेमध्ये आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरीतील पसायदान हे परमोच्च उदात्त विश्व कल्याणाचे सादरीकरण आहे. संतांनी सर्व भेदाभेद अमंगळ मांडले. मात्र आज धर्मपरायणता सोडून अर्थपरायणता वाढली आहे. उच्च शिक्षण आणि गलेलठ्ठ पॅकेज सुखी आणि समृद्ध जीवन नाही, तर जीवनाला कर्तव्य परायणतेचे अध्यात्मिक संस्कारांचे संचित असले पाहिजे, असे मत घळसासी यांनी व्यक्त केले.

### उन्नतीचाच विचार

संपूर्ण जगाच्या धर्मातून सूर्य पहावा अशी मागणी आहे. पसायदान हे धार्मिक आणि पारमार्थिक अंगाने उन्नतीचा विचार आहे. ज्ञानेश्वरांनी हे विश्वचि माझे घर असे म्हणत विश्व मानवतावादाची प्रस्थापना व्हावी यासाठी साकडे घातले आहे. ज्ञानेश्वरी ही भावार्थ दीपिका आहे. ज्ञानेश्वरीमध्ये भगवतगीतेवरील टीका आणि मीमांसा आहे, असे घळसासी यांनी सांगितले.

# भालगांव शिवारात वाघाचा वावर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ फेब्रुवारी-**

धाराशीव आणि बार्शीच्या १०० किमी परिसरात वावरत असलेल्या वाघाचे आगमन भालगांव (ता. बार्शी) येथील सत्यवान नरसुडे यांच्या शेतात आज सकाळी झाल्याचे पायाच्या ठशांवरून लक्षात आले.



आज इथे तर उद्या कुठे या उक्तीप्रमाणे वाघाच्या वास्तव्याची चर्चा बार्शी तालुक्यात सुरु आहे. वाघाच्या पायाच्या ठशांमुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यातच सध्या भालगांव परिसरात रात्री ९ ते पहाटे ५ वा. पर्यंत शेतातील वीजपुरवठा असल्यामुळे शेतकरी पिकांना पाणी देण्यासाठी रात्री शेतात जात आहेत. चोहीकडे घबराटीचे व भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. वन विभागाशी संबंधित शेतकरी व इतर शेतकऱ्यांनी संपर्क केला. मात्र वन विभाग अधिकाऱ्यांनी उद्या येऊन पाहणी करु, असे उत्तर दिल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

# चांगभलंच्या जयघोषात भैरवनाथाची यात्रा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. १३ फेब्रुवारी-**

मेडद (ता. माळशिरस) येथील ग्रामदैवत कालभैरवनाथाची यात्रा मोठ्या उत्साहात व भक्तिभावात संपन्न झाली.



मेडद येथील ग्रामदैवत भैरवनाथाची यात्रा माघ पौर्णिमेला साजरी केली जाते. सोनारीच्या कालभैरवनाथाचे स्थान म्हणून व नवसाला पावणारा नाथ म्हणून या भैरवनाथावर भाविकांची मोठी श्रद्धा आहे.आज पहाटे महाआरती झाल्यानंतर श्रीची रथातून मिरवणूक काढण्यात आली. भैरवनाथाच चांगभलं, देवाच्या घोड्याच चांगभलं या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. या ग्रामदैवतास बोललेला नवस फेडण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी असते. त्यामध्ये राज्याच्या कानाकोपऱ्यातून डवरी समाज मोठ्या संखेने येतो. दरवर्षी नोटांचे हार रथावर भाविक बांधतात. प्रत्येक वर्षी रथावरील नोटांच्या हाराच्या माध्यमातून व रोख देणगीमधून लाखो रुपये देवस्थानला जमा होतात. आज सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. सकाळी सुरु झालेला रथोत्सव ग्रामप्रदक्षिणा खालून मंदिरात परत आला. यात्रा काळात कसलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी माळशिरस पोलिसांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

### विठ्ठल भालेराव यांची तालुका क्रीडा अधिकारीपदी निवड

**मोडनिंब, दि. १३ फेब्रुवारी-**

लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत अरणचे एकलव्य अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक विठ्ठल जंगलु भालेराव यांनी यश संपादन केले. त्यांची तालुका क्रीडा अधिकारी पदावर निवड झाली आहे.



मोडनिंब येथे शांतिनिकेतन विद्या मंदिर क्रीडा शिक्षक म्हणून १३ वर्ष झाले कार्यरत आहेत.

त्यांचे आ. रणजितसिंह मोहिते -पाटील, भारत शिंदे, शिवाजी कांबळे, हरीदास रणदिवे, उदय माने, संजय शिंदे, डॉ. प्रदीप पाटील, डॉ. प्रविण पाटील, सतिश शाहा, दीपक ताकतोडे यांनी अभिनंदन केले.

# स्वसंरक्षणासाठी पोलिसांचा गोळीबार; आरोपी जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**विजयपूर, दि. १३ फेब्रुवारी-**

खून प्रकरणातील आरोपीला देशी पिस्तूल पुरवणारा आरोपी अटक करण्यासाठी पोलीस गेले तेव्हा पोलिसांनी गोळीबार करून आपली कर्तृत्वाची धमक दाखवली.



२८ जानेवारी रोजी विजयपुर जिल्ह्यातील तिकोटा तालुक्यातील अरकेरी एलटी १ येथील मनवरदोड्डीजवळ झालेल्या सतीश राठोड हत्येप्रकरणी पोलिसांनी आरोपीस सतीश राठोड हत्या प्रकरणातील आरोपी सुरेश राठोडच्या पायाला गोळी लागली आहे. विजयपूर बाहेरील महिला विद्यापीठाजवळ ही घटना घडली. विजयपूर ग्रामीण पोलीस ठाण्याचे पीएसआय विनोद यांनी खुनासाठी देशी पिस्तुल पुरवणाऱ्या आरोपी सुरेशला विशिष्ट माहिती मिळाल्यानंतर विजयपूर ग्रामीण पोलिस त्याला अटक करण्यासाठी जात असताना सुरेशने चाकूने हल्ला केला. सतीषच्या हत्येसाठी देशी पिस्तुल पुरवणारा सुरेश राठोड शहराच्या बाहेरील अथणी रोडजवळ लपला होता. या गोळीबारात पीएएसआय विनोद दोडमनी आणि एक कर्मचारी जखमी झाले. सध्या पीएसआय विनोद दोडमनी आणि एका पोलिस कॉन्स्टेबलला शहरातील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जिल्हा पोलिस प्रमुख लक्ष्मण निंबर्गी आणि एएसपी रामनगौडा हट्टी आणि इतर अधिकाऱ्यांनी रुग्णालयाला भेट देऊन पीएसआय आणि पोलिस कॉन्स्टेबलची विचारपूस केली.

# सरकार आश्वासन पाळणार का? शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार का?

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १३ फेब्रुवारी-**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूकीत सध्याच्या सत्तेत आलेल्या महायुती सरकारने शेतकऱ्यांना तिन लाखापर्यंत कर्ज माफी देत साताबारा कोरा करणार असल्याचे जाहीरन्यामातच आश्वासन दिले होते. ते आश्वासन पूर्ण होणार का? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांनच्या मालाला खरेतर अपेक्षित चांगला भावही मिळाला नाही. खरेतर शेतकऱ्यांनचा खर्चाचा आणी उतपन्नाचा ताळमेळ बसत नसल्यामुळे शेतकरी कर्ज बाजारी होत आहेत .आणी यामुळे शेतकरी आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलीत आहेत. सरकारने २०१७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज कर्ज माफी योजना राबविली होती.

यामध्ये अगदी थोडया शेतकऱ्यांना याचा लाभ झाला होता.तर जे शेतकरी नियमित कर्ज फेड करत होते त्यांना ५० हजार रुपये प्रोस्तहान पर अनुदान जाहीर केली होती.यामधील अनेक शेतकऱ्यांना अदयापही लाभच झाला नाही. शासनाने कर्ज माफीचा निर्णय न जाहीर केल्यामुळे सध्या मार्च महीन्याच्या अगोदर बँका, सोसायटयांचा शेतकऱ्यांनच्या मागे कर्ज माफीचा ससेमिरा सुरू झाला आहे. यामुळे शेतकरी सध्या वैतागला असुन निवडणुकीत महायुती सरकारने विशेषतः सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपले सरकार सत्तेत आल्यावर शेतकऱ्यांना कर्ज माफी देणयाची घोषणा केली होती पण याची हे सरकार कधी अमंलबजावणी होणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# आ.भारत भालकेंना मनसे अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ फेब्रुवारी-**

लोकनेते स्वर्गीय आमदार भारतनाना भालके यांच्या ६५ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीपबापू धोत्रे यांच्या वतीने गोपाळपूर येथील मातोश्री वृद्धाश्रमातील वृद्धांना मिष्टान भोजन देण्यात आले.

याप्रसंगी स्वर्गीय आमदार भारत भालके यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना दिलीप धोत्रे म्हणाले की गोरगरीब व सामान्य नागरिकांसाठी भारतनानांचे कार्य मोठे आहे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांचा पाईक म्हणून पुढील काळात काम करणार असल्याचे अभिवचन देत भारतनानांचे स्वप्न साकार करण्यासाठी पुढील काळात नागरिकांचे शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्याचे काम केली जाईल. त्यांच्या जयंतीनिमित्त असा संकल्प करतो की शहर व तालुक्यातील जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी माझे कार्यालय सदैव खुले राहील. येणाऱ्या जनतेला मदत करण्याचे काम केले जाईल असे आश्वासन यावेळी दिलीप धोत्रे यांनी दिले. यावेळी कोळी समाजाचे ज्येष्ठ नेते अरुण कोळी, मनसेचे तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील, ॲड. संदीप रणनवरे, गणेश पिंपळनेरकर, दत्ता वलेकर, आदिनाथ भोसले, प्रदीप परचडे, सूरज देवकर, आकाश बंदपट्टे, ओंकार पिसे, अनिल स्पताल आदी उपस्थित होते.



# भिसे महाविद्यालयात विज्ञानातील महिला, मुलींचा आंतरराष्ट्रीय दिवस उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १३ फेब्रुवारी-**

येथील भौतिक शास्त्र विभागाच्या वतीने तरुण मुलींना भविष्यातील शास्त्रज्ञ आणि नवोन्मेषक म्हणून स्वतःची कल्पना करण्यास प्रेरित व्हावे या हेतूने विज्ञानातील महिला आणि मुलींचा आंतरराष्ट्रीय दिवस साजरा करण्यात आला.

हा दिवस विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या क्षेत्रात महिला आणि मुलींच्या महत्त्वपूर्ण भूमिकेला मान्यता देण्यासाठी समर्पित आहे. या दिवसाच्या उत्सवाचा एक भाग म्हणून, महाविद्यालयात विविध कार्यक्रमचे आयोजित करण्यात आले होते, ज्यात विविध महिलांच्या योगदानाचे प्रदर्शन करणारे लघुपट विद्यार्थिनींना दाखविण्यात आले. भित्तीचित्र स्पर्धेचे प्रदर्शने भरविण्यात आले. या कार्यक्रमांमुळे केवळ सध्याच्या महिलांचा सन्मान झाला नाही तर मुलींच्या पुढच्या पिढीला विज्ञानातील त्यांच्या आवडी जोपासण्यासाठी प्रेरणा मिळाली असे प्रतिपादन प्रभारी प्राचार्या डॉ. ए. पी. पोळ यांनी केले. स्नेहलता जाधव यांनी मार्गदर्शन केले. भित्ती चित्र स्पर्धेतील विजेत्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमासाठी डॉ. अजिंक्य मोरे, व्ही. एस. शिंदे, डी. आर. तिपे, क्रांती पोळ, डी. बि. जाधव, ए. एम. गोयल, भूषण शिरस्कर, तेजस्विनी बनसोडे, शिवरत्ना शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

# द. ह. कवठेकर प्रशालेमध्ये वार्षिक पारितोषिक समारंभ उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ फेब्रुवारी-**

येथील पंढरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित द. ह. कवठेकर प्रशाला ही पंढरपुरातील प्रथित यश सुवर्ण महोत्सवी प्रशाला आहे. प्रशालेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ नुकताच मोठ्या दिमाखात संपन्न झाला.

प्रमुख अभ्यागत म्हणून पंढरपुरातील प्रसिद्ध डॉक्टर सौरभ ठवरे, डॉक्टर उर्मिला सौरभ ठवरे माजी नगरसेवक विवेक परदेशी व डॉक्टर अश्विनी विवेक परदेशी हे होते. कार्यक्रमासाठी संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष नाना मालक कवठेकर उपस्थित होते.संस्था सदस्य गुरुवर्य एस. पी. कुलकर्णी, संजय कुलकर्णी, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष श्री. वगैरे , सहसचिवा श्रीमती शिंदे मॅडम, शालेय व्यवस्थापन समितीच्या दिपाली सतपाल व महेश तेंडुलकर उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या गुणांचे कौतुक करताना प्रमुख अभ्यागत डॉक्टर सौरभ ठवरे म्हणाले की, शाळा हे तुमचे सर्व गुण पूर्णपणे विकसित करते व तुम्हाला समाजात वावरण्यासाठी एक चांगला माणूस घडवते. शाळेतील विविध स्पर्धा तुमच्यातल्या वेगवेगळ्या कलागुणांना वाव देत असतात.सर्व स्पर्धात सगळ्यांनी भाग घ्यायला पाहिजे. जरी प्रथम क्रमांक प्राप्त झाला नाही तरी आपल्याला अनेक गोष्टी शिकायला मिळतात. शालेय जीवनात अशा स्पर्धात भाग घेतल्यामुळेच आम्ही आज इथपर्यंत आलो असेही त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. विवेक परदेशी यांनीही अभ्यासाबरोबर खेळ व्यायाम याचेही महत्त्व सांगितले व निरोगी जीवन जगण्याचा मूलमंत्र विद्यार्थ्यांना दिला. प्रास्ताविकामध्ये मुख्याध्यापकानी विद्यार्थ्यांच्या कष्टाचे फळ त्यांना पारितोषकाच्या रूपाने मिळते.माझा विद्यार्थी हा अष्टपैलू विद्यार्थी व्हावा यासाठीच प्रत्येक शिक्षक प्रयत्न करत असतो. प्रशाला त्याबाबतीत नेहमीच सकारात्मक राहते असेही त्यांनी सांगितले.द.ह. कवठेकर प्रशालेच्या आनंदोत्सव कार्यक्रमाच्या अखेरच्या पुष्पाचे म्हणजे वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे येथील हा सर्व कार्यक्रम म्हणजे सूत्रसंचालन, स्वागत, प्रास्ताविक, आभार, सगळ्याच गोष्टी विद्यार्थीच संचलन करत असतात. अशी कोणतीही शाळा महाराष्ट्रात नाही की ती विद्यार्थ्यांकडूनच या सगळ्या गोष्टी करून घेते. पण द.ह.कवठेकर प्रशालेचे हेच वैशिष्ट्य आहे की विद्यार्थीच कार्यक्रमाचे नियोजन, सूत्रसंचालन सगळ्याच गोष्टी करतात. त्यामुळेच येथील विद्यार्थी भविष्यात यशस्वी नागरिक बनतात. प्रमुख अभ्यागतांनीही शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक केले. इयत्ता ९ वी अ मधील सई महेश तेंडुलकर हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. ९ वी ईमधील अथर्व अमित वाडेकर याने प्रास्ताविक केले. सार्थक लेंगरे, ऋषिकेश तांदळे, करुणा जाधव, सान्वी कळढोणे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. आभार उदिता वाडेकर हिने मांडले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उपमुख्याध्यापक सुनील रुपनर व पर्यवेक्षक आर. एस. कुलकर्णी यांचे मोलाचे मार्गदर्शन केले. प्रशालेच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी गितमंचातील गीत गायले. प्रशालेचे राजेश खिस्ते व केसकर यांनी सांगितसाथ दिली. प्रशालेचे निवृत्त उपमुख्याध्यापक आर. जी.केसकर व उपमुख्याध्यापक सुनील रुपनर यांनी मुलांना स्वखर्चाने खाऊ वाटप केले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# तुलसी गॅबार्ड भारत-अमेरिका मैत्रीच्या समर्थक

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली भेट



अमेरिकेच्या राष्ट्रीय गुप्तचर संचालक तुलसी गॅबार्ड यांच्यासोबत चर्चा करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

◆ **वॉशिंग्टन, १३ फेब्रुवारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेच्या राष्ट्रीय गुप्तचर संचालक तुलसी गॅबार्ड यांची भेट घेतली आणि दहशतवादविरोधी तसेच उदयोन्मुख धोक्यांमधील गुप्तचर सहकार्य वाढवण्यावर लक्ष केंद्रित करून दोन्ही देशांमधील सबंधांच्या विविध पैलूंवर चर्चा केली.

अमेरिकेच्या सर्वोच्च गुप्तचर अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल मोदी यांनी हिंदू-अमेरिकन तुलसी गॅबार्ड यांचे अभिनंदन केले. गॅबार्ड यांची या पदावर बुधवारी नियुक्ती झाली.

अमेरिकेच्या राष्ट्रीय गुप्तचर संचालक तुलसी गॅबार्ड यांची वॉशिंग्टन डीसीत भेट घेतली. या नियुक्तीबद्दल त्यांचे अभिनंदन केले. भारत-अमेरिका मैत्रीचे नेहमीच समर्थन करणाऱ्या तुलसी गॅबार्ड यांच्यासोबत दोन्ही देशांतील मैत्रीच्या विविध पैलूंवर चर्चा केली, असे नरेंद्र मोदी यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. दोन्ही नेत्यांमध्ये दहशतवादविरोधी, सायबर सुरक्षा आणि उदयोन्मुख धोक्यांमध्ये गुप्तचर सहकार्य वाढवण्यावरही चर्चा झाली, असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

राष्ट्रीय गुप्तचर संचालक तुलसी गॅबार्ड यांच्यासोबत वॉशिंग्टन डीसी येथे सकारात्मक बैठक झाली. दहशतवादविरोधी, सायबर सुरक्षा आणि उदयोन्मुख धोक्यांमध्ये गुप्तचर सहकार्य वाढवण्यावर ही चर्चा केंद्रित असल्याचे पोस्टमध्ये म्हटले आहे.

फ्रान्सच्या दौऱ्यानंतर मोदी बुधवारी सायंकाळी साडेपाच वाजता ( गुरुवारी पहाटे चार वाजता) अमेरिकेच्या राजधानीत पोहोचले. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉं यांच्यासोबत एआय कृती परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले होते.

आपल्या राष्ट्राच्या हितासाठी आणि आपल्या ग्रहाच्या चांगल्या भविष्यासाठी आम्ही सोबत काम करीत राहू, असे मोदी म्हणाले. 'द हिल'च्या वृत्तानुसार, सिनेटने मंजुरी दिल्यानंतर काही तासांतच ओव्हल ऑफिसमध्ये गॅबार्ड यांनी राष्ट्रीय गुप्तचर संचालक म्हणून शपथ घेतली. ॲटर्नी जनरल पाम बोंडी यांनी गॅबार्ड यांना पदाची शपथ दिली. ट्रम्प यांनी त्यांची असाधारण धैर्य असलेल्या देशभक्त अमेरिकन अशा शब्दांत त्यांचे कौतुक केले आहे. गॅबार्ड यांना आर्मी नॅशनल गार्डमध्ये तीन वेळा तैनात करण्यात आले आणि त्या माजी डेमॉक्रेटिक कॉंग्रेसच्या महिला आहेत, असेही ट्रम्प यांनी म्हटले होते. (वृत्तसंस्था)

# पंतप्रधान मोदींचे वॉशिंग्टनमध्ये जल्लोषात स्वागत

## भारतीय समुदायाकडून 'वंदे मातरम्'च्या घोषणा

◆ **वॉशिंग्टन, १३ फेब्रुवारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिका दौऱ्यादरम्यान राष्ट्राध्यक्षांचे अतिथीगृह असलेल्या ब्लेअर हाऊसमध्ये पोहोचले, त्यावेळी भारतीय-अमेरिकी समुदायाने त्यांचे जल्लोषात स्वागत केले.

नरेंद्र मोदी फ्रान्स दौरा आटोपल्यावर बुधवारी अमेरिकेत दाखल झाले. त्यानंतर ते ब्लेअर हाऊस येथे पोहोचले. तिथे भारतीय समुदायाच्या लोकांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले. थंडी आणि पावसाचा सामना करीत समुदायातील सदस्य ब्लेअर हाऊसमध्ये जमले आणि त्यांनी भारतीय व अमेरिकी ध्वज फडकावत 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' आणि 'मोदी-मोदी' अशा घोषणा देऊन त्यांचे स्वागत केले.



भारतीय समुदायाने नरेंद्र मोदी यांचे असे जल्लोषात स्वागत केले

हिवाळ्यातील थंडीत उबदार स्वागत! थंड हवामान असूनही, वॉशिंग्टन डीसीमधील भारतीय समुदायाने माझे खूप खास स्वागत केले. मी त्यांचे आभार मानतो, असे मोदी यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. मागील महिन्यात पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर काही आठवड्यात ट्रम्प यांनी स्वागत केलेले नरेंद्र मोदी हे चौथे विदेशी नेते आहेत.

ट्रम्प यांचा व्हाईट हाऊसमधील दुसरा कार्यकाळ सुरू झाल्यापासून एका महिन्यापेक्षा कमी कालावधीत, त्यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू, जपानचे पंतप्रधान शिगेरू इशिबा आणि जॉर्डनचे राजा अब्दुल्ला द्वितीय यांचे आतिथ्य केले आहे.

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉं यांच्यासोबत एआय कृती परिषदेचे सह-अध्यक्षपद भूषवलेल्या फ्रान्सच्या दौऱ्यानंतर मोदी बुधवारी सायंकाळी अमेरिकेच्या राजधानीत पोहोचले. (वृत्तसंस्था)

# मेक्सिको नव्हे, आता अमेरिकेची खाडी

## ट्रम्प यांचा नामांतरणाचा आदेश जारी

◆ **वॉशिंग्टन, १३ फेब्रुवारी**

फ्लोरिडा ते टेक्सास आणि मेक्सिकोपर्यंत असलेल्या जलमार्गाला मेक्सिकोची खाडी असे संबोधण्यात यायचे. परंतु अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या खाडीचे नामांतर करून त्याला अमेरिकेची खाडी असे नाव दिले.

व्हाईट हाऊसचे माध्यम सचिव कैरोलिन लेविट यांनी बुधवारी यासंदर्भात जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, राष्ट्रपती ट्रम्प यांचा २० जानेवारीला शपथ समारोह झाल्यानंतर त्यांनी बेकायदेशीर स्थलांतरित नागरिकांना हद्दपार करणे, चीन, कॅनडा आणि मेक्सिको या देशांवर आयात शुल्क लादणे आणि मेक्सिको खाडीचे नाव बदलण्याचे निर्णय घेतले. ट्रम्प यांनी कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केल्यानंतर मेक्सिको खाडी आता अमेरिका खाडी म्हणून ओळखली जाईल. इतर देशांनी देखील मेक्सिको खाडीला अमेरिकेची खाडी म्हणून संबोधित करावे. त्यांनी पुढे सांगितले की, लुइसियानाच्या समुद्र किनाऱ्यापासून फ्लोरिडा, टेक्सास आणि मेक्सिकोपर्यंत असलेला जलमार्ग आता अमेरिकेची खाडी असेल. यापूर्वी हा भाग मेक्सिकोची खाडी नावाने ओळखला जायचा. या भागातील नागरिकांसह जगाने देखील या नावाचा स्वीकार करावा. या भागाचा विकास, अमेरिकेची सुरक्षा आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी ट्रम्प यांनी नामांतरणाच्या आदेशावर स्वाक्षरी केली आहे.

### मेक्सिकोच्या राष्ट्रपतींनी फेटाळला निर्णय

मेक्सिकोच्या राष्ट्रपती क्लाऊडिया शिनबाम यांनी अमेरिकेने जारी केलेला नामांतरणाचा आदेश फेटाळून लावला. त्यांनी म्हटले की, मेक्सिकोच्या खाडीचा वापर अमेरिकेसाठी कदापि होऊ देणार नाही. आमच्यासाठी आणि जगासाठीदेखील ही खाडी मेक्सिको खाडीच राहणार आहे. हा आदेश आम्हाला मान्य नाही.

**गुगलच्या नकाशावर बदलले नाव**

गुगलच्या नकाशावरही मेक्सिकोच्या खाडीचे नाव बदलण्यात आले. यावर निवेदन जारी करताना गुगलने म्हटले की, अमेरिका सरकारच्या आदेशाचे पालन करणे आमचे धोरण आहे. (वृत्तसंस्था)

# अमेरिकी उप-राष्ट्राध्यक्षांच्या मुलांना मोदींकडून भारतीय खेळणी

## परंपरेचा राजनैतिक स्पर्श

◆ **पॅरिस, १३ फेब्रुवारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्स दौऱ्यानंतर दोन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर पोहोचले आहेत. दरम्यान, नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे उप-राष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स आणि त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी मोदींनी अमेरिकेच्या उप-राष्ट्राध्यक्षांच्या मुलांना खास भारतीय बनावटीची खेळणी भेटवस्तू म्हणून दिल्या आहेत. याची माहिती उपराष्ट्राध्यक्षांनी दिली आहे. या भेटवस्तूंची जोरदार चर्चा होत आहे.

पंतप्रधान मोदी यानी व्हान्स यांच्या मुलांना खेळणी भेटवस्तू म्हणून दिल्या आहेत. यामध्ये विवेक व्हान्सला लाकडी रेल्वे खेळण्यांचा संच आणि इवान ब्लेन व्हान्सला भारतीय लोकचित्रे असलेले जिगसॉ पझल भेट दिले आहे. ही खेळणी भारतीय बनावटीची आहेत.



**'लाकडी रेल्वे' दिली भेट**

पनरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांचे पुत्र विवेक व्हान्स याला लाकडी रेल्वे खेळणे भेट म्हणून दिली आहे. या भेटवस्तूला खास बनवणारी गोष्ट म्हणजे ही एक कालातीत 'क्लासिक' आहे. जी जुन्या आठवणींना शाश्वततेशी जोडते. नैसर्गिक लाकडापासून बनवलेले, ते पर्यावरणपूरक आहे आणि वनस्पतींपासून मिळवलेल्या रंगांनी रंगवलेले आहे. यामुळे मुलांची सुरक्षितता आणि पर्यावरणाविषयी जागरूकता सुनिश्चित होते. हे खेळणे हस्तनिर्मित आहे जे सर्जनशीलता, वारसा आणि पर्यावरणपूरक कारागिरीचे प्रतीक आहे. लाकडी खेळणी बनवण्याच्या भारताच्या समृद्ध परंपरेचे प्रतिबिंबित करते, अशी या भेटवस्तू दिलेल्या भारतीय खेळण्याचे वैशिष्ट्य आहे.

### मुलीला दिला 'लाकडी अक्षरांचा संच' भेट

नरेंद्र मोदी यांनी जेडी व्हान्स यांची मुलगी मिराबेल रोज व्हान्सला लाकडी अक्षरांचा संच भेट दिला आहे. त्याची खासियत म्हणजे ती पर्यावरणपूरक आहे. शिवाय लाकडी अक्षरे हे एक टिकाऊ, सुरक्षित आणि महत्त्वाचे शैक्षणिक साधन आहे. प्लॅस्टिकपासून बनवलेल्या वर्णमाला संचांपेक्षा वेगळे, हे संच हानिकारक रसायनांपासून मुक्त आहे आणि पर्यावरण संवर्धनास समर्थन देते. हे प्रत्यक्ष शिक्षणासाठी डिझाईन केलेले आहे.

**भारतीय वारशाचे महत्त्व अधोरेखित करणारे 'जिग-सॉ पझल'**

याशिवाय, नरेंद्र मोदी यांनी जेडी व्हास यांचे दुसरा मुलगा इव्हान ब्लेन व्हान्सला भारतीय लोकचित्रांवर आधारित एक जिग-सॉ पझल भेट दिले आहे. हे कोडे विविध लोक, चित्रकला शैलींचे प्रदर्शन करून भारताच्या समृद्ध कलात्मक वारशाचे प्रदर्शन करते. पश्चिम बंगालमधील कालीघाट चित्रे त्यांच्या ठळक रूपरेषा, चमकदार रंग आणि देवता, मिथक आणि सामाजिक विषयांचे चित्रण यासाठी प्रसिद्ध आहेत. जमातीने तयार केलेल्या संथाळ चित्रांमध्ये आदिवासी जीवन, विधी आणि निसर्गाचे चित्रण करण्यासाठी मातीचे रंग आणि नैसर्गिक रंग वापरले जातात. बिहारच्या मधुबनी चित्रांमध्ये गुंतागुंतीचे नमुने, चमकदार रंग आणि पौराणिक किंवा निसर्ग-प्रेरित आकृतिबंध आहेत. (वृत्तसंस्था)




# दानात मिळालेल्या साधूंनी बनला 'हा' आखाडा

## अखेरच्या क्षणी ऋषी आणि संतांना देतात समाधी

श्री दशनाम गोदड हा असा आखाडा आहे जो ऋषी आणि संतांच्या मृत्युनंतर त्यांचे अंत्यसंस्कार करतो. त्यांना समाधी देतो. महाकुंभात उभारलेल्या जवळजवळ सर्वच आखाड्यांचे मंडप त्यांच्या भव्यतेमुळे चर्चेत होते, परंतु श्री दशनाम गोदड आखाड्याच्या मंडपाला पूर्वीसारखी भव्यता नाही. कोणताही दिमाख किंवा ग्लॅमर नाही.

शैव आखाड्याच्या परंपरेनुसार, गोदड आखाडा हा सात संन्यासी आखाड्यांकडून मिळालेल्या देणग्यांपासून तयार होतो. गोदड आखाड्याचे संत शैव आखाड्यातील दिवंगत संतांना समाधी देतात. संताच्या सोळा विधींमध्ये गोदड आखाड्यातील संतांना प्रमुख स्थान आहे. ज्या संताला समाधी दिली जाते, त्यांचे काही शिष्य या आखाड्याला देणगी देतात. अशा प्रकारे साधू आखाड्यात येतात.

महंत सत्यानंद गिरी ऊर्फ लाली बाबा म्हणाले की, गोदड आखाड्याचा पाया रुखड सुखड आणि गुदर हे शब्द जोडून घातला गेला. गोदड आखाडा ब्रह्मपुरी येथे स्थापन केला होता. जिथे शैव पंथाचे आखाडे आहेत, तिथे गोदड आखाडाही आहे. गोदड आखाड्याचे संत शैव पंथातील सर्व सात आखाड्यांमधील (अग्नी वगळता) मृत संतांना समाधी देतात. संतांच्या अंत्यसंस्कारात गोदड आखाड्याचे विशेष स्थान आहे. त्याचे मुख्य केंद्र जुनागढ आहे.

**शाही स्नान, महामंडलेश्वर नाही**

लाली बाबा स्पष्ट करतात की, ते सर्व सात आखाड्यांशी संबंधित आहे. जिथे शैव पंथाचे आखाडे आहेत, तिथे गोदड आखाडाही आहे. गोदड आखाड्याचे संत शैव पंथातील सर्व सात आखाड्यांमधील (अग्नी वगळता) मृत संतांना समाधी देतात. संतांच्या अंत्यसंस्कारात गोदड आखाड्याचेही विशेष स्थान आहे. याशिवाय, आखाड्याचे मुख्य काम देवतेला धूप दाखवण्याचे आहे.

आखाड्यातील साधू कोणत्याही महात्माच्या समाधीस्थळी गायत्री मंत्राचे पठण करतात आणि त्यांना मोक्ष देतात. समाधी स्थळी १०८ समाधी गायत्री मंत्रांचा जप करणे हा एक प्रमुख विधी आहे, परंतु ही परंपरा जवळजवळ संपुष्टात आली आहे. आखाड्यातील संत शाही स्नान करीत नाहीत. आखाड्यात महामंडलेश्वर नाही. ते फक्त एकच शिष्य बनवतात.

# धनगिरी महाराज वयाच्या ९६व्या वर्षी बनले नागा साधू

गुरूंच्या समाधीमुळे, ९६ वर्षीय धनगिरी महाराजांची नागा संन्यासी होण्याची इच्छा अपूर्ण राहिली. धनगिरी महाराजांची ही इच्छा प्रयागराज महाकुंभात पूर्ण झाली. श्री शंभू पंचायती अटल आखाड्यात आचार्य महामंडलेश्वर विश्वात्मानंद सरस्वती यांनी नागा संन्यासी बनवण्याचा औपचारिक कार्यक्रम आयोजित केला. महाराजांना स्टॅम्प पेपरवर चारित्र्य प्रमाणपत्रही देण्यात आले.

खरे तर, यावेळी प्रयागराज महाकुंभात हजारो लोक नागा संन्यासी बनले आहेत. असे म्हटले जाते की, धनगिरी महाराज हे नागा बनलेले सर्वांत वयस्कर भिक्षू आहेत. धनगिरी महाराज म्हणाले की, १९७० मध्ये ते सोमगिरी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली योगी बनले. शिक्षण आणि दीक्षा घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाली होती, परंतु गुरूंना समाधी मिळाली. यानंतर नागा संस्काराची प्रक्रिया अपूर्ण राहिली.

**सर्वांत वयोवृद्ध दीक्षेकरी**



धनगिरी महाराजांचा जन्म १९२९ मध्ये उत्तराखंडमधील अल्मोडा येथे झाला. ते १९६८ पर्यंत सैन्यात होते. १९७० मध्ये निवृत्ती घेतली. धनगिरी महाराज नैनितालमधील रामनगर येथील एका गुहेत राहतात.

पदवी मिळवणे अत्यंत कठीण

केवळ अंगावरील कपडे काढून टाकल्याने नागा संन्यासी होतो असे नाही. नागा होणे सोपे नाही. ज्याप्रमाणे एखादा विद्यार्थी कठोर परिश्रम आणि अभ्यासानंतर पदवी प्राप्त करतो. त्याचप्रमाणे, नवीन नागांनाही परीक्षेच्या कठीण काळातून जावे लागते. त्यांच्या ब्रह्मचर्येची परीक्षा रिंगणात होते. या परीक्षेला १२ वर्षे लागतात. ज्येष्ठ भिक्षूंसाठी जेवण बनवणे, त्यांची ठिकाणे स्वच्छ करणे, ध्यान करणे आणि शास्त्रांचा अभ्यास करणे, अशी सर्व कामे त्यांना करावी लागतात.

# महाकुंभात पोहोचला अभिनेता विकी कौशल

गुरुवारी दुपारपर्यंत ४४.७६ लाख भाविकांनी संगमात स्नान केले. १३ जानेवारीपासून कोटींहून अधिक भाविकांनी स्नान केले आहे. अभिनेता विकी कौशलदेखील महाकुंभात पोहोचला.

अभिनेत्याने सांगितले, महाकुंभाला येऊन खूप छान वाटते. मी बराच वेळ वाट पाहत होतो. मी खूप भाग्यवान आहे असे मला वाटते. कॉंग्रेस नेते सचिन पायलट हेही महाकुंभात पोहोचले.

दरम्यान, छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साई हेदेखील त्यांच्या मंत्रिमंडळासह पोहोचले. राज्यपाल रामेन डेका, विधानसभा अध्यक्ष रमणसिंह देखील संगमात स्नान करतील. गुरुवारी महाकुंभात इतर दिवसांपेक्षा कमी गर्दी होती. अशा परिस्थितीत वाहतूक आराखडा बदलण्यात आला आहे. भाविकांना जास्त चालावे लागू नये म्हणून, मेळ्याच्या प्रवेशद्वारापर्यंत ई-रिक्षा आणि ऑटो नेण्याची सुविधा करण्यात आली.

# तीन हजार कोटींची संपत्ती सोडून निवडला अध्यात्माचा मार्ग

उत्तरप्रदेशातील प्रयागराजमध्ये १३ जानेवारीपासून सुरू झालेला महाकुंभ २६ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. या महाकुंभासाठी देश-विदेशातून कोट्यवधी भाविक येत आहेत. याशिवाय अनेक संत आणि साधू पाहायला मिळाले आहेत. मग आयआयटी बाबा असो, काटेवाले बाबा असो, रुद्राक्ष बाबा असो किंवा नागा साधू असो... अनेक बाबांची सोशल मीडियावर जोरदार चर्चा होत आहे.

आता कुंभमेळ्यातून एक नवीन बाबा समाज माध्यमांवर चर्चेत आले असून, त्यांचे नाव बिझनेसमन बाबा आहे. हे बाबा व्हायरल होण्याचे कारण म्हणजे, त्यांनी तीन कोटींची संपत्ती आणि आलिशान आयुष्य मागे टाकून अध्यात्माचा मार्ग निवडला आहे. त्यामुळेच या बिझनेस बाबाची कहाणी समाज माध्यमांवर चांगलीच व्हायरल होत आहे.

### महाकुंभात 'बिझनेसमन बाबां'ची चर्चा



**संपत्ती समाधान देऊ शकत नाही**

या बाबांनी सांगितले की, विलासी आणि सुखसोयींनी भरलेले जीवन जगल्यानंतर समजले की, संपत्ती माणसाला समाधान देऊ शकत नाही. त्यामुळेच मी संन्यास घेण्याचा निर्णय घेतला. बिझनेस बाबांचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

# ५०० रुपयांमध्ये 'फोटो स्नान', जाहिरात व्हायरल

महाकुंभादरम्यान त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केल्याने आशीर्वाद मिळतो, अशी मान्यता आहे. त्यामुळे त्रिवेणी संगमात स्नान करण्यासाठी दररोज लाखो लोकांची गर्दी दिसून येत आहे. काही लोक इच्छा असूनही महा कुंभमेळ्यात जाऊ शकत नाहीत. अशा लोकांसाठी सध्या एक जाहिरात व्हायरल होत आहे. ही जाहिरात पाहून कोणीही थक्क होईल. सध्या या जाहिरातीचा फोटो समाज माध्यमांवर तुफान व्हायरल होत आहे.

जे लोक प्रत्यक्ष कुंभमेळ्यात जाऊ शकत नाही, ते फक्त ५०० रुपयांमध्ये फोटो स्नान करू शकतात, असे या जाहिरातीमध्ये म्हटले आहे. यात धार्मिक स्थळ दाखवणारा एक फोटो लावला आहे. या फोटोच्या वर मोठ्या अक्षरात महाकुंभ-२०२५ असे लिहिले आहे. त्यानंतर फोटो खाली लिहिले की, १४४ वर्षांतून एकदा येणारी संधी ही पवित्र महाकुंभाश्र स्नान करण्याची तुमची शेवटची आहे. ती चुकवू नका. तुमचे छायाचित्र आम्हाला व्हॉट्सॲप नंबरवर पाठवा. आम्ही तुमचे छायाचित्र घेऊ. तुम्ही पाठवलेल्या फोटोकॉपी आम्ही काढू आणि तुमच्या फोटोसह पवित्र पाण्यात स्नान करू.

सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ वकील संजय हेगडे यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये या जाहिरातीचा फोटो शेअर केला आहे. या फोटोच्या कॅप्शनमध्ये त्यांनी लिहिलेय्, जर मी ५०० रुपयांच्या नोटेचा फोटो पाठवला तर..?

या व्हिडीओवर अनेक युजर्सनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका युजरने लिहिले, तुम्हाला स्नान करतानाचा एआय इमेज पाठवतील. तर एका युजरने लिहिले, फक्त १४४ रुपये घ्यायला पाहिजे होते आणखी एका युजरने लिहिले की, सर तुम्हाला फक्त ई-मोक्ष मिळेल. एक युजर लिहितो, महाकुंभाचे चेष्टेत रूपांतर झाले आहे. तरुण पिढी हे सर्व चुकीच्या पद्धतीने लक्षात ठेवेन. एक युजर लिहितो, हे फक्त भारतात होऊ शकते.

# व्हीआयपी घाटावर नावाड्यांची पोलिसाला मारहाण

प्रयागराज येथील महाकुंभ परिसरातील व्हीआयपी घाटावर एक गंभीर घटना समोर आली आहे. येथे तैनात असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यावर खाजगी नावाड्यांनी हल्ला केला आणि त्याची मौल्यवान सोन्याची साखळी हिसकावून घेतली.

रामनगर वाराणसी येथील ३६व्या बटालियन पीएसीचे कॉन्स्टेबल अमित कुमारसिंग सध्या व्हीआयपी घाट जेट्टी येथे तैनात आहेत. त्यांच्या मते, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार बोट ऑपरेशन्स बंद करण्यात आले होते. दरम्यान, मोठ्या संख्येने खाजगी नावाडी जेट्टीवर आले आणि त्यांनी प्रशासनाविरुद्ध घोषणाबाजी सुरू केली. पोलिसांनी समजावण्याचा प्रयत्न केल्यानंतर जमाव संतप्त झाला. नावाड्यांनी पोलिस कर्मचाऱ्यांवर हल्ला केला. यानंतर त्याची सोन्याची साखळी हिसकावून घेण्यात आली.



# 'इलेक्ट्रो' प्रदर्शन महावितरणच्या विजेवर

## महावितरणकडून ५१५ किलोवॅट क्षमतेची वीजजोडणी; डिझेलचा खर्च आणि प्रदूषण टळणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

येथील होम मैदानावर सुरु असलेल्या 'इलेक्ट्रो' या प्रदर्शनाला पहिल्यांदाच महावितरणच्या वीज जोडणीचे 'बुस्ट' मिळाले आहे. आजवर हे प्रदर्शन डिझेल जनरेटरवर भरवले जात होते. त्यामुळे हजारो लिटर डिझेला खर्च तसेच त्यापासून होणारे ध्वनी व वायू प्रदूषण यापासून सोलापुरकरांना दिलासा मिळाला आहे. याच प्रदर्शनात महावितरणनेही स्टॉल उभारुन विविध योजनांचा प्रचार-प्रसार सुर केला आहे.

सोलापूर शहरात १२ ते १८ फेब्रुवारी दरम्यान होम मैदानावर 'इलेक्ट्रो' हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. १९९९ पासून सुरु झालेल्या प्रदर्शनाचे हे रौप्य म होत्सवी वर्ष आहे. लाखो नागरिक या प्रदर्शनाला भेट देऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेतात. या प्रदर्शनाला आयोजकांकडून दरवर्षी जनरेटरवर वीजपुरवठा करण्यात येत होता. त्यासाठी मोठा खर्च व्हायचा. तसेच त्यातून ध्वनी व वायू प्रदुषणही व्हायचे. परंतु यावेळी आयोजकांनी वीजपुरवठ्याकरिता महावितरणच्या सोलापूर मंडल कार्यालयाशी संपर्क केला.

तेव्हा अधीक्षक अभियंता सुनील माने व शहर विभागाचे कार्यकारी अभियंता आशिष मेहता यांच्या पुढाकारातून प्रदर्शनाला केवळ दोन दिवसांत एकूण ५१५ किलोवॅट दाबाचा वीजपुरवठा ६ वीजजोडण्यांद्वारे करण्यात आला.

'इलेक्ट्रो' प्रदर्शनात स्टॉल क्र. ४ च्या माध्यमातून महावितरण प्रधानमंत्री सूर्यघर- मोफत वीज योजना, मागेल त्याला सौरकृषी पंप योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, अभय योजना आदी योजनांचा प्रसार करत आहे. सर्व वीज ग्राहकांनी या स्टॉलला मोठ्या संख्येने भेट देऊन विविध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन महावितरण सोलापूर मंडलाचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांनी केले आहे.

# ६५ वर्षांवरील ऑटोरिक्षा चालकांना मिळणार १० हजार

**मुंबई, १३ फेब्रुवारी,**

धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटोरिक्षा, मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाच्या सदस्यांमधील ६५ वर्षांवरील ऑटोरिक्षा व टॅक्सीचालकांना प्रत्येकी १० हजार रुपये सन्मान निधी दिला जाईल अशी, माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. कल्याणकारी महामंडळाची पहिली बैठक झाली.

यावेळी ते बोलत होते. सरनाईक म्हणाले, चालकांना जीवन विमा, अपंग विमा, त्यांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, कर्तव्यवर असताना चालकाला दुखापत झाल्यास या कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून अर्थसहाय्य केले जाईल. महाराष्ट्रात ९ ते १०लाख ऑटोरिक्षा व मीटर टॅक्सी आहेत. या असंघटित क्षेत्रातील ऑटोरिक्षा व मीटर टॅक्सी चालकांना सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचा लाभ पुरवणे या उद्देशाने धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटोरिक्षा, मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली. सभासद नोंदणी राज्यभरातील सर्व रिक्षा व मीटर टॅक्सी चालकांना ५०० रुपये नोंदणी शुल्क व ३०० रुपये वार्षिक वर्गणी भरून या मंडळाचे सदस्यत्व घेता येईल.

## अग्रलेख...

# शंभराव्या जन्माची प्रतीक्षा

बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेची शकले होण्याच्या काही दिवसच अगोदर महाराष्ट्रात राज्यसभेच्या निवडणुका पार पडल्यामुळे लाभलेल्या सुदैवातून खासदारकी प्राप्त झालेले शिवसेनेचे नेते व प्रवक्ते संजय राऊत यांनी उद्धव ठाकरे यांच्याशी एकनिष्ठ राहून केलेल्या प्रदीर्घ राजकीय तपश्चर्येतून त्यांना काहीच प्राप्त झाले नाही असे मानणे योग्य नसले तरी केवळ नेत्याशी एकनिष्ठ राहिल्याने राजकीय भविष्याची आश्वस्त हमी मिळत नाही याची त्यांना आता निश्चितच जाणीव झाली असेल. अन्यथा, गेल्या पाच वर्षांपासून सुटत चाललेला राजकीय तोल सावरण्यासाठी आजकाल नव्या जोमाने नव्या कसरती करण्याची व त्यातून नव्याने तोल ढळण्याची वेळ त्यांच्यावर आली नसती. शिवसेनेचे पक्षप्रमुख असलेल्या उद्धव ठाकरे यांच्या एककल्ली राजकारणास कंटाळून त्यांच्या नेतृत्वास आव्हान देत पक्षाचा कब्जा घेणाऱ्या एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा भाजपासोबतच्या नैसर्गिक युतीचा धागा जोडून राज्यात सत्तासंपादनाचा यशस्वी प्रयोग केल्यापासून ठाकरे गटात होणाऱ्या तिळपापडाला राऊत यांनी सातत्याने फोडणी दिली. राजकारणाची पातळी घसरल्याची खंत अलिकडे सर्व जण व्यक्त करत असले तरी त्याचे बरेचसे श्रेय राऊत यांनाही द्यावे लागेल. विधिमंडळाविषयी त्यांनी काढलेले उद्गार, भाजपा व शिंदे यांच्या शिवसेनेतील नेत्यांविषयी त्यांनी केलेल्या टीकाटिप्पणी या नोंदी गेल्या दशकभरातील महाराष्ट्रातील राजकारणाच्या पानोपानी पाहावयास मिळतात. त्यातच आता एकनाथ शिंदे यांना थेट दिल्लीत होऊ घातलेल्या साहित्य संमेलनाच्या यजमानांनी मानाचा पुरस्कार देऊन गौरविल्याने ठाकरे गटातील धुमसत्या द्वेषाला नव्या उकळ्या फुटल्या असून राऊत यांच्या मुखातून या द्वेषाला वाचा फुटल्याने पुन्हा एकदा राजकारणाची संस्कृती पणाला लागणार आहे. एकनाथ शिंदे यांना हा पुरस्कार साहित्य संमेलनाच्या मंचावरून मिळाल्याने राऊत यांनी साहित्यिकांची दलाल म्हणून संभावना केली, तेव्हा शिवसेनेचा इतिहास जाणणाऱ्यांना बाळासाहेब ठाकरे यांची निश्चितच आठवण झाली असेल.

सुमारे तीन दशकांपूर्वी, १९९६ मध्ये राज्य सरकारने पु. ल. देशपांडे यांना जाहीर केलेला महाराष्ट्र भूषण पुरस्कार स्वीकारताना पुलंनी राज्यकर्त्यांची सभ्य भाषेत कानउघाडणी केल्याने संतप्त झालेल्या बाळासाहेबांनी पुलंची 'मोडका पूल' अशा शब्दांत निर्भर्त्सना करून साहित्यिक वर्तुळावरही ताशेरे झोडले होते. या समारंभात पुलंनी सरकारवर टीकेचा सूर लावल्याने, 'झक मारली आणि पुरस्कार दिला' अशी टोकाची भावना बाळासाहेबांनी व्यक्त केलीच, पण 'साहित्यिकांना काय कळते, त्यांचा समाजाला काय उपयोग', अशा शब्दांत साहित्यक्षेत्रालाही झोडपल्याने राज्यात राजकीय वादळ माजले होते. मात्र त्यानंतर बाळासाहेबांनी स्वतः पुलंची पुण्यात भेट घेऊन माफीदेखील मागितली होती. साहित्य संमेलनाने एकनाथ शिंदे यांना महादजी शिंदे यांच्या नावाचा पुरस्कार जाहीर केल्यानंतर संजय राऊत यांनी बाळासाहेबांच्या थाटात साहित्यिकांची दलाल या शब्दात संभावना केली असली तरी त्यांची उंची बाळासाहेबांएवढी निश्चितच नसल्याने त्यांच्या सुटलेल्या संयमातून त्यांनी साहित्यविश्वाचाही अपमान केला आहे. पण एकनाथ शिंदे यांच्या पुरस्कारामुळे तिळपापड होण्याचे ते एकमेव कारण नव्हे. २०१९ मध्ये सत्तेची गणिते जुळविण्यासाठी शिवसेना-भाजपा युतीत फुटीचा बिब्बा घालून व त्यासाठी उद्धव ठाकरे यांनाच फूस लावून मुख्यमंत्रिपदी बसविणाऱ्या शरद पवार यांनीच शिंदे यांना पुरस्कार प्रदान केला ही राऊत यांची दुखरी नस ठरली आहे. एवढेच नाही, तर महाराष्ट्राच्या राजकारणाला एकनाथ शिंदे यांनी योग्य दिशा दिल्याचा गौरवास्पद उल्लेख करून पवार यांनी ठाकरे यांनाच अप्रत्यक्ष कानपिचक्या देत राजकारणातील वाऱ्यांच्या बदलत्या भविष्याची जाणीव करून दिल्याने आपले भविष्य अस्थिर होण्याच्या भीतीने ग्रासलेल्या राऊत यांच्या मनातील अस्वस्थतेला तोंड फुटले आहे. ठाकरे गट म्हणजे महाराष्ट्र नव्हे, याची जाणीव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याआधी अनेकदा करून दिली आहे. विधानसभेच्या ताज्या निवडणूक निकालांतून महाराष्ट्रानेही ठाकरे गटात हाच संदेश दिला आहे. त्यामुळे ठाकरे गटात पसरलेली अस्वस्थता किंवा पवार यांनी शिंदे यांना दिलेल्या पुरस्काराने महाराष्ट्राचा अपमान झाल्याची राऊत यांची भावना अनाठायी तर ठरतेच, पण या निमित्ताने राज्यातील महाविकास आघाडीत ठाकरे गट एकाकी पडण्याच्या प्रारंभाची जाणीव झाल्याचे संकेतही देते. राज्यातील विधानसभा निवडणुकीआधी या आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून उद्धव ठाकरे यांच्या नावाचे घोडे पुढे दामटण्यासाठी याच राऊत यांनी जंग जंग पछाडले होते, पण पवार यांनीही त्यांची तेव्हाही निराशा तर केलीच, आणि आता तर महाराष्ट्राला दिशा देण्याचे काम शिंदे यांनी केल्याचे गौरवोद्गार काढून एक प्रकारे ठाकरे गटाच्या राजकारणावर खापरच फोडल्याने शेवटाची सुरुवात झाल्याची जाणीवही राऊत यांना झाली असावी. राऊत हे ठाकरे यांच्याप्रमाणे शरद पवार यांचेही निष्ठावंत मानले जातात. शरद पवार समजण्यासाठी शंभर जन्म घ्यावे लागतील असे सांगणाऱ्या राऊत यांना आता आपल्या त्याच वक्तव्याची आठवणही झाली असेल आणि पवार यांना समजून घेणे आपल्यालाही साधले नाही याची त्यांनी स्वतःच्या मनाशी कबुलीही दिली असेल यात शंका नाही. ज्या पवार यांनी उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदी बसविले त्यांनीच विधानसभा निवडणुकीआधी ठाकरे यांना मविआच्या मुख्यमंत्रिपदाचा चेहरा म्हणून मान्यता देणे नाकारले आणि तेच पवार आता शिंदे यांच्या राजकारणाची स्तुती करतात हे पाहून, पवार यांना समजून घेण्यासाठी आपल्यालाही शंभर जन्म घ्यावे लागतील याची जाणीव राऊत यांना झाली असेल.

राऊत यांची विद्यमान खासदारकीची मुदत संपेल तोपर्यंत ठाकरे यांच्या गटाची राजकीय स्थिती नेमकी कशी असेल, आज त्यांच्यासोबत शिल्लक असलेले आमदार-खासदार उद्याही त्यांच्यासोबत असतील का, याची खुद्द ठाकरेंनाही खात्री राहिलेली नाही. राज्यसभेची राऊत यांची मुदत संपेल तेव्हा त्यांना पुन्हा उमेदवारी मिळालीच, तरी विधानसभेतून राज्यसभेवर निवडून जाण्यासाठी लागणारी मतांची गोळाबेरीज करणे एकट्या ठाकरे गटास शक्य नाही, हे आताच स्पष्ट झाले आहे. त्यामुळेच, राऊत यांनी आपल्या राजकीय निष्ठांचा मोठा वाटा शरद पवार यांच्या चरणांशी ठेवला असावा. शरद पवार यांनी आता एकनाथ शिंदे यांच्या राजकारणास मान्यता दिली असून, महाराष्ट्राच्या राजकारणाला दिशा देण्याचे श्रेयदेखील शिंदे यांना दिल्याने, राज्याची घडी बिघडविण्याचे काम कोणी केले याकडे अंगुलिनिर्देश करणारे अप्रत्यक्ष संकेतही दिले आहेत. राज्याला पुन्हा रुळावर आणल्याखेरीज हा म्हातारा स्वस्थ बसणार नाही, अशी प्रतिज्ञा खुद्द पवार यांनी एकदा विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान केली होती. ते काम आता तर एकनाथ शिंदे यांनी केलेच आहे आणि पवार यांनीच तसे प्रशस्तिपत्र शिंदे यांना बहाल केले आहे. कदाचित त्यामुळेच, शिंदे यांना पुरस्कार प्रदान करण्याच्या सोहळ्यात बोलताना महाराष्ट्राला दिशा मिळाल्याचे समाधान पवार यांच्या शब्दांतून ओसंडत असावे. शिंदे यांच्या राजकारणाची पवार यांच्याकडून होणारी स्तुती म्हणजे एक प्रकारे ठाकरे यांच्या राजकारणाची अप्रत्यक्ष निंदा असल्याचे पवार यांच्या आजवरच्या राजकीय खेळींवरून समजू शकते.

थोडक्यात, शिंदे यांचा सत्कार करून त्यांच्या राजकारणाचा गौरव करणाऱ्या शरद पवार यांच्याकडून ठाकरे गटास भविष्यातील राजकारणासाठी योग्य तो संदेश दिला गेला आहे. एका समारंभाच्या निमित्ताने महाविकास आघाडी, ठाकरे गट आणि सत्ताधारी युतीविरोधातील राजकारणाचे भविष्य डळमळीत करून पवार यांनी केलेली तिहेरी खेळी पाहता, महाविकास आघाडी किती काळ टिकणार याची जाणीव महाराष्ट्राला होऊ लागली आहे. पवार यांनी शिंदे यांचा सत्कार केल्यामुळे महाराष्ट्र अस्वस्थ झालेला नाही, तर यामुळे निर्माण झालेल्या अस्थिर भविष्याच्या जाणिवेने ठाकरे गट मात्र नक्कीच अस्वस्थ झाला आहे. आता महाविकास आघाडीतून हा गट बाहेर पडतो, की महाविकास आघाडीचेच विसर्जन होते, याचीच महाराष्ट्राच्या राजकारणास उत्सुकता शिल्लक आहे.

## प्रासंगिक

# पिण्डस्थ पंच प्रयाग

**धर्मभास्कर सद्गुरूदास**

प्रयागराजला गंगा, यमुना व गुप्तस्वरूपातील सरस्वती या तीन पवित्र नद्यांचा संगम आहे. त्यामुळे त्या ठिकाणी प्रयागतीर्थ निर्माण झालेले आहे. अशी आणखी पाच प्रयागतीर्थे हिमालयामधून वाहणाऱ्या नद्यांच्या संगमस्थानी देखील आहेत.

हिमालयाच्या मस्तकस्थानाहून निघालेल्या अलकनंदा व धौलीगंगाच्या संगमस्थानी विष्णुप्रयाग आहे. पुढे या गंगा प्रवाहाला मंदाकिनी येऊन मिळते. तिथे नंदप्रयाग निर्माण झाले आहे. हा गंगाप्रवाह पुढे सरकत गेला की पिंडर नदी या गंगौघाला येऊन मिळते. तिथे कर्णप्रयाग क्षेत्र निर्माण झाले आहे. पुष्ट झालेला हा अमोघ प्रवाह पुढे प्रवाहित होताना मंदाकिनीचा नेत्रहर्षक प्रवाह तीत सामील होतो. या ठिकाणी रुद्रप्रयाग तीर्थ निर्माण झाले आहे. गंगोत्रीहून निघालेली भागीरथी अलकनंदेच्या खळखळत्या प्रवाहाला मिठी मारते. तिथे देवप्रयाग तीर्थ निर्माण झाले आहे. आणि हा गंगौघ यमुना आणि सरस्वतीच्या प्रवाहात विलीन होतो. तिथे वर सांगितल्याप्रमाणे प्रयागतीर्थ निर्माण झाले आहे.

'पिंडी ते ब्रह्मांडी' - या न्यायानुसार हिमालयातील या नद्यांप्रमाणेच आपल्या शरीरातही बहात्तर हजार प्राणशक्तीवाहक नाड्यारूपी नद्या अस्तित्वात आहेत. त्यातील शंभर नाड्या प्रमुख असून त्यातील चौदा नाड्या मुख्य आहेत. या चौदा नाड्या कुंडलिनीच्या आश्रयाने मूलाधार चक्राच्या वर योगिजनांना दिसतात. इडा, पिंगला, सुषुम्ना, सरस्वती, वारुणी, पूषा, हस्तीजिव्हा, यशस्विनी, विश्वोदरी, कुहू, शंखिणी, पयस्विनी, अलंबूसा आणि गांधारी या त्या चौदा मुख्य नाड्यारूपी सरिता आहेत. यापैकी सुषुम्ना नाडी विश्वाला धारण करणारी आणि मोक्षाला जाण्याचा मार्ग म्हटलेली आहे. ती गुदाच्या मागून पाठीच्या मेरुदंडातून मस्तकातील ब्रह्मरंध्रापर्यंत जाते. ती व्यक्त पण सूक्ष्म असून ब्रह्मरंध्रात ती वैष्णवी होते. अतिसूक्ष्मां च तन्वीं च शुक्लां नाडीं समाश्रयेत। असे क्षुरिकोपनिषदात म्हटलेले आहे. त्यात पुढे असे म्हटले आहे की, 'इडा तिष्ठति वामेन पिङ्गला दक्षिणेन तु । तयोर्मध्ये वरं स्थानं यस्तं




वेद स वेदवित्।।' म्हणजे सुषुम्नेच्या डाव्या बाजूला इडा आणि उजव्या बाजूला पिंगला या दोन नाड्या असून दोघींमध्ये सुषुम्नेचे श्रेष्ठ स्थान आहे. 'इडायां चन्द्रश्चरति पिङ्गलायां रविः सुषुम्नु पृष्ठापार्श्वयोः सरस्वती कुहू भवतः ।।' अर्थात इडेला चंद्र नाडी आणि पिंगलेला सूर्य नाडी संबोधिले जाते. सुषुम्नेच्या दोन्ही बाजूला सरस्वती आणि कुहू नाड्या आहेत.

इडा नाडी डाव्या नाकपुडीतून मूलाधार चक्रापर्यंत जोडलेली आहे. हिलाच चंद्र नाडी म्हणतात. तन्त्रयोगातील हीच यमुना आहे. उजव्या नाकपुडीतून सूर्य नाडी मूलाधार चक्राला जोडलेली आहे. योगमार्गातील या गंगा व यमुना आपल्याला परिचित आहेत. कारण याच नाड्यांनी आपण श्वासोच्छ्वास करतो. मात्र सुषुम्ना गुप्त आहे. ती तीव्र साधनेनेच प्रकट होते.

गंगा व यमुना या अधोगामी तर सुषुम्नेतील सरस्वती ऊर्ध्वगामी आहे. दीर्घ प्राणायामाने साधक ज्यावेळी केवळ कुंभक साधतो त्यावेळी इडा, पिंगला या नाड्यांतून वाहणाऱ्या यमुना आणि गंगा मूलाधाराच्या जवळ पोहोचतात आणि त्यांच्या तीव्र स्पर्शाने सर्पाकार वेटोळे घातलेली अधोगामी निद्रिस्त कुंडलिनी जागृत होते. जागृत झालेल्या सर्पाने आपला फणा वर काढावा तशी कुंडलिनी ऊर्ध्वगामी होते. कुंडलिनीचे मुख्य द्वार अलगद उघडते आणि इडा-पिंगला या गंगा-यमुनांनी वाहून आणलेला वायुरूपी प्रवाह सुषुम्नेच्या मागील भागातील सरस्वतीशी संगम करतो. हाच मूलाधाराजवळील प्रयाग संगम आहे. येथूनच कुंडलिनी शक्ती जागृत झाल्यानंतर सुषुम्ना नाडीच्या माध्यमातून ऊर्ध्वगामी होऊन षट्चक्रे भेदन करून सहस्राराला मिळते व साधकाला जिवा-शिवाच्या ऐक्याची प्रचीती येते.

प्रारंभी सांगितल्याप्रमाणे अलाहाबादच्या प्रयाग संगमापासून हिमालयाकडे उत्तरोत्तर वर जाणारे देवप्रयाग, रुद्रप्रयाग, कर्णप्रयाग, नंदप्रयाग आणि विष्णुप्रयाग असे पाच प्रयाग ओलांडले की शिवाचे/विष्णूचे दर्शन होते. त्याप्रमाणे मूलाधार चक्रापासून सुषुम्नेतील शक्तिप्रवाह वर वर सरकू लागला की स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध आणि आज्ञाचक्र असे अनेक नाड्यांनी मिळून बनलेले कमलाकार पंचप्रयाग लागतात. यातील प्रत्येक प्रयागाचे वर्णही वेगवेगळे आहेत. जिज्ञासू साधकाच्या जिज्ञासापूर्तीसाठी ते थोडक्यात असे वर्णन करता येतील.

मूलाधाराच्या ठिकाणी चार पाकळ्यांचे कमळ आहे. त्याचा वर्ण रक्त आहे. स्वधिष्ठानाच्या ठिकाणी षट्दलपत्रांचे कमळ आहे ते पीत वर्णीय आहे. नाभीस्थानी मणिपूर चक्रात दहा पाकळ्यांचे कमळ आहे. ते नील वर्णाचे आहे. हृदयस्थानी अनाहत चक्राच्या ठिकाणी बारा पाकळ्यांचे कमळ आहे. ते सिंदूर वर्णाचे आहे. कंठस्थानी विशुद्ध चक्राच्या ठिकाणी सोळा पाकळ्यांचे कमळ आहे. ते धूम्रवर्णीय आहे. दोन भ्रुकुटींच्या मध्यावर आज्ञाचक्र आहे. हे द्विदल कमळ शुक्ल वर्णाचे आहे. मूलाधारापासून आज्ञाचक्रापर्यंतचा प्रवास म्हणजे प्रयाग ते वाराणसीपर्यंतचा प्रवास आहे. कारण भ्रूमध्याच्या ठिकाणी इडा, पिंगला; वारुणी आणि असी या नाड्यांचा संगम होऊन वाराणसी तीर्थ बनले आहे. येथून सहस्रारचक्रापर्यंत प्राणशक्तीचा प्रवाह पोहोचला की कैलासपतीचे दर्शन होते. अशा प्रकारे पिंडातील हे सरितामाहात्म्य जाणून घ्यावे व अधिकारी सद्गुरूंच्या मार्गदर्शनाखाली त्याचे यथार्थ ज्ञान करून घेऊन मोक्षप्राप्ती करून घ्यावी.

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# कधी होणार कॉपीमुक्त देश?

राज्यात सध्या बारावीची परीक्षा सुरू आहे. लवकरच दहावीचीही परीक्षा सुरू होईल. यानिमित्ताने एक नवीन विषय पुन्हा चर्चेत येतो आणि तो म्हणजे कॉपीचा. परीक्षेत कुणालाही कॉपी करता येणार नाही असा बंदोबस्त करण्यात आल्यानंतरही राज्यात अनेक ठिकाणी कॉपीचे प्रकार दरवर्षी घडतातच. कसे घडतात, हे जगजाहीर आहे. अनेक ठिकाणी मुलं कॉपीसाठी वेगवगेळे फंडे वापरतात, अनेक ठिकाणी मुलांचे दोस्तमित्र कॉपी पुरवतात, अनेक ठिकाणी त्यांचे पालकच यात सामील होतात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे अनेक ठिकाणी चक्क शिक्षकच मुलांना कॉपी करायला मदत करतात. अशा आशयाच्या असंख्य बातम्या गतकाळात आम्ही प्रकाशित केल्या आहेत. कॉपी करून पास होणारी मुलं ही उद्याच्या भारताचे भविष्य आहेत, असे आम्ही कसे म्हणणार? कॉपी करून गुणवत्ता यादीत येणाऱ्या मुलांची भविष्यातील कामांची गुणवत्ता काय असेल, याचा विचार आम्ही कधी करणार आहोत की नाही? आताच विचार करून उपाय योजला नाही तर भविष्यातला भारत कसा असेल याची तर कल्पनाही न केलेली बरी हो!

वर्षभर मुलं शाळाकॉलेजात काय करतात? शिक्षक त्यांच्या अभ्यासक्रमाबाबत गंभीर असतात का, जर शिक्षक गंभीरपणे शिकवत असतील अन मुलंही गांभीर्याने अभ्यास करीत असतील तर मुलांना कॉपी करण्याची गरज का भासते? अशी कॉपी करणारी मुलं भविष्यात त्यांना द्याव्या लागणाऱ्या प्रवेश परीक्षांमध्ये कशी टिकाव धरतील? सरकारी नोकऱ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांमध्ये या मुलांचा टिकाव कसा लागेल? शिवाय, ज्यांना सरकारी नोकऱ्या लागत नाहीत त्यांना खाजगी क्षेत्रात नोकरी करावी लागते. खाजगी क्षेत्रात तर गुणवत्तेच्या आधारे नोकरी दिली जाते अन स्वयंरोजगार करायला कौशल्य अंगी असावे लागते. मग, कॉपी करून दहावी, बारावी आणि पदवी परीक्षा उत्तीर्ण होणारी मुलं स्पर्धेत तर टिकणार नाहीतच, स्वयंरोजगारही करू शकणार नाहीत. कॉपी करून करून पदवी मिळवलेली मुलं म्हणजे बेरोजगार तरुणांची मोठी फौज होईल आणि त्यांना सांभाळण्याचा मोठाच प्रश्न त्यांच्या पालकांपुढे, या समाजापुढे अन देशापुढेही असेल.

यावर आताच तोडगा काढण्याची गरज आहे. कारण, देशात आजच बेरोजगार तरुणांची संख्या कोट्यवधींच्या घरात आहे. पाच ते दहा लाख तरुण-तरुणी सरकारी नोकरीसाठी अर्ज करतात अन त्यातून हजारपाचशेच फक्त निवडले जातात, मग बाकीच्यांनी काय करायचे? ज्यांना सगळे प्रयत्न करूनही वयाच्या तिशीपर्यंत नोकरी मिळत नाही, त्यांनी स्वयंरोजगाराचे माध्यम शोधावे, असा सल्ला त्यांना दिला जातो. पण, स्वयंरोजगारासाठी तर परिश्रम करावे लागतात, जिद्द बाळगावी लागते, समर्पण भाव असावा लागतो, आत्मविश्वास असावा लागतो. हे सगळे गुण जर परीक्षा देताना या मुलांच्या अंगी नसतील तर ते भविष्यातही कुठून येणार हो? असे जर होणार नसेल तर ही बेरोजगारांची फौज पोसायची कुणी? फार मोठा प्रश्न आहे. अगदी यक्ष प्रश्न आहे. कॉपी कशी थांबवायची हाही खरोखरीच यक्ष प्रश्न आहे. एवढी वर्षे उलटल्यानंतरही यावर आपल्याला तोडगा सापडू नये, याला काय म्हणायचे? आपण प्रयत्नच केले नाहीत की केलेल्या प्रयत्नांना योग्य दिशा नव्हती? नेमके कुठे चुकले हे शोधण्याची आणि त्यावर योग्य उपाय करण्याची गरज निर्माण झाली आहे. जी मुलं परीक्षा देणार आहेत, ती कॉपी करण्याचा विचारही करू शकणार नाहीत, अशी यंत्रणा आम्ही एवढ्या वर्षांत का विकसित करू शकलो नाही? परीक्षेत कॉपी करणे आणि अन्य गैरमार्गाचा वापर करून चांगले गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची पिढी घडविण्याच्या मागे आम्ही का म्हणून लागलो आहोत? लक्ष्यप्राप्तीसाठी अर्थात, परीक्षा पास करण्यासाठी मुलांकडून कॉपीरुपी शॉर्टकट का वापरला जातो, याला कोण जबाबदार आहे, याचा शोधही आता घेतला पाहिजे. परीक्षा देणारे विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक, शाळा-महाविद्यालये वा मग प्रशासन, यापैकी नेमकी जबाबदारी कुणाची, हे तर शोधून काढायलाच हवे ना! नुसते शोधून काढून उपयोग होणार नाही. त्यावर उपायही करावा लागेल. पण, हा उपाय कुणी करायचा, हाही पुन्हा एक प्रश्नच आहे. उद्याच्या भारताचे भविष्य असलेल्या विद्यार्थ्यांच्या करीअरची इमारत जर कॉपीच्या पायावर उभी असेल तर अशी इमारत मुदतपूर्व ढासळेल अन त्यात जखमी कोण होईल आणि मृत्यु कुणाचा होईल, हे वेगळे सांगण्याची गरज आहे?

९८८१९०३७६५

## दखल

# सुशासनाच्या दिशेने महाराष्ट्र

**मोरेश्वर बडगे**

महायुती सरकार सत्तेत आल्यापासून एक बातमी सातत्याने वृत्तवाहिन्यांवर ऐकायला मिळते. कोणी ना कोणी नाराज आहे. समाधानी राजकारणी तुम्ही कधी पाहिला आहे का? कार्यकर्त्याला आमदार व्हायचे असते. आमदाराला मंत्री व्हायचे असते. मंत्र्याला उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्री व्हायचे असते. आता तर पालकमंत्रीही व्हायचे असते. (अजितदादा पुणे आणि बीडचे पालकमंत्री आहेत.) अपेक्षा इथेच संपत नाहीत. त्यांना त्यांचे पी. ए. म्हणजे खाजगी सहायक, ओएसडी म्हणजे ऑफिसर व स्पेशल ड्युटी आपले निकटवर्तीच हवे असतात. त्यातून हितसंबंधीयांचे कडबोळे तयार होते. आतापर्यंत हेच चालले. मात्र आता हे चालणार नाही. कारण देवाभाऊचा जमाना आला आहे. तुमच्या एक लक्षात आलं असेल. 'आम्ही सुशासन, पारदर्शक सरकार देऊ' असे प्रत्येक नवा मुख्यमंत्री छाती फुगवून सांगतो. काही दिवस तसे दिसतेही. पुढे तोही या 'सिस्टिम'चा एक भाग बनून जातो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वच्छ कारभार देण्याचा चंग बांधला आहे. त्यामुळे काहींची अडचण होत असेल. ते स्वाभाविकही आहे. सगळे प्रश्न सोडविण्याची जादूची कांडी कोणाकडेही नाही. पण प्रश्नांना भिडून त्यांची उत्तरं शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. ते सोडविण्याची इच्छाशक्ती कोण दाखवतो, हा खरा प्रश्न आहे.

फडणवीस यांचा सुशासनावर भर आहे हे एव्हाना महाराष्ट्राच्या लक्षात आले असेल. त्यांना सरकारची जनमानसातील प्रतिमा उंचवायची आहे. प्रत्येकाला हे आपलं सरकार आहे, असे वाटले पाहिजे. आपली कामं होत आहेत, असे जाणवले पाहिजे. त्यांना 'दलालमुक्त मंत्रालय' अपेक्षित आहे. सरकार म्हणजे पाण्यात बसलेली म्हैस आहे. उठता उठत नाही. सरकार उठले पाहिजे, धावले पाहिजे अशी सामान्य माणसाची अपेक्षा असते. तसे व्हायचे असेल तर सरकारच्या 'वर्क कल्चर'मध्येच बदल करावा लागेल, हे फडणवीस यांनी ओळखले. त्या दिशेने फडणवीसांनी 'ऑपरेशन' चालवले आहे. स्वच्छ चारित्र्याचे कार्यक्षम अधिकारी ते मदतीला घेत आहेत. रिझल्ट देऊ शकतील असे अधिकारी घेत आहेत. श्रीकर परदेशी यांची निवड तेच सांगते. पिंपरी चिंचवडमध्ये असताना अनधिकृत बांधकामे पाडून परदेशी यांनी हिंमत दाखवली. भाजपा परिवारातील चंद्रशेखर वाझे यांना ओएसडी म्हणून उचलले आहे. प्रतिनियुक्तीवर येणारा एकेक अधिकारी तावूनसुलाखून घेत आहेत. अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या जात आहेत. मागचा रेकॉर्ड पाहिला जातोय.



मंत्रालयाच्या इतिहासात हे प्रथमच होत आहे. आपल्या सहकारी मंत्र्यांनीही स्वच्छ चारित्र्याचे अधिकारी घ्यावेत, अशी फडणवीसांची अपेक्षा आहे. हेडमास्टरच्या भूमिकेत आहेत फडणवीस. राजकारणाचाच चिखल झाला आहे. तिथे चांगले अधिकारी कुठून मिळणार? सज्जनशक्तीने राजकारणात यावे, असे खूप बोलले जाते. पण तुम्ही पाहाल, तेच तेच चेहरे दिसतात. फडणवीसांना ही साखळी तोडायची आहे. त्यामुळे काही मंत्र्यांच्या मदतनीस अधिकाऱ्यांच्या नेमणुका रखडल्या आहेत. त्यावरून शिवसेनेचे काही मंत्री अस्वस्थ आहेत. हाताशी अधिकारीच मिळाले नाहीत तर आम्ही कामं करायची कशी, असा त्यांचा सवाल आहे. शिंदे सेनेच्या काही मंत्र्यांनी हा विषय फडणवीस यांच्याकडे काढला. आमचा स्टाफ नेमण्याचाही आम्हाला अधिकार नाही का, असा त्यांचा सवाल होता. फडणवीस आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. दलालांशी संबंध असणाऱ्यांना नेमणार नाही, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली आहे. ज्या अधिकाऱ्याबाबत शंका आहे, चारित्र्य पडताळणीत दोषी आढळले आहेत, असे अधिकारी आता मंत्रालयात दिसणार नाहीत. दलालांची गर्दी दिसणार नाही. भरतीचा असला प्रयोग राबविणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असावे. दिल्लीहून निघणाऱ्या एक रुपयातले फक्त १५ पैसे गावात पोहोचतात, असे सांगून राजीव गांधी मोकळे झाले. पण दिल्लीचा पूर्ण बंदा रुपया गावात पोहोचेल, अशी फिल्डिंग फडणवीसांनी लावली आहे. लक्ष्मीदर्शनाशिवाय फाईल हलली पाहिजे. फडणवीस ही जादू करून दाखवू शकतात. मात्र, नोकरशाहीने हे करू दिले का? या प्रश्नाचे उत्तर २०२९ साली मिळेल.

भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस मिळून तीन पक्षांचे महायुती सरकार भक्कम आहे. यातल्या एकाने गडबड केली तरी सरकारला धोका नाही. गेल्या अडीच वर्षांत तेव्हाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचे ट्युनिंग सुंदर होते. नव्या सरकारमध्ये पदावनती स्वीकारावी लागली म्हणून की काय शिंदे यांच्या देहबोलीत फरक जाणवतो आहे. शिंदे यांची नाराजी अजून गेली नाही काय असा प्रश्न पडावा, अशी स्थिती आहे. दोन महिने उलटले. रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा वाद मिटलेला नाही. या दोन्ही जागी शिंदे यांचे मंत्री पालकमंत्रिपदावरील दावा सोडायला तयार नाहीत. महायुतीचा कुठलाही निर्णय तिन्ही नेते एकत्र बसून घेतात, असे सांगितले जाते. मुख्यमंत्र्यांचा निर्णय असेल तर शिंदेंच्या मंत्र्यांनी तो मुकाट स्वीकारला पाहिजे. मात्र इथे वेगळे चित्र आहे. जिल्ह्याच्या वार्षिक योजनेला मंजुरी देण्यासाठी अर्थमंत्री अजित पवार यांनी बोलाविलेल्या या दोन्ही जिल्ह्यांच्या बैठकीला शिंदे यांच्या मंत्र्यांनी दांडी मारली. विश्वासात न घेता अधिकारी परस्पर निर्णय घेत आहेत म्हणून उद्योगमंत्री उदय सामंत यांनीही नाराजीचा सूर आळवला आहे. एसटीचे अध्यक्षपद अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी यांच्याकडे दिल्यावरून खदखद आहे. सारे महत्त्वाचे निर्णय फडणवीस यांच्या नजरेखालून जात आहेत. तशी गरज असेल म्हणूनच मुख्यमंत्र्यांनी स्वतःच्या अधिकारात निर्णय केले असणार. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या मंत्र्यांना आवरले पाहिजे. मात्र, शिंदेही बघ्याची भूमिका घेताना दिसत आहेत. शिंदे यांचा ६१ वा वाढदिवस नुकताच धूमधडाक्यात साजरा झाला. त्यावेळी शिंदेंनी केलेल्या भाषणाची जोरदार चर्चा आहे. शिंदे म्हणाले, ''आपण 'धर्मवीर' सिनेमा काढला. तो हिट झाला. आपला विधानसभेचाही सिनेमा सुपरहिट झाला. आता तिसरा सिनेमा काढायचा आहे. तो पण सुपरहिट होणार.'' हा तिसरा 'सिनेमा' म्हणजे शिंदे नेमके काय करणार आहेत? कारण त्यांचे पुढचे वक्तव्य स्फोटक आहे. 'मी डॉक्टर नसताना मोठमोठी ऑपरेशन्स केली, भूल न देता केली. मला हलक्यात घेऊ नका!'' असा इशारा त्यांनी कोणाला दिला असेल? उद्धव ठाकरेंना? वाढदिवसाला शरद पवार यांच्या हस्ते शिंदे यांनी पुरस्कार स्वीकारला हेही विचित्र वाटले. आपल्या तिसऱ्या सिनेमात शरद पवारही असतील असे शिंदे म्हणाले खरे; पण शरद पवारांजवळ जाणं किती डेंजरस आहे, याची त्यांना कल्पना नसेल अशातला विषय नसावा. शरद पवार हा 'बर्म्युडा ट्रँगल' आहे. त्यांच्याकडे गेले तो बुडाला. शेकाप, ठाकरे सेना पवारांनी गिळली. तेव्हा शिंदेसाहेब सांभाळून! यावेळी महापालिकेच्या निवडणुका मोठ्या चुरशीच्या होणार आहेत. ठाणे हा शिंदेंचा गड. ठाण्यात, मुंबईत शिंदे सेनेची काय भूमिका असेल? राज ठाकरे कुठे बसतील? फडणवीस नुकतेच त्यांना भेटल्याने वेगळी चर्चा रंगली आहे. पण लिहून ठेवा; राजसाहेबांची मनसे स्वतंत्र लढणार. किती जागा मिळतील तो भाग वेगळा...!

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### स्पर्धा केलीच पाहिजे पण...

एखादे उद्दिष्ट समोर ठेवून आपण प्रामाणिकपणे स्पर्धा करू लागतो. उद्दिष्ट छोटेच असते, पण कधी-कधी यातूनच आपल्याला मोठे उद्दिष्ट गाठण्यात यश येते. ते सुद्धा आपल्या ध्यानीमनी नसताना. प्रत्येकाच्या आयुष्यात अशा घटना घडतात. असे म्हणतात हे जग स्पर्धेचे आहे. आपल्या शेजारी, घरोघरी आपल्या अवतीभोवती किंवा आपल्याच घरातील दोन भावामध्येही स्पर्धा असते. स्पर्धा केलीच पाहिजे. मात्र, चांगल्या गोष्टीची. आज समाजामध्ये विशेषतः तरुण मुला-मुलीमध्ये अधिक प्रमाणात स्पर्धा दिसून येते. ती अभ्यासाची, वेशभूषेची, करीअरची असो वा इतर गोष्टीची. जो ती स्पर्धा करतो, पण कोणत्या गोष्टीबद्दल आपण स्पर्धा करित आहोत याचे भान तरी ठेवायला हवे. स्पर्धा वाईट गोष्टीची असेल तर नक्कीच स्पर्धेचा दुष्परिणाम झाल्याचेही दिसून येते. स्पर्धा चांगल्या गोष्टीची केली गेली तर आपल्याला फूल ना फुलाची पाकळी तरी मिळणार हे नक्की. चांगल्या गोष्टीची स्पर्धा करताना आपल्या ध्यानीमनी अपेक्षा नसतानाही अनपेक्षितपणे आपले जीवन घडून जाते. असा अनुभव कधी कधी येतो. आपण एखादी गोष्ट यशस्वी होण्याआधीच तिला अयशस्वी करतो व इथेच आपण अपयशी ठरतो. शास्त्रज्ञ तेच होतात की जे म्हणतात इथे असे का झाले? असे का होऊ शकत नाही? असे व्हायलाच पाहिजे ? व मग त्याच्यासाठी त्यांची प्रयत्नांची पराकाष्ठा चालते. पण यश येईपर्यंत प्रयत्न सोडत नाहीत. बरेच काही शिकण्यासाठी आहे. फक्त प्रत्येक गोष्टीला थोड्या वेगळ्या नजरेतून पाहणे गरजेचे आहे. मग माणूस केव्हा यशाचे शिखर गाठतो, हे सुद्धा कळत नाही.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### पापाचा भरला घडा

दिल्ली विधानसभा निवडणूक पार पडली आणि निकालानंतर तेथे कमळ फुलले व केजरीवालांची सत्ता संपुष्टात आली. काही वर्षाआधी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारेंसोबत भ्रष्टाचाराविरुद्ध ते तक्रार करीत होते. एका आयआरएस अधिकाऱ्याच्या भाषणाचा जोश यामुळे सर्वत्र त्यांचे नाव झाले. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत लोकांनी त्यांना सत्ता सोपवली.



लोकांच्या त्यांच्याकडून अपेक्षा वाढल्या. खरे तर त्यांच्याकडून अच्छे दिनची आशा होती. परंतु त्यांनी भ्रष्टाचारास सुरुवात केली. दिल्लीच्या उन्हाळ्यात उष्माघाताने काही लोक मरतात आणि यांच्या झाडाला ए. सी. तहानलेल्या व्यक्तीला पाणी पाजणे अत्यंत पुण्याचे काम आणि केजरीवाल यांनी यमुनेचे पाणीच खराब केले. दारूच्या घोटाळ्यामुळे अनेक गृहिणींचे संसार उद्ध्वस्त झाले. एका शिकलेल्या माणसाने भ्रष्टाचाराचा कळस गाठला. म्हणूनच महिलांनी मतांच्या साहाय्याने त्याचा पापाचा भरलेला घडा फोडला आणि त्यांची जागा दाखवून दिली. त्याबद्दल दिल्लीच्या नागरिकांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

### ईपीएस-९५ पेन्शनधारकांची पुन्हा निराशा

देशात २०१४ मध्ये सत्ताबदल झाला. काँग्रेस सरकारबद्दल जनतेमध्ये, कामगारांमध्ये चीड निर्माण झाली होती. कारण ते सरकार जनताविरोधी, कामगारविरोधी होते. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात रालोआ सरकार आले. त्यांच्याकडून खूप आशा, अपेक्षा ईपीएस-९५च्या निवृत पेन्शनधारकांना होत्या. आता आपली पेन्शनची मागणी पूर्ण होणार आणि आपल्याला न्याय मिळणार. पेन्शनधारकांची मागणी इतकी क्षुल्लक आहे की जी पेन्शन कमीत कमी १००० आहे ती वाढवून ५००० रुपये करावी अथवा फिक्स पेन्शन करून त्यावर महागाई भत्ता द्यावा. कर्मचाऱ्यांनी ३० ते ३५ वर्ष सेवा करून दोन-तीन हजार रुपये पेन्शन त्यांना मिळते. त्यापेक्षा बेरोजगारी भत्ता जास्त मिळतो, निराधार योजनेत जास्त पैसे मिळतात. आता तर राज्य सरकार लाडकी बहीणला २१०० रुपये देणार म्हणजे समाजातील सर्व घटकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणार परंतु ४० वर्षे सेवा करून पेन्शनधारकांना वाढीव पेन्शनपासून वंचित ठेवणार हे सत्य आता पेन्शनधारकांना डोळ्यात अश्रू आणायला भाग पाडणार असे दिसते आहे.



या पेन्शनधारकांना स्वतःसाठी औषधं घेता येत नाही. इतक्या अल्प पेन्शनमुळे मुला-मुलींवर अवलंबून राहून हलाखीचे जीवन जगावे लागत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांना योजनेचा लाभ तरी मिळतो. परंतु ४० वर्ष सेवा करून निवृत होणाऱ्या कर्मचाऱ्यांना कुठल्याच योजनेचे लाभार्थीही होता येत नाही. पंतप्रधान मोदींनी विकासाचा नारा दिला, पण ईपीएस पेन्शनधारकांकडे लक्ष द्यावे, ही अपेक्षा.

**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## मे. उपनिंबधक, सहकारी संस्था, शहर सोलापुर, सोलापूर यांचे समोर

**सोलापुर जिल्हा महसुल कर्मचारी सहकारी पतसंस्था नियमित सोलापुर**
सिटी सर्व्हे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापुर ४११००३

जा.क्र./उप/३९७५/२०२५
लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापुर — अर्जदार
विरुध्द
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) — जाब देणार

| अ. क्र. | दावा क | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | २९६/२०२४ | १,३३,६२८/- | १<br>२ | १. श्री. शेख मुस्ताक अमीनसाब रा. २८२/४ क गोदुताई विडी घरकुल सोलापूर<br>२. सी. मुल्ला अनिसा जावेद रा. घर नं ३३० रेल्वे हॉस्पिटल भैय्या चौक गांधी कॉलनी सोलापूर |
| २ | २९४/२०२४ | १,१७,३८१/- | १<br>३ | १. श्री. काकी त्रिनाथ मल्लेश रा. १९० वेणुगोपालनगर हनुमान मंदिर जवळ सोलापूर<br>३. श्री. स्वामी बसवराज काशीनाथ रा.८६ सुशील नगर विजापूर रोड इंदिरानगर सोलापूर |
| ३ | २९२/२०२४ | ७१,५५४/- | १<br>२<br>३ | १. श्री. चव्हाण मनोजकुमार प्रकाश रा-७८/९१ मित्र नगर शेळगी सोलापूर<br>२. सौ. चव्हाण ललिता मनोजकुमार रा. ७८/९१ मित्र नगर शेळगी सोलापूर<br>३ श्री. बुक्का महेश चंद्रकांत रा. ९७/४५ ॲग्रो इंडस्ट्रियल मार्केट यार्ड सोलापूर |
| ४ | २९३/२०२४ | ९२९२१/- | ३ | ३. श्री. काझी गीसपाक गुडडुलाल रा. प्लॉट नं ३०/१६ न्यू पाच्छा पेठ गणपती मंदिर जवळ सोलापूर |
| ५ | २७६/२०२४ | १,११,०६६/ | ३ | ३. श्री. केत किरण दत्तात्रय रा. विश्नवी प्लाजा वामन नगर जुळे सोलापूर |
| ६ | २८६/२०२४ | १,१०,११५/- | १<br>२<br>३ | १. श्री. शेख मुस्कान फातेमा अ. सतार रा.३०६ ३रा मजला कल्याणी टॉवर सिध्देश्वर पेठ सोलापूर<br>२. सौ. मुल्ला रेश्मा मारूफ रा. ३२५/१५ मराठा वस्ती भवानी पेठ सोलापूर<br>३. श्री. नाईकवाडी आकिब अहमद २२४ शास्त्री नगर पांडुरंग वस्ती मारूती मंदिर जवळ सोलापूर |
| ७ | २९१/२०२४ | ३०,९८४/- | १<br>३ | १. श्री. भोसले राजाराम कृष्णाराव रा. ११४ शेळगी गावठाण जि. सोलापूर<br>३. श्री. पेदरपेटटी सुनील सायलु रा. ४१६ जोडभावी पेठ सोलापूर |
| ८ | २८७/२०२४ | ३४,९३७/- | १<br>३ | १. श्री. बिराजदार आनंदराव विठठल रा. १११३ रोहिणी नगर सैफुल सोलापुर<br>३. श्री. बिराजदार श्रीकांत विठठल रा. मु. पो. संजवाड सोलापूर |
| ९ | २८९/२०२४ | १,०८,२७६/- | ३ | ३. श्री. कटारे अमर रमेश रा.९/१८ नेताजी सुभाष नगर विजापूर रोड सोलापूर |
| १० | २९७/२०२४ | ९९,६९९/- | २<br>३ | २. श्री. गवळी अंकुश शिवप्पा रा. जम्मा मस्जिद जवळ मातन वस्ती गावठण शेळगी जि सोलापूर<br>३. श्री. बिराजदार महेश काशीनाथ रा. प्लॉट नं २९ शिवगंगा नगर जोकारे सायकल दुकान जवळ शेळगी जि सोलापूर |
| ११ | २७८/२०२४ | ३,५२,४६२/- | १ | १. श्री. अर्जुन जनार्धन शेरकर रा घर नं १०६ शिवकिर्ती नगर के. बी. पी. कॉलेज जवळ पंढरपुर |
| १२ | २८६/२०२४ | २,५६,७७१/- | १<br>२<br>३ | १. श्री. मुजाहीद सईद अहमद यादगीर रा. ५८५ न्यु पाच्छा पेठ सोलापुर<br>२. श्री नितिन शिवाजी जाधव रा. प्लाट न ३०५ समाधान नगर अक्कलकोट रोड सुत मिल मागे सोलापुर ४१३००६<br>३ श्री. विजय श्रीशैल कुंभार रा. २१६ शिवगंगा नगर भाग ४ सोलापुर |
| १३ | २८१/२०२४ | १,८६,१८५/- | १ | १. श्री. ज्योतिलिंग प्रदिप शिंदे रा. अभिषेक अपार्टमेंट घर नं १ जुळे सोलापुर |
| १४ | २८२/२०२४ | ५,५०,२५९/- | | १. श्री. निखिल राजशेखर पायमल्ले मु. पो. ८६ दिनदुर रोड हनुमान मंदिर जवळ रामपुर पोस्ट करदळी सोलापूर<br>२. श्री. सिध्दाराम गेनसिध्द जवळे मु.पो. गेनसिध्द गुंड कटटा कुंभारी सोलापुर कुंभारी जि. सोलापुर<br>३. श्री. मल्लिकार्जुन शिवशरण कवदे मु.पो. ४७ मडडी वस्ती कुमठे गाव एस पीएम पॉलिटेक्निक कॉलेज जवळ सोलापुर |
| १५ | २७९/२०२४ | २,६६,१५३/- | १<br>३ | १. श्री. लोंढे सागर संदिपान मु. पो. ब्लाक नं १४ कृष्णा बिल्डिंग अमृत नगर विजापूर रोड सोलापूर<br>३. श्री. बेग ताजोदिदन मोहियेदिदन मु. पो. ४० गमवाडी हनफिया मस्जीद जवळ सोलापुर |
| १६ | २८८/२०२४ | २,५२,५५२/- | १<br>२<br>३ | १. सौ. समीना अ. रशीद मु.पो. ४० रामवाडी हनफिया मस्जिद जवळ मजरेवाडी. सोलापुर<br>२. सौ. महेडाबीन अ. रजाक सय्यद मु. पो. ब्लॉक १ सिरन नगर सोलापूर<br>३. श्रीमती. कौसरबानू मौहिय्योद्दीन शेख मु.पो रमाशंकर नगर, द. बझार सोलापूर |
| १७ | २७७/२०२४ | २,३१,०५२/- | १<br>२<br>३ | १. श्रीमती. बिनेकर रूथ लमुवेल मु. पो. उत्तर सदर बजार हेजनपूर ७३/६ सोलापुर जि. सोलापूर<br>२. श्री. योगेश नागनाथराव दुपकेवार मु. पो. पापाराम नगर विजापूर रोड जि. सोलापूर<br>३. श्री. यंबल आदेशकुमार अभिनंदन मु. पो. विष्कत प्लाजा विजापूर रोड सोलापूर जि. सोलापूर |
| १८ | २८४/२०२४ | ६,२७,७७९/- | | २. श्री. लोंढे सागर संदिपान मु. पो. पाण्याचा टाकी जवळ ब.नं १४ कृष्णा बिल्डिंग अमृतानगर विजापूर रोड सोलापूर |
| १९ | २८०/२०२४ | ७,२४,१११/- | | १. श्री. शेख अहमद गफुर मु. पो. पारशी विहीर जवळ २५२शिव गंगा नगर भाग मजरेवाडी. सोलापुर नॉर्थ सोलापूर<br>२. बी. मोरे मंदिप बाळष्ण मु. पो. ब्रम्हपूरी ता. मंगळवेढा जि सोलापूर |
| २० | २८३/२०२४ | २,७४,६२२/- | | १. श्री. बिराजदार विजयकुमार शांतप्पा रा.मु. पो. दर्गनहळळी ता.द. सोलापूर जि. सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे/पत्तावर आढळून येत नसल्याने /अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणे येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वताः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांक- २५/०२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

प्रतिवादी यांनी तारखेस बेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि. ०७/०२/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्य दिले आहे.

स्थळ - सोलापुर
दि. ०७/०२/२०२५

शिक्का

सही/-
(डॉ.पी.ए. बागल)
उपनिबंधक
सहकारी संस्था, सोलापुर शहर सोलापुर

---

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

इंद्रभवन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन-४१३००१
सहा. अभियंता भ्रमणध्वनी क्रं. : ९४२२४५७९२४
Mail Id: smcasstlightgmail.com

जा.क्र. ९३३ — दि. १३/०२/२०२५

### प्रथम मुदतवाढ

विद्युत विभाग, सो.म.पा. कडुन Tender ID- 2025_SMC_1146424_1 जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत - सी.एन.एस. (CNS) हॉस्पिटल पासून दक्षिणेला ५४ मीटर रिंग रोडवर पथदिव्या करिता विद्युत पोल बसविणे. (रू.16,23,244/-) कामाचे दि. ६/२/२०२५ रोजी महाराष्ट्र शासन संकेतस्थळ http://www.mahatenders.gov.in वरून फेर ई निविदा मागविण्यात आलेले होते. सदर ई निविदेस मा.आयुक्त,. सो.म.पा. यांचे आदेशानुसार खालील प्रमाणे प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे.

निविदा भरण्याची अंतिम तारीख : १७/०२/२०२५
निविदा उघडण्याची तारीख : १८/०२/२०२५

सही/-
कार्यकारी अभियंता (विद्युत)
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

---

# अपघातामध्ये रेल्वे इंजिनियरचा मृत्यू

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

बाळे रेल्वे स्टेशन जवळ रेल्वे रुळाचे निरीक्षण करताना रेल्वे गाडीचा धक्का लागल्याने रेल्वे इंजिनियर चा मृत्यू झाला. श्रीमंत सोम नाथ पुजारी वय ५० राहणार बोरोटी असे मरण पावलेल्या चे नाव आहे श्रीमंत पुजारी हे बाळे येथे गुरुवारी रेल्वे रुळाचे निरीक्षण करीत होते त्यावेळी त्यांना गाडी आलेला अंदाज न आल्याने गाडी क्रमांक २२ ८८१ पुणे भुवनेश्वर साप्ताहिक एक्सप्रेस ने जोरात धडक दिली यामध्ये पुजारी हे गंभीर जखमी होऊन मरण पावले श्रीमंत पुजारी हे बोरोटी येथे ग्यानमन म्हणून काम करीत होते मागील काही दिवसापूर्वीच त्यांना प्रमोशन मिळून ते सोलापूर विभागीय कार्यालय येथे जूनियर इंजीनियरिंग विभागात कार्यरत झाले होते

---

मनोरमा परिवार अंतर्गत

**ट्रीन सिटी अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर**

विमल कॉम्प्लेक्स, माशाळ वस्ती, विजापूर रोड, सोलापूर

**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क : ०२१७२३०३३१२

दिपक सुरवसे — चेअरमन (९१७५१८३६९९)
नितीन भोसले — व्हा. चेअरमन (९८८१५१५५३३)
दिपमाला जाधव — व्यवस्थापिका (मो.८३२९२८७३१२)

---

## सोलापूर जनता सहकारी बँक लि.

SJSB Multi-State Scheduled Coop.Bank

मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक

'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - ४१३००७
फोन क्र.: 0217- 274 1101 ते 05 ई-मेल : info@sjsbbank.com वेबसाईट : www.sjsbbank.com

### जाहीर ताबा नोटीस

### नियम 8(1)

(दि सेक्युरिटायझेशन रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस & इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 अन्वये)

तमाम लोकांस, कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना सदर जाहीर ताबा नोटीसीने कळविण्यात येते की, ज्या अर्थी **सोलापूर जनता सहकारी बँक लि.** मुख्य कार्यालय, सोलापूर या संस्थेचे अधिकारी यांना उक्त अध्यादेशाच्या कलम 13 (12) अन्वये प्राप्त झालेल्या प्राधिकृत अधिकारी या अधिकारानुसार मी उपरोक्त कायद्याचे कलम 13(2) अन्वये दि. 13/12/2017 रोजी कर्जदार **श्री. मोहन गोपाळराव यादव व श्री. गिरीराज मोहन यादव,** 79, **उत्तर कसबा, काळी मशिदजवळ, सोलापूर.**

**जामीनदार -** 1) **श्री. मदन गोपाळ यादव** 2) **श्री. योगिनाथ मल्लिकार्जुन वनारोटे**

यांना मागणी नोटीस पाठवून **रक्कम रु.** 22,76,298/- **(अक्षरी रुपये बावीस लाख शहात्तर हजार दोनशे अठ्याण्णव मात्र)** आणि दि.**01/12/2017** पासूनचे देय असलेले पुढील व्याज व इतर खर्च अशी संपूर्ण रक्कम नोटीस मिळाल्या पासून 60 (साठ) दिवसाच्या आत भरणा करण्याचे कळविले होते. परंतु नोटीस मिळूनही सदर उपरोक्त कर्जदार / गहाणकार व जामीनदार यांनी उपरोक्त रक्कम आमच्याकडे भरण्यास कसूर केलेली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत रक्कम रु.**48,11,997**/- + दि. **01/02/2025** पासूनचे व्याज इतकी येणेबाकी असल्यामुळे त्या अर्थी सदर कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना कळविण्यात येते की, खालील सही करणार यांनी खालील परिशिष्ठात नमूद केलेल्या तारण स्थावर मिळकतीचा दि.**12/02/2025** रोजी दि सेक्युरिटायझेशन रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 चे कलम 13(4) नियम 9 अन्वये **प्रतिकात्मक ताबा** घेतलेला आहे.

सबब उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेल्या मिळकती बाबत कोणीही कोणाशीही कोणत्याही प्रकारे हस्तांतर, विल्हेवाट, गहाण, विक्री, बोजा, तारण वाटणी, वहिवाट, बक्षिस अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतर करार करू नये. या उपरही तसा व्यवहार अथवा करार केल्यास तो बेकायदेशीर आहे, असे ठरवून आमच्या बँकेवर अथवा सदर मिळकतीवर सदर व्यवहार अथवा करार कायद्याने बंधनकारक राहणार नाही. याची नोंद उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार व तमाम लोकांनी घ्यावी.

**परिशिष्ट**

**तारण स्थावर मालमत्ता वर्णन**

श्री. मोहन गोपाळ यादव (कर्जदार) व श्री. मदन गोपाळ यादव (जामीनदार) यांचे मालकीची जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी शहर सोलापूर येथील सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील गोल्डफिंच पेठ सोलापूर येथील घरजागा यासी सिटी सर्व्हे नं. 8550/1 ब, म्युनिसिपल घर नं. 66, याचे क्षेत्र 93.5 चौ. मी. ही मिळकत तारण असून, यामधील सर्व तदंगभूत वस्तूसहची घरजागा यासी चतुःसीमा पुढील प्रमाणे -
पूर्वेस - सि.स.नं.8550/2अ पश्चिमेस सि.स.नं. 8550/1अ पैकीची घरजागा दक्षिणेस - रस्ता उत्तरेस - रस्ता

**दिनांक : १२/०२/२०२५**
**ठिकाण : सोलापूर.**

शिक्का

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**(मल्टी-स्टेट शेड्युल्ड को.ऑप.बँक)**

---

### पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात (टप्पा २)

**सिध्द सारणा संघ श्रीक्षेत्र माचणूर संचलित ता मंगळवेढा जि. सोलापूर** (273006SC032)
**मराठी माध्यमाच्या अनुदानित माध्यमिक विद्यालयात**
**पवित्र पोर्टलमार्फत ऑनलाईन पध्दतीने खालील प्रमाणे शिक्षक नेमणे आहेत.**

विषय व शैक्षणिक व्यवसायिक पात्रतेसह रिक्त पदाचा तपशिल

| अ. नं. | माध्यम | पद | वेतन श्रेणी / मानधन | अनुदान प्रकार | विषय | आवश्यक पदसंख्या | एकूण पदे | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | शिक्षण सेवक ६ वी ते ८ वी | एकत्रीत मानधन १६०००/- | अनुदानित | मराठी | १ | ४ | अ. जाती-१<br>इ.मा.व.-१<br>वि.मा.प्र.-१<br>ई.डब्लू.एस.-१<br>एस.ई.बी.सी.-२<br>खुला-१ (समांतर आरक्षण नियमाप्रमाणे राहिल ) |
| २ | मराठी | शिक्षण सेवक ६ वी ते ८ वी | एकत्रीत मानधन १६०००/- | अनुदानित | गणित-विज्ञान | १ | | |
| ३ | मराठी | शिक्षण सेवक ६ वी ते ८ वी | एकत्रीत मानधन १६०००/- | अनुदानित | इंग्रजी | १ | | |
| ४ | मराठी | शिक्षण सेवक ६वी ते ८ वी | एकत्रीत मानधन १६०००/- | अनुदानित | सामाजिकशास्त्रे | १ | | |
| ५ | मराठी | शिक्षण सेवक ९ वी ते १० वी | एकत्रीत मानधन १८०००/- | अनुदानित | विज्ञान | २ | ३ | |
| ६ | मराठी | शिक्षण सेवक ९ वी ते १० वी | एकत्रीत मानधन १८०००/- | अनुदानित | गणित | १ | | |

अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) 2022 प्रविष्ठ झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2022mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तीक माहिती नोंदवून स्वप्रमाणीत केलेली आहे असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करू शकतील.

इच्छुक व अर्हता धारण करणा-या उमेदवारांनी ऑनलाईन जहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदासाठी पसंती कम नमूद करून पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत.

वरील रिक्त पदासाठी पवित्र प्रणालीमार्फत शासनाकडून उमेदवारांची नावे कळविली जाणार असल्याने प्रत्यक्ष संस्थेकडे कोणीही अर्ज करू नयेत .

**सही/-**
**अध्यक्ष**
**सिध्द सारणा संघ श्रीक्षेत्र माचणूर**
**ता. मंगळवेढा.**

---

## SHRI MAHAVIR URBAN CO OP BANK LTD., SOLAPUR

Head Office: 60/61, East Mangalwar Peth, Solapur 413002 PH: (0217) 2622933/44

### DEMAND NOTICE UNDER SECTION 13(2) OF SARFAESI ACT 2002

Whereas you the below mentioned Borrower, Guarantor's and Mortgagors have availed loan from Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur, by mortgaging your immovable properties. Consequent to default committed by you all, your loan account has been classified as Non Performing Asset, whereas Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur being a secured creditor under the Act, and in exercise of the powers conferred under section 13(2) of the said Act read with rule 2 of Security Interest (Enforcement) Rules 2002, issued Demand Notice calling upon the Borrowers/Guarantor's/ Mortgagors as mentioned in column No.2 to repay the amount mentioned in the notices with future interest thereon within 60 days from the date of the notice, but the notice of Guarantor No.2 has been returned unserved for some reason thus this notice as below.

| Sr. No. | Name of Borrower/ Guarantor/ Mortgagor | Loan Account No. & Loan Amount | Details of the Security to be enforced | Date of NPA & Demand Notice date | Amount Due in Rs. as on 31/01/2025 |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Borrower :**<br>**Mahboob Services Prop : Mahiboob Akbar Shaikh**<br>R/o: 34/5B/14, New Pachha Peth, B/h 70 Feet Road bhaji Market, Solapur<br>**Guarantor :**<br>**1) Nauman Fazalahmed Chaudhari**<br>**R/o:** 43, Siddeshwar Peth, Mullababa Tekadi, Solapur<br>**2) Mujaffar Hasan Shahapure**<br>**R/o:** 42, Sainath Nagar, Nr Aman Chowk, Majarewadi, Solapur | **Loan Account No.**<br>0030032170000103<br>**Loan Amount (Rs.)**<br>10,00,000/-<br>(Rs. Ten Lakh only) | All that pieces of land and building situated within District and Sub district Solapur, Taluka North Solapur, within new depotentiation limits of Solapur Municipal Corporation, at Majarewadi, Suresh Nagar, Old Servey No. 220 New Servey No. 20, Plot No. 4 its area 135.41 Sq. Mt. having boundaries as follows :<br>East: Plot No. 3,<br>West: Plot No. 5,<br>North: Road,<br>South: Land of Balaji Nagar | **Date of NPA:**<br>30/06/2024<br>**Demand Notice Date:**<br>03/02/2025 | **Rs. 8,03,384/-**<br>(Rs Eight Lakh Three Thousand Three Hundred and Eighty Four Only) Plus future interest and other expenses thereon which is found due on 31/01/2025 |

Notice is therefore given to the Borrower/Guarantor & Mortgagor as mentioned in Column No.2, calling upon them to make payment of the aggregate amount as shown in column No.6, against the respective Borrower within 60 days of Publication of this notice as the said amount is found payable in relation to the respective loan account as on the date shown in Column No.6. It is made clear that if the aggregate amount together with future interest and other amounts which may become payable till the date of payment is not paid, Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur shall be constrained to take appropriate action for enforcement of security interest upon properties as described in Column No.4. Please note that this publication is made without prejudice to such rights and remedies as are available to Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur against the Borrower/ Guarantor's/ Mortgagors of the said financials under the law, you are further requested to note that as per section 13(13) of the said act, you are restrained/ prohibited from disposing of or dealing with the above security or transferring by way of sale, lease or otherwise of the secured asset without prior consent of Secured Creditor.

**Date: 13/02/2025**
**Place: Solapur**

SEAL

**Sd/-**
**Authorised Officer**
**Shri. Mahavir Urban Co op Bank Ltd., Solapur**

---

## ग्रामपंचायत लोंढेवाडी ता. माढा, जि. सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत लोंढेवाडी ता. माढा, जि. सोलापूर यांचेकडून खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत पुरवठादाराकडून बंद लखोट्यात दरपत्रक (निविदा) मागविण्यात येत आहे.

लेखाशीर्ष :- अटल भूजल बक्षिस ग्रामनिधीतून IOT बनविणेसाठी साहित्य खरेदी करणे

| अ. नं. | कामाचे नांव | कामाची मुदत | पुरवठा वर्ग |
|---|---|---|---|
| १ | प्रोजेक्टर | ३ महिने | नोंदणीकृत JM |
| २ | साऊंड सिस्टिम | ३ महिने | नोंदणीकृत JM |
| ३ | सोफा सेट व खुर्ची | ३ महिने | नोंदणीकृत JM |
| ४ | एयर कंडिशयन | ३ महिने | नोंदणीकृत JM |

टीप :-

१) भरलेल्या निविदा स्विकारण्याचा कालावधी दिनांक १७/२/२०२५ पर्यंत सकाळी ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत लोंढेवाडी, ता. माढा, जि. सोलापूर

२) कोटेशन उघडण्याचा दिनांक २०/२/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता

३) कोटेशन संदर्भात अटी व शर्तीची माहिती ग्रामपंचायतमध्ये पाहवयास मिळतील.

४) कोटेशन मंजूर/ नामंजूर अथवा सर्व कोटेशन नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत लोंढेवाडी**
**ता. माढा, जि. सोलापूर**

---

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

## उपविभागीय अधिकारी कार्यालय पंढरपूर विभाग पंढरपूर

पत्ता - पदमावती तळ्याचे पाठीमागे, स्टेशनरोड, पंढरपूर

दुरध्वनी क्र.०२१८६-२२३५६३ — ईमेल-sdopndharpur2025gmail.com

क्रं. भूसंपादन/कावि/२६६/२०२५ — दिनांक ११/०२/२०२५

### अधिसूचना

### सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९

ज्या अर्थी सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९ चे कलम ३ उपकलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र राज्यात सुविधा व सेवा (विद्युत तारमार्ग वगळता) देण्यासाठी भूमिगत नळमार्ग टाकण्यासाठी आणि भूमिगत वाहिन्या बांधण्याकरिता जमिनीमधील वापर हक्काचे संपादन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्हयातील जमिनीचा वापर हक्क करण्याची घोषणा करित आहे.

कोणी व्यक्ती ज्याचे संपादित जमिनीशी हितसंबंध आहेत ते या अधिसूचनेचे प्रसिध्दीचे दिनांकापासून २१ दिवसाचे आत अधिनियमांचे कलम ३ चे उपकलम (४) अन्वये आधीन राहून वरील प्रयोजनासाठी आवश्यक जमिनीचे उपयोगाचे बाबतीत आक्षेप घेऊ शकतात.

असा प्रत्येक आक्षेप सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर जि. सोलापूर यांचेकडे लेखी स्वरुपात करावा, त्याचे निराकरण केले जाईल आणि सक्षम प्राधिकारी यांचकडून आक्षेप घेण्यास व्यक्तिशः किंवा विधी व्यवसायीद्वारे आपले म्हणणे मांडण्यासाठी अवधी दिला जाईल आणि अशा सर्व आक्षेपाबाबत त्यांची बाजू ऐकल्यानंतर त्याची अधिक सखोल चौकशी केल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम ३ उपकलम (५) अन्वये सक्षम प्राधिकारी आवश्यकतेप्रमाणे असे आक्षेप स्वीकारु अथवा नाकारु शकतात.

सक्षम प्राधिकारी यांनी अधिनियम कलम ३ चे उपकलम (६) अन्वये देण्यात आलेला कोणताही आदेश अंतिम राहिल. या अधिसूचने अंतर्गत येणाऱ्या जमिनीचे मोजणी नकाशे व इतर माहिती सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात हितसंबंधित व्यक्तींना पाहण्यास मिळू शकतील.

### अनुसूची

महाराष्ट्र राज्यात सुविधा व सेवा (विद्युत तारमार्ग वगळता) देण्यासाठी भूमिगत नळमार्ग टाकण्यासाठी आणि भूमिगत वाहिन्या बांधण्याकरिता जमिनीमधील वापर हक्काचे संपादन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्हयातील मार्गाक्रमण करण्यात येणाऱ्या बांधीव अथवा मोकळया जागेचे संक्षिप्त वर्णन.

| अ.क्र. | जमीनमालक किंवा भोगवटदार यांचे नाव | तालुका | गावाचे नाव | भूमापन क्रमांक | भूमिगत नळमार्ग टाकण्याकरिता किंवा भूमिगत वाहिन्या उभारण्याकरिता वापरहक्काचे संपादन करण्यासाठीची आवश्यक जमीन (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | भारत सरकार राष्ट्रीय म.न. सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालय भारत सरकार, गोपाळ भागवत फराटे, औदुंबर गोपाळ वरपे, चित्रा उर्फ अर्चना नबल शिंदे, नंदा अशोक शिखरे, मनीषा बाळासाहेब दळवी, मिथून शामराव अभिवंत, वैशाली सोमनाथ होळकर, सज्जन मारुती अभिवंत, स्वपना विठ्ठल भोसले, स्वाती औदुंबर वरपे, आकाश नवनाथ अभिवंत. | मोहोळ | देवडी | ७२५ | ०.२० |
| | | | | एकूण एकंदर | ०.२० |


जिमाका/सो/जाहि/३०६/२०२४-२५

**सही/-**
**(विजया पांगरकर)**
**सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**पंढरपूर विभाग पंढरपूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे

### अखेरच्या दिवशी संयुक्ता, परिणाला प्रत्येकी एक सुवर्ण



**डेहराडून** : राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या संयुक्ता काळे व परिणा मदनपोत्राने अखेरच्या दिवशी प्रत्येकी एक सुवर्ण व एक रौप्यपदक जिंकले. तर शताक्षी टक्के हिने चक्क बारावीच्या परीक्षेला दांडी मारून येथे स्पर्धेत भाग घेत रौप्यपदक जिंकले. शेवटचा दिवस महाराष्ट्राच्या महिला जिम्नॅस्ट्सनी गाजविला. महाराष्ट्राने यंदा जिम्नॅस्टिक्स या क्रीडा प्रकारात १२ सुवर्ण,८ रौप्य व ४ कास्य अशी २४ पदकांची कमाई केली. वैयक्तिक साधन प्रकारातील क्लब या क्रीडा प्रकारात १६ वर्षीय परिणाने सुवर्णपदक जिंकताना २५.६०० गुणांची नोंद केली. तिचे या स्पर्धेतील हे पाचवे पदक आहे. आतापर्यंत तिने तीन सुवर्ण व दोन कांस्यपदक जिंकली आहेत. रिबन या प्रकारात महाराष्ट्राच्या संयुक्ताला जम्मू-काश्मीरची खेळाडू मुस्कान राणा हिच्या समवेत संयुक्त सुवर्णपदक देण्यात आले. बॅलेन्सिंग बीम प्रकारात शताक्षी टक्के हिने अप्रतिम कौशल्य दाखवले. तिने ११.०६ गुण घेत रौप्यपदक मिळविले. पश्चिम बंगालच्या रितू दास हिने ११.३६७ गुण मिळवित सुवर्णपदक जिंकले.

### तलवारबाजीत महाराष्ट्राला रौप्य, कांस्यपदक

**हल्दवानी** : राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राला सांघिक सायबर प्रकारात सुवर्णपदकाने हुलकावणी दिली. चुरशीची लढतीत सेनादलाकडून महाराष्ट्र संघाला पराभव पत्करावा लागला. वैयक्तिक सायबर प्रकारात आदित्य अनगळने कांस्यपदकाची कमाई केली. चौखाम्बा हॉलमध्ये खेळल्या गेलेल्या तलवारबाजीतील सांघिक सायबर प्रकारात सेनादलाने महाराष्ट्राला ४५-३८ गुणांनी नमवले. महाराष्ट्राकडून अभय शिंदे, आदित्य अनगळ, धनंजय निखिल वाघने लक्षवेधी खेळ केला. आदित्य अनगळने वैयक्तिक सायबर प्रकारामध्ये नेत्रदीपक कामगिरी करत कांस्यपदक संपादन केले.

### हॉकीमध्ये महाराष्ट्राला कांस्यपदक

**हरिद्वार** : महाराष्ट्राच्या खेळाडूंनी बलाढ्य पंजाब संघाला १-० असे पराभूत केले आणि राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पुरुषांच्या हॉकीमध्ये कांस्यपदकाची कमाई केली. महिलांच्या गटात मात्र, महाराष्ट्राला चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. पुरुष गटात व्यंकटेश केंचे हा महाराष्ट्राच्या यशाचा शिल्पकार ठरला. त्याने ३६ व्या मिनिटाला महत्त्वपूर्ण एकमेव गोल केला. कांस्यपदक मिळवणाऱ्या महाराष्ट्र संघास मुख्य प्रशिक्षक विक्रम पिल्ले, प्रशिक्षक सागर कारंडे यांचे मार्गदर्शन लाभले. महिलांच्या कास्यपदकासाठी झालेल्या लढतीत महाराष्ट्राला झारखंड संघाकडून १-२ असा पराभव पत्करावा लागला.

### हर्षवर्धन, अमृताला कांस्यपदक

**हरिद्वार** : तब्बल दशकानंतर राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या आखाड्यात महाराष्ट्राने चमकदार कामगिरी केली. भाग्यश्री फंड पाठोपाठ हर्षवर्धन सदगीर, अमृता पुजारी हे महाराष्ट्र केसरी विजेते कुस्तीपटू राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकाचे मानकरी ठरले आहेत. फ्रीस्टाईल १२५ किलो वजनी गटात हर्षवर्धन सदगीरने कांस्यपदकावर नाव कोरले. दिल्लीच्या लक्ष्य विरूध्द झुंजताना नाशिकच्या हर्षवर्धनने लपेट डावावर चितपट कुस्ती करीत कांस्यपदक जिंकले. पुण्यात २०२० साली महाराष्ट्र केसरीची गदा उंचविणाऱ्या हर्षवर्धनचे हे राट्रीय क्रीडा स्पर्धेतील पहिलेच पदक आहे. महिलांच्या फ्रीस्टाईल ७६ किलो वजन गटात कोल्हापूरच्या अमृचा पुजारीने गुजरातच्या सनोफरला मात दिली. गतवर्षी २०२४ मध्ये नागपूर येथील महिलांची महाराष्ट्र केसरी स्पर्धा तीने जिंकली होती.

# श्रेयस चॅम्पियन्स चषकांत महत्त्वाचा खेळाडू : गंभीर





◆ **अहमदाबाद, १३ फेब्रुवारी**

सातत्यपूर्ण कामगिरी करणारा उजव्या हाताचा फलंदाज श्रेयस अय्यर नेहमीच भारतीय संघाच्या योजनेत असतो व या महिन्यात होणाऱ्या चॅम्पियन्स चषकामध्ये तो एक महत्त्वाचा भाग असेल, असे भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर म्हणाले.

उत्कृष्ट फॉर्मनंतरही श्रेयस अय्यरला संघातून बाजूला केले जात असल्याच्या वृत्ताला गंभीरने फेटाळून लावले आहे.

इंग्लंडविरुद्ध नुकत्याच संपलेल्या ३-० च्या वन-डे मालिकेत अय्यरने उत्कृष्ट फॉर्म दाखवला. नागपूरमध्ये भारताने २४९ धावांचा पाठलाग करताना पहिल्या सामन्यात ३६ चेंडूत ५९ धावा केल्या व पुढील दोन सामन्यात ४४ आणि ७८ धावा केल्या.

कोहलीला गुडघ्याच्या दुखापतीमुळे पहिल्या सामन्यात मैदानाच्या बाहेर बसावे लागले, त्यामुळे मला संघात स्थान मिळाले, असे श्रेयसने सांगितले. त्याच्या या वक्तव्यामुळे खळबळ उडाली होती व यामुळे पुढील दोन सामन्यांमध्ये त्याला कोहलीसाठी वगळले जाईल अशी शक्यता वर्तविण्यात आली होती.

संपूर्ण मालिकेत श्रेयसला बाकावर बसवण्याची गरज नव्हती. आम्हाला पहिल्या सामन्यात यशस्वी जयस्वालला संधी द्यायची होती व तो काय कामगिरी करू शकतो ते बघायचे होते, कारण तो ऑस्ट्रेलियामध्ये खरोखरच चांगल्या फॉर्ममध्ये होता, असे गंभीरने सांगितले. अय्यरला अखेर जयस्वालपेक्षा पसंती देण्यात आली व गंभीरने त्याला संघात महत्वाचा खेळाडू म्हणून वर्णन केले.

एका डावातील कामगिरीने यशस्वी जयस्वालचे मूल्यांकन करू शकत नाही. पण श्रेयस आमच्यासाठी एक महत्त्वाचा खेळाडू आहे. आता चॅम्पियन्स चषक जवळ येत आहे आणि आपल्याकडे केवळ तीन सामने आहे अशा परिस्थितीत आपण संघ देखील बदलण्याचा प्रयत्न करू इच्छिता आणि आणि सर्वांना संधी देण्याचा प्रयत्न करू इच्छिता. परंतु श्रेयस नेहमीच संघाच्या योजनेत आहे व त्याने तिन्ही सामने खेळले, असेही गंभीरने सांगितले.

१९ फेब्रुवारी रोजी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेला सुरुवात होणार आहे आणि २० फेब्रुवारी रोजी भारत व बांगलादेश यांच्यात दुबईत सामना खेळला जाणार आहे.

**म्हणून अक्षर पटेलला पाचव्या क्रमांकावर बढती**

फलंदाजीचा क्रम निश्चित करण्याचा एकमेव निकष म्हणजे खेळाडूचा प्रभाव मूल्यांकन आहे. आम्ही सरासरी, आकडेवारी व त्या सर्व गोष्टींकडे पाहत नाही. त्या क्रमांकावर कोण जास्त कामगिरी करू शकते ते बघतो. अष्टपैलू अक्षर पटेलने त्याला संधी मिळालेल्या दोन्ही सामन्यांमध्ये उत्तम कामगिरी केली, त्यामुळे त्याला पाचव्या क्रमांकावर बढती देण्यात आली आहे, असे गंभीरने सांगितले. (वृत्तसंस्था)

### हर्षित, अर्शदीपला पुढाकार घ्यावा लागेल

एखाद्याने गमावलेली संधी ही दुसऱ्यासाठी सुवर्णसंधी असते. आता वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह दुखापतीमुळे चॅम्पियन्स चषकाच्या बाहेर झाला आहे. अशा परिस्थितीत हर्षित राणा व अर्शदीप सिंगसारख्या खेळाडूंनी पुढाकार घ्यायला पाहिजे. बुमराहच्या अनुपस्थितीमुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढतील अशी अपेक्षा मुख्य प्रशिक्षक जसलप्रीत बुमराहने व्यक्त केली आहे.

गत वर्षी भारताच्या टी-२० विश्वचषक विजयात निर्णायक भूमिका बजावणारा व अंतिम सामन्यातील एका महत्त्वाच्या स्पेलसह १५ बळी टिपणारा जसप्रीत बुमराह १९ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या आठ संघांच्या चॅम्पियन्स चषक स्पर्धेतून बाहेर झाला आहे. संधी गमावणारी व्यक्ती दुसऱ्यासाठीही एक उत्तम संधी असू शकते. राणा, अर्शदीप व मोहम्मद शमी कामगिरी करू शकतील आणि संघासाठी काम करू शकतील, असे ते म्हणाले.

# महिला प्रीमियर लीग हंगाम आजपासून

## गत विजेता आरसीबी व गुजरात जायण्ट्स यांच्यात सलामीचा सामना

◆ **वडोदरा, १३ फेब्रुवारी**

येथे शुक्रवारपासून महिलांच्या प्रीमियर लीग हंगामाला प्रारंभ होणार आहे. शुक्रवारी येथील कोटम्बी स्टेडियमवर गुजरात जायण्ट्स आणि गत विजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यादगरम्यान पहिला साखळी सामना खेळला जाणार आहे, तर दुसऱ्या दिवशी मुंबई इंडियन्सचा सामना दोन वेळा अंतिम फेरीत पोहोचलेल्या दिल्ली कॅपिटल्सशी होईल.

स्मृती मंधानाच्या नेतृत्वाखालील आरसीबीने गतवर्षी दिल्ली कॅपिटल्सचा पराभव करून आपले पहिले विजेतेपद जिंकले. साखळी फेरीत गुणतालिकेत ते तिसऱ्या क्रमांकावर राहिले व मुंबई इंडियन्सविरुद्ध एलिमिनेटर सामना जिंकून अंतिम फेरी गाठली होती.

यंदा आरसीबी विजेतेपद राखण्यास उत्सुक आहे, परंतु हंगामाच्या सुरुवातीला खेळाडूंची



स्मृती मंधाना



ॲशले गार्डनर

अनुपलब्धता व दुखापतीच्या चिंतेमुळे आरसीबीला मोठा धक्का बसला आहे.सोफी डेव्हिन सुटीवर आहे, डावखुरी फिरकीपटू सोफी मोलिनेक्स दुखापतग्रस्त आहे व केट क्रॉसने दुखापतीमुळे हंगामातून माघार घेतली आहे.

अष्टपैलू एलिस पेरी हिच्याही कंबरेला दुखापत झाली होती, परंतु ती वडोदऱ्याला पोहोचली आहे. फिरकी गोलंदाज आशा शोभना व श्रेयंका पाटील दुखापतीतून बरे होत आहे. गतवर्षी आरसीबीच्या वियात डेव्हिन, मोलिनेक्स, पेरी व आशा या सर्वांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

ॲशले गार्डनरच्या नेतृत्वाखालील गुजरात जायण्ट्स संघ आरसीबीविरुद्ध विजयी सलामी नोंदवण्यास उत्सुक आहे डब्ल्यूपीएलच्या दोन हंगामात गुजरात जायण्ट्सच्या चार विजयांपैकी दोन आरसीबी विरुद्ध आहे. सलामवीर बेथ मुनी, डियाण्ड्रा डॉटिन लॉरा वॉलवॉर्ड व फोबी लिचफिल्डकडून उत्कृष्ट कामगिरीची आशा आहे. (वृत्तसंस्था)

### आशा शोभना, पूजा वस्त्राकर हंगामाला मुकणार

दुखापतींमुळे भारताच्या आंतरराष्ट्रीय खेळाडू आशा शोभना आणि पूजा वस्त्राकर यंदाच्या महिला प्रीमियर लीग हंगामाला मुकणार आहेत. त्यांच्या जागी रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू आणि मुंबई इंडियन्सने अनुक्रमे नुझहत परवीन आणि पारुनिका सिसोदिया यांना संघात स्थान दिले आहे. रेल्वेची यष्टीरक्षक परवीन ही पाच टी-२० सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केली आहे आणि ती ३० लाख रुपयांच्या बेस प्राईसवर आरसीबीमध्ये सहभागी होत आहे.

पारुनिकाला लीगच्या पहिल्या आवृत्तीत गुजरात जायंट्सने निवडले होते. नुकत्याच संपलेल्या आयसीसी १९ वर्षाखालील महिला टी-२० विश्वचषकात डावखुरा फिरकी गोलंदाजाने महत्त्वपूर्ण कामगिरी केली व इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात तिला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. ती १० लाख रुपयांना मुंबई इंडियन्समध्ये सहभागी झाली.

### भारताचे क्षेत्ररक्षण समाधानकारक : दिलीप

◆ **अहमदाबाद, १३ फेब्रुवारी**

इंग्लंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत भारतीय संघाला डायव्हिंग आणि डार्टिंग करताना अविश्वसनीय झेल घेताना आणि धावा थांबवताना पाहणे अविश्वसनीय समाधानकारक होते, असे भारतीय संघाचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक टी. दिलीप म्हणाले.

या मालिकेदरम्यान भारतीय खेळाडूंनी सामन्यांच्या महत्त्वाच्या टप्प्यावर अनेक चित्तथरारक झेल, महत्त्वाचे धावबाद व धावा रोखण्यासाठी कडक क्षेत्ररक्षणाचे प्रदर्शन केले. एक संघ म्हणून क्षेत्ररक्षणात केलेल्या प्रगतीचा आम्हाला खूप अभिमान आहे, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# एफआयएच प्रो-लीगसाठी उत्तम तयारी : सलीमा टेटे

◆ **भुवनेश्वर, १३ फेब्रुवारी**

शनिवारपासून एफआयएच प्रो-लीगच्या भुवनेश्वर लेगला सुरुवात होत असून त्याकरिता आमचा संघाची उत्तम तयारी झाली असून उत्कृष्ट कामगिरी करेल, असा विश्वास भारतीय महिला हॉकी कर्णधार सलीमा टेटे हिने व्यक्त केला.

गत एफआयएच प्रो-लीग हंगामातील वाईट कामगिरीला आम्ही मूठमाती देऊन नवीन जोमाने व उत्साहाने यंदाच्या हंगामाची जोरदार सुरुवात करेल, असेही सलीमा म्हणाली.

गत हंगामात आठव्या स्थानावर राहिल्याच्या आठवणी पुसून टाकण्यासाठी भारतीय संघ कलिंगा हॉकी स्टेडियमवर इंग्लंडविरुद्ध आपली मोहीम सुरू करणार आहे.

येथे स्पर्धेत असलेले इतर संघ जर्मनी, स्पेन आणि जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेले नेदरलॅण्ड आहेत. गत हंगामात भारताने केवळ १६ गोल केले होते, तर विजेत्या नेदरलॅण्डने ६३ गोल केले होते.

भारतीय संघ सध्या जगात नवव्या क्रमांकावर आहे, तर बलाढ्य जर्मनी चौथ्या, इंग्लंड सातव्या व स्पेन आठव्या क्रमांकावर आहे.

गत वेळी आमचा हंगाम निराशाजनक होता, परंतु यावेळी आम्ही चांगले प्रशिक्षण घेतले आहे व चांगली तयारी केली आहे. यावेळी चांगले प्रदर्शन करण्यास तयार आहोत, असे टेटे म्हणाली.

भारतीय महिला संघ एफआयएच-प्रो लीगमध्ये १५ व १६ फेब्रुवारी रोजी इंग्लंडविरुद्ध दोन सामन्यांनी आपल्या मोहिमेची सुरुवात करेल व त्यानंतर १८ आणि १९ फेब्रुवारी रोजी स्पेनविरुद्ध लढेल.



भारतीय महिला हॉकी संघाची कर्णधार सलीमा टेटे

संघाला २१, २२ आणि २४, २५ फेब्रुवारी रोजी अनुक्रमे जर्मनी आणि जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या नेदरलॅण्डसारख्या कठीण संघाचा सामना करावा लागेल.

आम्हाला पुन्हा कलिंगा स्टेडियमवर खेळण्याची आणि शक्य तितके जास्त गुण जिंकण्याची उत्सुकता आहे. आम्हाला आव्हानात्मक प्रतिस्पर्ध्यांचा सामना करावा लागणार असून आमचे खेळाडू आव्हान स्वीकारण्यास आणि मैदानावर सर्वोत्तम कामगिरी करण्यास तयार आहेत, असे सलीमा टेटे म्हणाली.

भारतीय महिला हॉकी संघ आपलया उच्च श्रेणीतील प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध समान कामगिरी करेल, अशी आशा मुख्य प्रशिक्षक हरेंद्र सिंग यांनी व्यक्त केली.

गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये घरच्या मैदानावर चीनला हरवून भारताने तिसरे आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद पटकावले होते, ज्यामुळे पॅरिस ऑलिम्पिकमध्ये स्थान मिळवण्यास मुकल्यानंतर त्यांना आवश्यक असलेली ताकद मिळाली.

सविता, सुशीला चानू, निक्की प्रधान, वंदना कटारिया, उदिता, लालरेमसियामी व शर्मिला देवी सारख्या अनुभवी खेळाडूंसह दीपिका, सुनीलिता टोप्पो व ज्योती सारख्या स्टार तरुण खेळाडूंच्या मिश्रणामुळे भारताचा संघ संतुलित आहे. (वृत्तसंस्था)

# भारताचा दक्षिण कोरियाकडून पराभव

### आशिया मिश्र सांघिक बॅडमिंटन

◆ **किंगदाओ, १३ फेब्रुवारी**

येथे सुरु असलेल्या आशिया मिश्र सांघिक बॅडमिंटन स्पर्धेत आज ड गटाच्या साखळी सामन्यात भारतीय बॅडमिंटनपटूंना दक्षिण कोरियाविरुद्ध २-३ असा पराभव पत्करावा लागला, परंतु भारताने ड गटात दुसरे स्थान मिळवून आधीच स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.

बुधवारी मकाऊवर ५-० असा विजय मिळवून दमदार करणाऱ्या भारताने शेवटपर्यंत झुंज दिली, परंतु पुरुष दुहेरीत एम.आर. अर्जुन व सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी या जोडीला जिन योंग व एनए सुंग सेउंग या जोडीकडून पराभव करावा लागला.

ध्रुव कपिला व तनिषा क्रॅस्टो या मिश्र दुहेरी जोडीने सुरुवातीचा गेम २१-११ असा जिंकून सुरुवात केली, परंतु पुढील दोन्ही गेम १२-२१, १५-२१ असे गमावून ५६ मिनिटांत पराभव पत्करावा लागला.

भारताची अव्वल मानांकित महिला खेळाडू नागपूरची मालविका बनसोड हिला जागतिक क्रमवारीत १९ व्या क्रमांकावर असलेल्या सिम यू जिन हिचा सामना करणे खूप कठीण वाटले. २०२२ च्या सय्यद मोदी इंटरनॅशनल स्पर्धेत उपविजेती राहिलेली मालविका हिला केवळ २७ मिनिटांत ९-२१, १०-२१ असा पराभव पत्करावा लागला.



सतीश कुमार करुणाकरन

चेन्नईचा बॅडमिंटनपटू सतीश कुमार करुणाकरनने चो जिओनयोपवर १७-२१, २१-१८, २१-१९ असा एक तास १२ मिनिटांत संघर्षपूर्ण विजय मिळवला. त्यानंतर महिला दुहेरीत त्रिशा जॉली व गायत्री गोपीचंद या जोडीने किम मिन जी आणि किम यू जंग यांच्यावर १९-२१, २१-१६, २१ असा विजय मिळवून भारताला बरोबरीत आणले.

निर्णायक गेममध्ये, पुरुष दुहेरीत एम.आर. अर्जुन व सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी या जोडीने सुंग सेउंग व जिन योंग या जोडीकडून ५३ मिनिटांत २१-१४, १५-२३ असा पराभव पत्करावा लागला.

बुधवारी चिराग शेट्टीने अर्जुनसोबत जोडी करून पुरुष दुहेरीत मकाऊच्या चिन पोन पुई आणि कोक वेन वोंग या जोडीचा पराभव केला. (वृत्तसंस्था)

# आरसीबीच्या कर्णधारपदी रजत पाटीदारची निवड

◆ **बंगळुरू, १३ फेब्रुवारी**

आयपीएल फ्रॅन्चायझी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने गुरुवारी रजत पाटीदारची २१ मार्चपासून सुरू होणाऱ्या आगामी इंडियन प्रीमियर लीग हंगामासाठी आरसीबी संघाचा कर्णधार म्हणून निवड केली.

गत वर्षीच्या लिलावापूर्वी आरसीबीच्या राखीव खेळाडूंमध्ये पाटीदारचा समावेश होता व त्याला सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी (टी-२०) व विजय हजारे चषक वन-डे क्रिकेट स्पर्धेत मध्य प्रदेश संघाचे नेतृत्व करण्याचा अनुभव आहे.

२०२२ मध्ये फ्रॅन्चायझीसोबत करारबद्ध झालेल्या ३१ वर्षीय खेळाडूने मध्य प्रदेशला सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीच्या अंतिम फेरीत पोहोचवले व तिथे त्यांना गत वर्षी मुंबईकडून पाच गड्यांनी पराभव पत्करावा लागला.



उजव्या हाताचा फलंदाज रजत पाटीदार हा अजिंक्य रहाणेनंतर प्रीमियर देशांतर्गत टी-२० स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा दुसऱ्या क्रमांकाचा खेळाडू होता. त्याने १० सामन्यांत ६१ च्या सरासरीने आणि १८६.०८ च्या स्ट्राईक रेटने ४२८ धावा केल्या.

कोहली २०१३ ते २०२१ पर्यंत आरसीबीचा कर्णधार होता आणि त्याची कामगिरी उत्तम होती, परंतु तो आपल्या संघाला आयपीएलचे जेतेपद मिळवून देऊ शकला नाही.

३६ वर्षीय कोहलीने १४३ सामन्यांमध्ये आरसीबीचे नेतृत्व केले. चेन्नई सुपर किंग्जसाठी महेंद्रसिंह धोनी सर्वाधिक काळ कर्णधारपदावर राहिल्यानंतर कर्णधार म्हणून कोहली हा दुसऱ्या क्रमांकाचा कर्णधार आहे.

मी स्वतः व इतर संघातील सदस्य रजत पाटीदारच्या पाठीशी असणार आहे, असे कोहली म्हणाला. (वृत्तसंस्था)

# अमित पांघळ वळला व्यावसायिक मुष्टियुद्धाकडे

◆ **नवी दिल्ली, १३ फेब्रुवारी**

जागतिक मुष्टियुद्धा अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक जिंकणारा भारताचा एकमेव पुरुष मुष्टियोद्धा अमित पांघळ हा व्यावसायिक मुष्टियुद्धाकडे वळला आहे. तो देशातील व्यावसायिक मुष्टियोद्धा होणारा नवीनतम खेळाडू ठरला आहे.

भारतातील सर्वात यशस्वी पुरुष मुष्टियोद्धांपैकी एक असलेल्या २९ वर्षीय अमित पांघळने अमेरिकेतील मॅनेजमेंट कंपनी क्रिटिकल स्पोर्ट्स ॲण्ड एंटरटेनमेंटसोबत करार केला आहे.

क्रिटिकल स्पोर्ट्स ॲण्ड एंटरटेनमेंटला जगप्रसिद्ध ऑलिम्पियन मुष्टियोद्धा अमित पांघळसोबत करार केल्याची घोषणा करताना अभिमान वाटतो, असे एजन्सीने इंस्टाग्राम पोस्टमध्ये लिहिले आहे.



तो पुन्हा एकदा व्यावसायिक रँकिंगमध्ये येत असताना, अमित अनुभव, कौशल्य आणि चॅम्पियन मानसिकतेचा खजिना घेऊन येतो. आम्ही सह-व्यवस्थापक कॉनर यांच्यासह क्रिटिकल स्पोर्ट्स ॲंड एंटरटेनमेंट कुटुंबात त्याचे स्वागत करतो आणि त्याच्या कारकिर्दीच्या या रोमांचक पुढील अध्यायात त्याचे मार्गदर्शन करण्यास उत्सुक आहोत, असे एजन्सीने म्हटले आहे.

हरयाणाच्या अमित पांघळ हौशी सर्किटमध्ये ५१ किलो वजनी गटात भाग घेतो. त्याला अद्याप त्याची पहिली व्यावसायिक लढत मिळालेली नाही.

जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक विजेता निशांत देव व्यावसायिक मुष्टियुद्धाकडे वळल्यानंतर अवघ्या एका महिन्यातच हा बदल झाला आहे.

माजी जागतिक प्रथम क्रमांकाचा खेळाडू अमित पांघळने ऑलिम्पिक वगळता सर्व प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके जिंकली आहेत.

अमित पांघळने एकेकाळी आशियाई खेळ व आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदकांसह २०१९ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत ऐतिहासिक रौप्यपदक जिंकून या खेळावर वर्चस्व गाजवले होते.

तथापि, गत चार वर्षांत त्याचे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन मर्यादित राहिले. टोकियो ऑलिम्पिकमधून लवकर बाहेर पडल्यानंतर अमितने भारतीय संघातील स्थान गमावले.

नंतर त्याने २०२२ च्या राष्ट्रकुल स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले व पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळवली, मात्र ऑलिम्पिकच्या उप-उपांत्यपूर्व फेरीत याला झांबियाच्या पॅट्रिक चिन्येम्बाकडून पराभव पत्करावा लागला होता. (वृत्तसंस्था)

# टेबल टेनिसमध्ये जश मोदी, दिया-स्वस्तिकाला सुवर्ण

◆ **डेहराडून, १३ फेब्रुवारी**

३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत टेबल टेनिसमध्ये महाराष्ट्राच्या जश मोदीने तामिळनाडूच्या आंतरराष्ट्रीय खेळाडू जी. साथियन याच्यावर विजय नोंदविला व पुरुषांच्या एकेरीत सुवर्णपदक पटकाविले. महाराष्ट्राच्या दिया चितळे व स्वस्तिका घोष या जोडीने महिला दुहेरीचे सुवर्णपदक जिंकून दिले. महिला एकेरीच्या संघर्षपूर्ण अंतिम लढतीनंतर महाराष्ट्राच्या स्वस्तिका घोष हिला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले, तर पृथा वर्टीकरला कांस्यपदक मिळाले.

पुरुषांचा एकेरीचा अंतिम सामना जश मोदीने ७-११, ६-११, ११-७, ११-८, १४-१२, ६-११, ११-६ असा जिंकला.

महिला दुहेरीत दिया चितळे व स्वस्तिका घोषने निथाया श्री मनी व काव्य श्री बैस्सा या तामिळनाडूच्या जोडीचा ३- २ (६-११, ८- ११, ११-९, ११- ७, ११-६) असा पराभव करून सुवर्णपदकावर मोहोर उमटवली. महिला एकेरीच्या अंतिम लढतीत स्वस्तिका घोष हिने तमिळनाडूच्या एस. सेलेना हिला कडवी दिली. मात्र अखेर तमिळनाडूच्या सेलेनाने ही लढत ११-७, ११-२, ६-११, ७-११, ११-७, ११-९ अशी ४-३ ने जिंकून सुवर्णपदकाला गवसणी घातली. (वृत्तसंस्था)



जश मोदी

# महाराष्ट्राचे सुवर्णपदकांचे अर्धशतक

◆ **डेहराडून, १३ फेब्रुवारी**

येथे सुरु असलेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पुन्हा एकदा सर्वाधिक १७९ पदकांची कमाई करणारा महाराष्ट्र देशातील एकमेव संघ ठरला आहे. या स्पर्धेत ५३ सुवर्णपदकांसह ७० रौप्य, ७२ पदकांची लयलूट करत पदकतालिकेत महाराष्ट्राने दुसरे स्थान प्राप्त केले आहे. सुवर्ण, रौप्य व कांस्यपदकांचे अर्धशतकी पल्ला पार करणारा महाराष्ट्र हा देशातील एकमेव संघ आहे.

**स्वाती शिंदेला सुवर्णपदक, आदर्श पाटीलला रौप्य**

हरिद्वार : कोल्हापूरच्या स्वाती शिंदेने गत दशकभर ऊराशी बाळगलेले राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदकाचे स्वप्न उत्तराखंडात साकार केले. आदर्श पाटीलला रौप्यपदकावर समाधान मानाने लागले. रोशनाबाद येथील योगस्थळ हॉलमधील कुस्ती मैदानात ५३ किलो वजन गटात स्वाती शिंदेने मध्य प्रदेशच्या पूजा जाटला ५-१ गुणांनी नमवून स्पर्धेतील महाराष्ट्रासाठी कुस्तीतील एकमेव सुवर्ण यश संपादन केले. उपांत्य फेरीत स्वातीने हरयाणाच्या ज्योतीला नमवून कुस्तीशौकिनांची मने जिंकली होती.



स्वाती शिंदे

पूजा जाटविरूध्द स्वाती शिंदने कडवी झुंज दिली. पहिल्या फेरीमध्ये स्वाती केवळ १ गुणाने आघाडीवर होती. दुसऱ्या फेरीत स्वातीने भारंदाज डावावर सलग ४ गुणांची कमाई करीत सुवर्णपदकाला गवसणी घातली.

७४ किलो फ्रीस्टाईल गटात कोल्हापूरचा आदर्श पाटील याला सेनादलाच्या जयदीप कडून १०-० गुणाने पराभव पत्करावा लागला. आदर्शला रौप्यपदक मिळाले.

हरिद्वार येथे संपलेल्या कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्राच्या कुस्तीपटूंनी १ सुवर्ण, २ रौप्य व ६ कांस्य अशी ९ पदकांची कमाई केली. स्वाती शिंदेने सुवर्ण, भाग्यश्री फंड, आदर्श पाटीलने रौप्य, तर अक्षय डेरे, हर्षवर्धन सदगीर, अमृता पुजारी, हितेश सोनावणे , दिग्विजय भोंडवे, पै.अश्लेशा बागडे, आदर्श पाटीलने कांस्यपदकावर नाव कोरले. (वृत्तसंस्था)

# पेंटॅथ्लॉनमध्ये महाराष्ट्राला सर्वसाधारण विजेतेपद

### दीक्षा यादव, सौरभ पाटीलची हॅट्ट्रिक

◆ **डेहराडून, १३ फेब्रुवारी**

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील मॉडर्न पेंटॅथ्लॉनमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक पदकांची बाजी मारून सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. महिलांच्या टेट्राथ्लॉनमध्ये दीक्षा यादवने वैयक्तिक व सांघिक गटात सुवर्णयशाला गवसणी घातली. मिश्र प्रकारातही दीक्षा यादव व सौरभ पाटीलने रूपेरी यश संपादून पदकांची हॅट्ट्रिक पूर्ण केली.

गौलापार येथे संपलेल्या मॉडर्न पेंटॅथ्लॉनमध्ये सलग चौथा दिवस महाराष्ट्रासाठी सुवर्णदिन ठरला. महिलांच्या टेट्राथ्लॉनमध्ये दीक्षा यादवने चमकदार कामगिरी करत ९४६ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. तिची सहकारी मुग्धा वाव्हळ ९२१ गुणांसह दुसऱ्या स्थानावर राहिली व रौप्यपदक मिळविले. उत्तराखंडची भार्गवी रावत ९१६ गुणांसह कांस्यपदकाची मानकरी ठरली.



मुग्धा व दीक्षा

सांघिक प्रकारात दीक्षा संदीप यादव, मुग्धा वाव्हळ व दीप्ती काळमेघने २७४९ गुणांसह सुवर्णपदक जिंकले. उत्तराखंडच्या संघाने महाराष्ट्राला चिवट लढत दिली आणि २४१९ गुणांसह रौप्यपदक जिंकले. हरयाणाच्या संघाने २०२२ गुणांसह तिसरे स्थान पटकावले. मिश्र प्रकारात ८२४ गुणांची कमाई करीत दीक्षा यादव व सौरभ पाटीलने रौप्यपदकावर नाव कोरले. ८३९ गुणांसह मध्यप्रदेशच्या जोडीने सुवर्णपदक पटकवले.

महाराष्ट्राच्या पुरूष संघाने सर्वसाधारण विजेतेपदाचा करंडक पटकविला. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी यांनी विजेतेपद पटकविणाऱ्या महाराष्ट्र संघाचे मैदानात भेटून अभिनंदन केले. यावेळी भारतीय मॉर्डन पेंटॅथ्लॉन महासंघाचे विठ्ठल शिरगांवकर, निलेश नाईक, शेखर खासनीस आदी मान्यवर उपस्थित होते. (वृत्तसंस्था)

# विडी घरकुलमधील युनिक टाउन रो हाऊसमध्ये घरफोडी

## सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह लाखो रुपयांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दिनांक १३ फेब्रुवारी -** शहरातील विडी घरकुल परिसरातील युनिक टाउन रो हाऊस मधील बंद घर फोडून चोरट्याने सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह लाखो रुपयांचा ऐवज चोरून नेला ही घटना गुरुवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली असून याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते

संतोष दोड्डी व स्नेहा दोड्डी हे दांपत्य युनिक टाउन रो हाऊस मध्ये राहण्यास आहे. दोड्डी कुटुंब हे रुग्णालयाच्या कामकाजा निमित्त शहरातील एका नातेवाईकाकडे गेल्या दोन-तीन दिवसापासून राहण्यास होते युनिक टाउन येथील घराला कुलूप लावलेले होते गुरुवारी सायंकाळी चारच्या सुमारास दोड्डी कुटुंबीय युनिक टाउन येथील घरी गेले होते त्यावेळी त्यांना घराम ध्ये चोरी झाल्याचे दिसून आले याबाबत दोड्डी यांनी एमआयडीसी पोलिसांना कळविल्यानंतर पोलीस निरीक्षक प्रमोद वाघमारे व इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली

चोरट्याने दोड्डी यांच्या बंद घराचा कडी कोयंडा तोडून घराम ध्ये प्रवेश केला घरामधील दोन्ही बेडरूम मधील कपाटे उचकटून कपाटातून सोन्या चांदीचा ऐवज तसेच रोख रक्कम चोरून नेली चोरट्याने दोड्डी यांच्या घरातून ३२ ग्रॅम सोन्याचे लॉकेट दहा ग्रॅम सोन्याचे लॉकेट एक तोळ्याची अंगठी अर्धा तोळ्याची सोन्याची नथ एक तोळ्याचे सोन्याचे मणी एक ग्रॅमच्या दोन अंगठ्या दोन ग्रॅमची नथ एक ग्रॅम चे सोन्याचे मंगळसूत्र पंधरा तोळ्याचे चांदीचे जाणव २५ तोळ्याचे चांदीचे पैंजण आणि रोख पंचवीस हजार रुपये असा ऐवज चोरून नेल्याची माहिती स्नेहा दोडी यांनी दिली याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्यात आला नव्हता.

## निधन वृत्त...

### दिलीप व्हटे



**अक्कलकोट, दि. १३ फेब्रुवारी-** दहिटणे (ता. अक्कलकोट) येथील दिलीप धानप्पा व्हटे (वय ६९) यांचे अल्पशा आजाराने सोलापूर येथील रुग्णालयात उपचार घेत असताना निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते संगोगी (आ)चे ग्रामविस्तार अधिकारी धनराज व्हटे यांचे वडील होत.

### उमेश लोडाया



**सोलापूर,दि. १३ फेब्रुवारी-** भवानी पेठ येथील रहिवाशी उमेश मणिलालभाई लोडाया (वय ६५) यांचे गुरुवारी पहाटे आकस्मिक निधन झाले. मोदी स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.


## व्होळे (खु) विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, व्होळे (खु) ता. माढा

### सचिव नेमणे आहे

व्होळे (खु) विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, व्होळे (खु) ता. माढा या संस्थेचे सचिव पदाची नेमणूक करार पध्दतीने (Contract Basis) मानधन तत्वावर करण्यात येणार असून पात्रतेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहे.

**पात्रता :-**
१) तो महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असला पाहिजे.
२) त्याचे वय नेमणूकीच्या तारखेस किमान २३ व कमाल ४५ वर्षे असावी.
३) तो नेमणुकीच्या तारखेस शाखेचा पदवीधर असावा, त्याने/तिने हायर डिप्लोमा इन को-ऑप. मॅनेजमेंट / जी. डी. सी. ॲन्ड ए./ वाणिज्य शाखा पदवी प्राप्त असल्यास प्राधान्य राहील.
४) तो महाराष्ट्र स्टेट सर्टिफिकेट इन इन्फर्मेशन ॲन्ड टेक्नॉलॉजी (MSCIT) परिक्षा उत्तीर्ण असला पाहिजे किंवा, तो विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेत लिपिक म्हणून काम केले असल्यास अ) शैक्षणिक पात्रता किमान १२ वी उत्तीर्ण व प्रत्यक्ष ५ वर्ष कामकाजाचा अनुभव.
ब) शैक्षणिक पात्रता किमान १० वी उत्तीर्ण व प्रत्यक्ष १० वर्ष कामकाजाचा अनुभव.
५) तो महाराष्ट्र स्टेट को-ऑप युनियन पुरस्कृत सहकारी पदविका (LDC) किंवा (DCM) धारण करणारा असल्यास प्राधान्य.
६) तो CAS प्रमाणे दप्तर लिहिणेबाबत प्रशिक्षण घेतलेला असल्यास प्राधान्य.

तरी इच्छुकांनी दिनांक ११-०२-२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. मुळ कागदपत्रासह संस्थेच्या येथील कार्यालयात व्यक्तीशः संचालक मंडळासमोर मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

सही/-
चेअरमन
व्होळे(खु.) वि.का.सेवा
सह.संस्था व्होळे(खु.) ता.माढा


## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व तालुका बार्शी पैकी शहर बार्शी व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णन :- डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी शहर बार्शी म्यु. पल हद्दीतील

बिनशेती खुले प्लॉट याचा सव्हे नं. ४२४/१ब, याचा जुना गट नं. ९३६/५ व याचा नविन गट नं. ९४२/५ यामधील अ) बिनशेती प्लॉट नं. २८ याचे क्षेत्रफळ २३४.५० चौ.मी. चा आकार १५५ रु. ०० पैसे. ब) बिनशेती प्लॉट नं. २९ याचे क्षेत्रफळ २३४.५० चौ.मी. चा आकार १५५ रु. ०० पैसे, क) बिनशेती प्लॉट नं. ३० याचे क्षेत्रफळ १८२.७५ चौ.मी. चा आकार १२१ रु. ०० पैसे. व याचे रोड बाधीत क्षेत्र १७६.०० चौ.मी. येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक वर्णनाचे बिनशेती प्लॉट, आतील दगड-माती, झाड-झुडुप, वगैरे सर्व तदंगभूत वस्तुसह, मालकी कब्जे वहिवाटीच्या हक्कासह मिळकती.

२) वर कलम १ मध्ये नमूद केलेले बिनशेती प्लॉट्स् मिळकती या १) श्रीमती वर्षा पृथ्वीराज देशमुख २) सौ. वर्षा नानासाहेब साखरे ३) श्री. बापुसाहेब भिमराव अंधारे ४) श्री. शामनंदन नारायण फरतडे ५) श्री. शुक्राचार्य किसन भोसले यांचे सामाईक स्वकष्टार्जीत खरेदी मालकीच्या मिळकती आहेत. सदर मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईटसला त्यांचे नावाची नोंद आहे. सदर मिळकत त्यांचे मालकी हक्काने कब्जे वहिवाटीस आहे. सदर मिळकतीचे उपरोक्त मालक यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी आमचे सौ. सुप्रिया शेखर गुंडपाटील, रा. बार्शी, जि. सोलापूर यांना योग्य त्या बाजारभाव किंमतीस विक्री करणेची ठरवुन इसारापोटी आमचे अशिलाकडून रक्कम घेऊन तसा इसार पावतीचा लेखी करार केलेला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री मिळकत मालकांनी आमच्या अशिलास दिलेली आहे व आमचे अशिलाचीही तशी खात्री झालेली आहे.

३) तरी वर नमुद मिळकतींवर कोणाचा कसलाही हक्क हितसंबध असल्यास, सदर मिळकती संदर्भाने कोणी इसार पावती, साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, हितसंबंध, बोजा, बक्षिस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०८ दिवसाच्या आत आमच्या अशिलास लेखी स्वरुपात कागदपत्रासह त्यांचे विधीज्ञांचे खालील नमुद पत्यावर हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहेत, असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही हरकत आमचे अशिलाचे खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणुन ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. १३/०२/२०२५.

सही/-
**ॲड.विक्रम प्रभाकर जाधव**
दिवाणी न्यायालय, बार्शी, जि.सोलापूर
मो.नं.९४२३८३७७७७
अशिलातर्फे ॲडव्होकेट

## जाहीर नोटीस

सोलापूर येथील तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर व मैंदर्गी येथील सर्व रहिवासीयांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णनः डि व सब डी सोलापूर तालुका अक्कलकोट पैकी मैंदर्गी नगर परिषद मैंदर्गी येथील विणकर वसाहत परिसर झोपडपट्टी जुना वार्ड क्रं.१६, नवीन वार्ड क्रं.३ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील जुना म्युन्सिपल घर नं.अ-१८९ यांसी नवीन म्युन्पिल घर / मालमत्ता क्रं. २१७ यांसी हद्द पूर्वपश्चिम ३६ फुट दक्षिणोत्तर ३३ फुट एकूण क्षेत्र ११०.४० चौ.मी. अथवा ११८८ चौरस फुट इतकी असून यात १०४१० मापाचे बांधकाम असलेली दोन खोल्या असून बाकीची जागा खुली आहे. यात पश्चिम मुखी दरवाजा असून, पाणी जाण्याचे हक्कासह व यात नळ व लाईट कनेक्शनची सुविधासह. यासी चर्तुसीमा-पूर्वेस-नाला, पश्चिमेस-रस्ता, दक्षिणेस मुदगल यांची घरजागा, उत्तरेस-रस्ता

सदर प्रमाणे वर वर्णन केलेली घरजागा ही रामचंद्र महादेव हिरस्कर यांचे कब्जेवहिवाटीची होती त्यांनी दिनांक १३/०२/२०२५ रोजी कब्जा पावती करारपत्राने तसेच संमतीपत्र व प्रतिज्ञापत्राद्वारे मे. पब्लिक नोटरी सो, यांचे समोर दिलेली आहे. त्याप्रमाणे सदरी घरजागा ही आमचे अशिल नागम्मा शिवानंद हिप्परगी यांच्या कब्जेवहिवाटीची झालेली आहे. त्याप्रमाणे आमचे अशिल हे सदर घरजागेवर नगर परिषद मैंदर्गी यांचे कडे कर आकारणीला नाव लावण्यासाठी अर्ज दिलेले आहे.

तरी या नोटीसीद्वारे कळविण्यता येते की, जुना वार्ड क्रं. १६, नवीन वार्ड क्रं.३ या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील जुना म्युन्सिपल घर नं.अ-१८९ यांसी नवीन म्युन्पिल घर/मालमत्ता क्रं.२१७ या जागेवर आमच्या अशिल सतिश परमेश्वर आरेनवरु यांचे कर आकारणी दप्तरी नाव लावणेस कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसाच्या आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत व तक्रार न आल्यास ही झोपडी निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांच्या नावाची नोंद मैंदर्गी नगर परिषद, मैंदर्गी येथील कर आकारणी दप्तरी करुन घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारची तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर प्रकटन दिले ता.१३/०२/२०२५.

सही/-
**नाईकवाडी ए.डी. ॲडव्होकेट**
**१८८६/४, विणकर वसाहत मु.पो.**
**मॅदर्गी ता. अक्कलकोट जि. सोलापूर.**
**मो.नं. ९८८१५२२९०७/८४२१०९८१७७.**
**अशिला तर्फे ॲडव्होकेट**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अ.नं.७१/२०२४

### बार्शी येथील मे. अति. जिल्हा न्यायाधीश साहेब यांचे न्यायालयात

**१. श्रीमती पार्वती यादव** — **अर्जदार**
वि.
**२. सौ. निर्मला यादव, वगैरे** — **सा.वाला**

प्रति,
श्री. भिमराव शंकर यादव, वय ४९ वर्षे,
धंदा - नाही, पत्ता माहित नाही

ज्याअर्थी यातील अर्जदाराने तुमचेविरुध्द या मे. कोर्टात हल्लीचा अर्ज रे.सि.अ.नं. ८४/२०१६ हे अपिल रिस्टोअर होवून मिळणेकरीता आणलेले आहे सदर अर्जाचे समन्स/नोटीस घेवून मे. कोर्टाचे वेलीफ बजावणी करीता अर्जात नमूद पत्त्यावरील सा. वाली नं. १ कडे गेले असता त्यांनी समन्स/नोटीस स्विकारली नाही तुम्ही नेमके कोठे राहता हे समजून आले नाही म्हणून समन्स/नोटीसची बजावणी न होता परत आलेले आहे परंतु तुम्ही जाणिवपूर्वक समन्स/नोटीसची बजावणी होवू देत नाहीत तुम्हास सदर अर्जाचे समन्सची बजावणी होणे न्यायाचे दृष्टीने गरजेचे आहे सदर अर्जाकामी तुमचेविरुध्दही मागणी केलेली असून तुम्ही अर्जाकामी सा.वाला नं.२ म्हणून सामील आहात.

त्यास्तव या जाहीर समन्स/नोटीसद्वारे आपणास सुचित करण्यात येते की, आपण सदर अर्ज कामी हे जाहीर समन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमली तारीख २८/०३/२०२५ रोजी स्वतः अगर माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे लेखी स्वरुपात मा. न्यायालयात दयावे. मुदतीत आपण हजर होवून आपले म्हणणे दिले नाहीतर आपणास सदर समन्स/नोटीसची बजावणी होवूनही आपणास कांहीही सांगावयाचे नाही असे समजून मा. न्यायालयाचे सदरकामी यथायोग्य हुकूम होतील याची नोंद घ्यावी.

सदरचे जाहीर समन्स/नोटीस आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे. ता.११/०२/२०२५

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**अति. जिल्हा न्यायालय, बार्शी**

## जाहीर प्रसिध्दीकरण

पु. ने. ता. २१/२/२५
दि. कि. अर्ज ६/२०२५

### बार्शी येथील मे. अप्पर जिल्हा व सत्र न्यायालय साहेब यांचे कोर्टात

**१. चि. वेदांत हेमंत येवनकर**
वय १६ वर्षे, धंदा - शिक्षण
रा. कासारवाडी रोड, बार्शी, जि. सोलापूर
अ.पा.का. जनक आई अर्जदार नं. २
**२. श्रीमती गौरी हेमंत येवनकर**
वय - ४० वर्षे, धंदा - घरकाम
रा. कासारवाडी रोड, बार्शी, जि. सोलापूर
व अर्जदार नं. १ ची अपाक — **अर्जदार**

विरुध्द

**महाराष्ट्र शासन** — **सामनेवाला**

**(समन्स जिल्हाधिकारी सोलापूर यांना बजावणेत यावी)**

ज्याअर्थी अर्जदाराचे नावावरील डि. सोलापूर सब.डी. ता. बार्शी पैकी मौजे बार्शी शहर हद्दीतील याचा गट नंबर ६३६/२ चा प्लॉट नंबर २३ आहे. क्षेत्रफळ ऊताऱ्या प्रमाणे चौ मी २७५.६३ आहे. याचा बिनशेती आकार रुपये १८२.०० बार्शी नगरपरिषद यांनी दिनांक २१/०८/२०१४ रोजी जा क्र स्था/नर/२९०४ अन्वये बांधकाम परवाना मंजुरी दिल्याप्रमाणे २६०.१८ चौ. मी केलेले बांधकाम व त्यातील तदंगभुत याची मोजमापे पुर्व बाजु मीटर १९.४६, दक्षिण बाजु मीटर १४.८३, पश्चिम बाजु मीटर १९.५१ व उत्तर बाजु मीटर १४.४१ आहे. याचे वागणुक व पाणी दक्षीण बाजुचे रस्त्यास व पाणी लेआऊट मध्ये तयार केलेले ड्रेनेज चेंबर (गटारी) मधुन जाते व आहे. यासी चतुःसिमा पुर्वेस गट नंबर ६३६/२ पैकी ओपनस्पेस चा प्लॉट, दक्षिणेस मुळ गट नंबर ६३६/२ पैकी जाणे येणेसाठी सोडलेला मीटर ९.१४ याचे फुट ३० चा पुर्व पश्चीम चालीचा कासारवाडी रोड पर्यंतचा रस्ता, पश्चिमेस मुळ गट नंबर ६३६/२ चा प्लॉट नंबर २४ व उत्तरेस गट नंबर ६३६/२ च प्लॉट नंबर २२ येणे प्रमाणे चतुः सिमापुर्वक प्लॉट सदर प्लॉट या साठी नळ कनेक्शनची लाईन टाकलेली असुन ती नगरपालिकेच्या कनेक्शनला जोडले नंतर त्या कनेक्शन मधुन पाणी घेणेचे अधिकारासह यामध्ये २ मजली आरसीसी बांधकामासह जागा येणेप्रमाणे प्लॉट झाडझुडूप दगड माती वगैरे सर्व तदंगभुत हक्कासह घरजागा ही विक्री करण्यास परवानगी मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखलकेलाला आहे.

त्याअर्थी वर नमुद केलेल्या मिळकतीबाबत तसेच विक्री व्यवहार करणेबाबत परवानगी देणेबाबत कोणाचीही कसलीही तक्रार अथवा हरकत असल्यास त्याने सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत स्वतः अथवा योग्य त्या प्रतिनिधीमार्फत मे. कोर्टाच्या वेळेत सदरकामी हजर राहुन लेखी हरकत अथवा तक्रार मांडावी अन्यथा कोणाचीही कसलीही हरकत नाही असे समजुन मे. कोर्ट सदर अर्जास अनुसरुन योग्य ते हुकूम करतील ही जाहीर नोटीस मे. कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी आज रोजी ता १२/०२/२०१५ रोजी प्रिसिध्द केली.

**सही/-**
**लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**अप्पर जिल्हा व सत्र न्यायालय,बार्शी**

## मे. उपनिंबधक, सहकारी संस्था, शहर सोलापुर, सोलापूर यांचे समोर

**सोलापुर जिल्हा महसुल कर्मचारी सहकारी पतसंस्था नियमित सोलापुर**
सिटी सर्व्हे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापुर ४११००३

जा.क्र./उप/३९७५/२०२५
लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापुर — अर्जदार
विरुध्द
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) — जाब देणार

| अ. क्र. | दावा क | दावा रक्कम | प्रतिवादी नवरं | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | २३४/२०२४ | ७,५१,२१०/- | १<br>२ | १. श्री. औदुर्ती राजशेखर नारायण सहकर्जदार ओदुर्ती मयुरी राजशेखर रा. फ्लॅट नं. १९,५ वा मजला, युनिटी ड्रिम्स प्रेम नगर, जुळे सोलापूर, रोहन प्लाझा जवळ सोलापूर<br>२. श्री. औदुती आनंद नारायण रा. १९५, लक्ष्मी नगर, हत्तुरे वस्ती, मजरेवाडी सोलापूर |
| २ | २३५/२०२४ | २,५५,७३९/- | १<br>२<br>३ | १. श्री सुलेमान शहाबुदिदन तांबोळी मु. पो. होनमाने गल्ली ता. मंगळवेढा जि. सोलापूर<br>२. श्री. रत्नाकर मोहनलाल लोंढे रा. प्लॉट नं ३१ शिवगंगा नगर शेळगी विठ्ठल मंदिर जवळ ता.द. सोलापूर जि. सोलापूर<br>३. श्री. ब्रम्हदेव केरवा ननवरे मु. पो. हिरज ता.उ. सोलापूर जि. सोलापूर |
| ३ | २३६/२०२४ | ४,५५,१९१/- | १<br>२<br>३ | १. श्री. शिंदे अविनाश रामकृष्ण रा.१०९ किलुर चन्नम्मा नगर सोनी कॉलेज समोर सैफुल विजापूर रोड सोलापूर<br>२. श्री. पाटिल संदिप शिवाजी रा. रूम नं ७१/४ गट नं १० विजापूर रोड एस आर पी कॅम्प मोलापुर<br>३ श्री. पाटिल किरण बाळासो रा. मारूती मंदिर समोर रूम नं ७०/६ विजापूर रोड एस आर पी कॅम्प सोलापूर |
| ४ | २३७/२०२४ | ४,१९,९०३/- | १ | १. श्री. सतीश भिमराव साळुंखे मु. पो. बोंडले घर नं २८९ ता. माळशिरस जि. सोलापूर |
| ५ | २३८/२०२४ | ५,०९,५८५/- | ३ | ३ श्री. मुल्ला निसार मशाक रा. शासकीय निवास स्थान आर बिल्डींग सोलापूर जिल्हा न्यायालय जि. सोलापूर |
| ६ | २४०/२०२४ | ९,२०,१२४/- | १<br>२<br>३ | १. श्री. जोशी संजय प्रल्हाद रा. डी.ए.बी. कॉलेज जवळ फ्लॅट नं ५ भवानी पेठ सोलापुर जि. सोलापूर<br>२. श्री. जोशी शितल संजय रा. संजय विध्या नगर शेळगी सोलापूर जिल्हा सोलापूर<br>३. श्री. लोंढे नाथाजी वायुगव रा. नागेश करजगी शाळे जवळ ९२ राजेश्वरी नगर बार्शी रोड, बाळे उ. सोलापूर जि. सोलापूर |
| ७ | २४१/२०२४ | १,२१,२६७/- | ४ | ४. श्री. क्षिरसागर सुरेश अभिमान रा.मु.पो. कळमण बाझार पेठ ता. उ. सोलापूर जि. सोलापूर |
| ८ | २४२/२०२४ | १,२१,०६२/- | २<br>३ | २. श्री. बनसोडे संतोष पितांबर रा. ९३२ थोबडे वस्ती जूना देगाव नाका रितेश बालक मंदिर शाळे जवळ जि. सोलापूर<br>३ श्री. घोडके विजय किसन रा.१२६ थोबडे वस्ती जूना देगाय नाका समाज मंदिर जवळ जि. सोलापूर |
| ९ | २४४/२०२४ | २,५४,२६६/- | १<br>२<br>३ | १. सौ. मोरे ज्योती काशीनाथ रा.१२०/७० यज्ञ नगर अरविंद धाम रोड मुरारजी पेठ जि. सोलापूर<br>२. श्री. शिंदे पांडुरंग हरिदास रा. सहयाद्री शाळा दमाणी नगर सोलापूर जि. सोलापूर<br>३. श्री. केसकर महेश गोविंद रा. प्लॉट नं. २७ सिटीझन पार्क विजापूर रोड आर.टी.ओ. जवळ जि. सोलापूर |
| १० | २४५/२०२४ | ९७४६०/- | १<br>२ | १. श्री. काटकर विकास रत्नाकर रा. घर नं १७८/४ एस के बीअर बार जवळ जोडभावी पेठ सोलापूर जि. सोलापूर<br>२. श्री. पवार दिपक प्रल्हाद रा. पुकाळे दुध डेअरी जवळ ७३६ श्रध्दाकुंज अपार्टमेंट शुक्रवार पेठ सोलापूर जि. सोलापूर |
| ११ | २४७/२०२४ | ३७४०९/- | १<br>२ | १. श्री. पवार विनोद अशोक रा. २७१५ मुरारजी पेठ निराळे वस्ती सोलापुर<br>२. श्री. डोंगरे सोमनाथ जालिंदर रा. ११८० जुनी पोलिस लाईन मुरारजी पेठ सोलापुर जि. सोलापूर |
| १२ | २४८/२०२४ | ११८७८०/- | १<br>२ | १. श्री. शिंदे महेश प्रभाकर रा. शिवगंगा नगर शेळगी ता.द. सोलापूर जि. सोलापूर<br>२. श्री. नरोटे महादेव बिरप्पा रा.३८/२ विदया नगर शेळगी महालक्ष्मी नगर ता.द.. सोलापूर जि. सोलापूर |
| १३ | २४९/२०२४ | ८६८८६/- | १<br>२ | १. कु-रूचिता प्रमोदकुमार जैस्वाल रा. प्लॉट नं ३ साची कॉप्लेक्स शिवगंगा नगर भाग २ जुळे सोलापुर गोविंदश्री चौक इंदीरा नगर सोलापूर ४१३००४<br>२. श्री. जित्री सतीश नरसिंग रा. स्वास्तीक मिठाई १०८/बी साखरपेठ सोलापुर जि. सोलापूर |
| १४ | २५०/२०२४ | ८४३१४/- | २ | २. श्री. धर्मधिकारी शिवराज अशोक रा. जुने विठठल मंदिर जवळ घर नं १२३३ उ कसबा टिळक चौक सोलापुर जि. सोलापूर |
| १५ | २५१/२०२४ | १३०२०५/- | १<br>२<br>३ | १. सी. आयवळे फुलाबाई सुखदेव रा. घर नं १५४ जुनी धोंडीबा वस्ती एस एम सी दवाखाना शेजारी रामवाडी जि. सोलापुर<br>२. श्री.अ. शेख जब्बार साहेबलाल रा. परमेश्वर आश्रम शाळा जवळ लमाणतांडा पो कामती (ख) ता मोहोळ जि. सोलापुर<br>३. सौ. जाधव रोहिणी नागनाथ ग. प्लॉट नं ७५ मंजुनाथ नगर लिमयेवाडी लगत सोलापुर जि. सोलापुर |
| १६ | २५२/२०२४ | ९८३७१८/- | १ | १. श्री. भैरीनाथ साहेबराव उघडे मु.पो. वडशिवणे ता. करमाळा जि. सोलापूर |
| १७ | २५३/२०२४ | ३६४२००/- | १<br>२<br>३ | १. श्री. घोडके संतोष आमोगसिध्द रा. ८१ राजेस्व नगर विजापूर रोड सोलापूर जिल्हा सोलापूर<br>२. श्री. पाटील संतोष सिध्दगोंडा रा.१८७,१८८ जानकी नगर जुळे सोलापूर मारूती मंदिर जवळ सोलापूर जि. सोलापूर<br>३. सौ. घोडके सुप्रिया संतोष रा.१-२७० माढा कॉलनी जुळे सोलापूर जि. सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे/पत्तावर आढळून येत नसल्याने /अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणे येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वताः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांक-२५/०२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

प्रतिवादी यांनी तारखेस बेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि.०७/०२/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्य दिले आहे.

स्थळ - सोलापुर
दि. ०७/०२/२०२५

शिक्का

**सही/-**
**(डॉ.पी.ए. बागल)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, सोलापुर शहर सोलापुर**

## आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड

IDFC FIRST Bank

(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) । सीआयएन: L65110TN2014PLC097792
नोंदणीकृत कार्यालय: केआरएम टॉवर्स, ८ वा मजला, हॅरिंग्टन रोड, चेटपेट, चेन्नई-६०००३१. दूरध्वनी: +९१ ४४ ४५६४ ४००० फॅक्स: +९१ ४४ ४५६४ ४०२२

### वित्तीय मालमत्तांचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांचे नाव | कलम १३ (२) सूचना तारीख) | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | १२८९६८२०५ | मालमत्तेवर कर्ज | १.अप्पासो बलभीम गायकवाड<br>२.रोहन अप्पासो गायकवाड | २८/१२/२०२४ | रु.८,४०,४९९.५०/- |
| मालमत्तेचा पत्ताः मिलकट क्रमांक १३५/१ चा तो सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण जमीन क्षेत्रफळ २००० चौ. फूट आणि दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे क्षेत्रफळ तळमजला आहे = १२००.०० चौ. फूट, एकूण बांधलेले क्षेत्रफळ = १२००.०० चौ. फूट. फूट., गावात वसलेले शिरगाव तालुकाः पंढरपूर, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि सीमाः पूर्वः तुकाराम ज्ञानेश्वर माने, पश्चिमः रस्ता, उत्तरः अण्णासाहेब आबा माने, दक्षिणः रस्ता | | | | | |
| २ | १००४४०१४० | मालमत्तेवर कर्ज | १. समाधान नामदेव पाटील<br>२. माधुरी समाधान पाटील | २८/१२/२०२४ | रु.५,०३,२२६.५१/- |
| मालमत्तेचा पत्ताःउंबरे (वि) ग्रामपंचायत मिलकट क्रमांक ५१ चा तो सर्व तुकडा आणि पार्सल, क्षेत्रफळ ८६० चौ. फूट.(७९.९२ चौ. मी.), उंबरे (पाच) येथे स्थित, उंबरे (पाच) ग्रामपंचायतीच्या स्थानिक हद्दीत, ता.- माळशिरस, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३११२, आणि सीमा अशी आहेः पूर्वः रस्ता, पश्चिमः राजाराम साधू शेळके, उत्तरः गोपाळ शंकर कुलकर्णी, दक्षिणः श्री. ज्ञानोबा गायकवाड यांचे ग्रामपंचायत मिलकट क्रमांक ५२ | | | | | |
| ३ | ९२८५२२२३ | मालमत्तेवर कर्ज | १. सोमनाथ भिवाजी शिंदे<br>२. भिवा किसन शिंदे | २७/११/२०२४ | रु.६,१३,७८२.४८/- |
| मालमत्तेचा पत्ताः कोंडबावी ग्रामपंचायत मिलकट क्रमांक ३००, २००० चौ. फूट. क्षेत्रफळाचा तो सर्व तुकडा आणि पार्सल, कोंडबावी येथे स्थित, कोंडबावी ग्रामपंचायतीच्या स्थानिक हद्दीत, ता.: माळशिरस, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३ १०१, आणि सीमा पूर्वेकडीलः भिवाजी किसन शिंदे, पश्चिमेकडील अंतर्गत रस्ता, उत्तरः श्री. आबा किसन शिंदे, दक्षिणेकडीलः श्री. हरिदास शिंदे | | | | | |
| ४ | १०९३१०४७७ | मालमत्तेवर कर्ज | १. स्वप्निल अभिमान पोल<br>२. अभिमान पांडुरंग पोल | १४/११/२०२४ | रु.७,३४,०२८.६५/- |
| मालमत्तेचा पत्ताः मिलकट क्रमांक २७८ चे सर्व तुकडा आणि पार्सल, दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे क्षेत्रफळ तळमजला आहे = ८०३.०० चौ. फूट, एकूण बांधलेले क्षेत्रफळ = ८०३.०० चौ. फूट., चिंचोली भोसे गावात स्थित ता. पंढरपूर, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि अशी सीमाः- पूर्वः रस्ता, पश्चिमः रस्ता, उत्तरः रस्ता, दक्षिणः नवगिरे यांचे घर | | | | | |
| ५ | १४०९५५६०६ | मालमत्तेवर कर्ज | १. विकास बाळासाहेब कराळे<br>२. प्रतीक्षा विकास कराळे | २८/१२/२०२४ | रु.९,०७,८४७.९१/- |
| मालमत्तेचा पत्ताः दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेल्या निवासी घराचा तो सर्व तुकडा आणि पार्सल ज्याचे क्षेत्रफळ १११०.०० चौ. फूट आहे. एकूण बांधलेले क्षेत्रफळ १११०.०० चौ. फूट आहे. एकूण जमीन १५३० चौ. फूट आहे., सारकोली गावात स्थित, ता. पंढरपूर, जिल्हा. सोलापूर आणि नोंदणीकृत मिल्कट क्र. २७५, ग्रा.पं.ची हद्द सरकोली, ता.पंढरपूर, जि. सोलापूर, महाराष्ट्र- ४१३३०४, आणि सीमाः पूर्वः बाबुराव नारायण कराळे, पश्चिमः आनंद कृष्ण कराळे, उत्तरः बाळासाहेब नारायण कराळे, दक्षिणः रस्ता | | | | | |

वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार, या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, त्यांच्या संबंधित तारखांपासून करारबद्ध व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादी रकमा आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेड) ला देण्याचे आवाहन करण्यात येत आहे. अन्यथा, SRFESI कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडसह विलीन आणि सध्याची आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाणखत मालमत्तेविरुद्ध कार्यवाही सुरू करण्यास अधीन राहावे लागेल. शिवाय तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांकः १४/०२/२०२५
स्थळः सोलापूर, महाराष्ट्र

**नियुक्त/-**
**अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

## PRECISION CAMSHAFTS LIMITED

Regd. Office : D5, M.I.D.C. Chincholi, Solapur, MH, 413255
CIN: L24231PN1992PLC067126

### Extract of unaudited Consolidated Financial Results for the Quarter and Nine Months ended December 31, 2024 [(Regulation 47(1)(b) of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015]

(Rs. in lakhs),except Earnings Per Share)

| Sr. No. | Particulars | Consolidated | | |
|---|---|---|---|---|
| | | Quarter ended Dec. 31, 2024 (Unaudited) | Nine Month ended Dec. 31, 2024 (Unaudited) | Quarter ended Dec. 31, 2023 (Unaudited) |
| 1. | **Revenue From Operations** | **19,454.75** | **67,493.46** | **25,771.38** |
| 2. | Profit Before Exceptional Item & Tax | (574.82) | 2,884.52 | 1,774.39 |
| 3. | Profit Before Tax | (451.61) | 3,007.73 | 3,603.58 |
| 4. | Profit for the Period / Year | (635.92) | 1,366.21 | 2,446.47 |
| 5. | Total Comprehensive Income (after tax) for the period | (420.07) | 1,456.60 | 2,389.63 |
| 6. | Paid up Equity Share Capital (Equity Share of 10/- each) | 9,498.58 | 9,498.58 | 9,498.58 |
| 7. | Earnings per share (of Rs.10/- each) | - | - | - |
| | Basic : | (0.67) | 1.44 | 2.58 |
| | Diluted : | (0.67) | 1.44 | 2.58 |

**Notes:**

1. The above financial results for the quarter and nine months ended December 31, 2024 have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Holding Company at their respective meetings held on February 12, 2025 which has been subjected to limited review by the statutory auditors of the Group.
2. The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the Securities and Exchange Board of India ('SEBI') (Listing Obligations and Disclosure Requirements ('LODR')) Regulations, 2015. The full format of the unaudited Standalone & Consolidated Financial Results of the Company are available on the Stock Exchange's website **(www.bseindia.com and www.nseindia.com)** and also on the Company's website - **www.pclindia.in**.
3. These Financial Results have been prepared in accordance with Indian Accounting Standards ("Ind AS") prescribed under Section 133 of the Companies Act, 2013 read with relevant rules issued there under and in terms of Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 read with SEBI circular no. CIR/CFD/FAC/62/2016 dated 5th July, 2016.
4. Key Standalone Financial information

(Rs. in Lakhs)

| Sr. No. | Particulars | Standalone | | |
|---|---|---|---|---|
| | | Quarter ended Dec. 31, 2024 (Unaudited) | Nine Months ended Dec. 31, 2024 (Unaudited) | Quarter ended Dec. 31, 2023 (Unaudited) |
| 1 . | **Revenue From Operations** | **14,307.56** | **47,482.94** | **16,096.21** |
| | Profit Before Exceptional Item and Tax | 595.74 | 5,704.32 | 3,157.32 |
| | Profit Before Tax | 718.95 | 5,827.53 | 3,157.32 |
| | Profit for the period/Year | 535.82 | 4,172.47 | 2,359.83 |
| 2. | Total Comprehensive Income (after tax) for the period | 542.52 | 4,193.18 | 2,362.14 |

**Place : Solapur**
**Date : February 12, 2025**

**For and on behalf of the Board of Directors**
**Sd/-**
**Ravindra R. Joshi**
**Whole-time Director & CFO**



सोलापूर : 'व्हेलेंटाईन डे'ची फुलांच्या दुकानात तयारी झाली असून विविध प्रकाराचे कलरफुल गुलाब पुष्प दाखल झाले आहेत. (छायाचित्र : केवल तिवारी)

# समांतर जलवाहिनी प्रकल्पातील सर्व सहा पंपांची चाचणी यशस्वी

## ▶▶ प्रकल्प लवकरच पूर्ण होण्याच्या मार्गावर; ११० पैकी १०७ किलोमीटरचे पाईपलाईनचे काम पूर्ण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी -**

शहराचा पाणीपुरवठा सुधारण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या समांतर जलवाहिनी प्रकल्पाला वेग आला असून, या प्रकल्पातील पंपगृहातील सर्व सहा पंपांची पाणी उपशाची चाचणी यशस्वी झाली आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या प्रमुख उपस्थितीत पंप चाचणी घेण्यात आली. ही चाचणी यशस्वी झाल्याची माहिती स्मार्ट सिटीचे मुख्य तांत्रिक अधिकारी व्यंकटेश चौबे यांनी दिली.



उजनी धरणावर उभारलेल्या नवीन पंपगृहात ११५० अश्वशक्ती क्षमतेचे सहा पंप बसविण्याचे काम नुकतेच पूर्ण झाले. झालेल्या चाचणीदरम्यान सर्व पंप यशस्वीरीत्या कार्यान्वित झाल्याचे स्पष्ट झाले. यावेळी स्मार्ट सिटी कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोपीचंद कदम, सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे , जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता प्रवीण पाटील, मक्तेदार कंपनीचे प्रकल्प अधिकारी अरुण पाटील, स्मार्ट सिटीचे सहायक अभियंता उमर बागवान यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

सोलापूर शहराला सुरळीत पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने महत्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या उजनी समांतर जलवाहिनी प्रकल्पात एकूण ११० किलोमीटरपैकी १०७ किलोमीटर पाइपलाइनचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित केवळ तीन किलोमीटरचे काम मार्चअखेर पूर्ण करण्याचे नियोजन मनपा आयुक्त शीतल तेली- उगले यांनी केले आहे. या प्रकल्पामुळे शहराला १७० एमएलडी क्षमतेचा पाणीपुरवठा शक्य होणार आहे.

उर्वरित तीन किलोमीटर पाइपलाइनसाठी जिल्हा प्रशासन, महापालिका, ग्रामीण पोलिस दल, आणि स्मार्ट सिटीचे अधिकारी समन्वय साधून काम करत आहेत. या प्रकल्पामुळे सोलापूरकरांना अधिक नियमित आणि मुबलक पाणीपुरवठा मिळण्याची शाश्वती निर्माण झाली आहे.

### हायड्रॉलिक चाचणी पूर्ण

समांतर जलवाहिनीच्या टेंभुर्णी बाह्यवळण रस्त्याजवळील १८०० मीटर पैकी ८०० मीटर पाइपलाइनचे काम पूर्ण झाले आहे. सद्यस्थितीत ११० किलोमीटरपैकी १०७ किलोमीटर पाइपलाइन टाकण्याचे काम तसेच ८४ किलोमीटरची हायड्रॉलिक चाचणी पूर्ण झाली आहे.

### मनपा आयुक्त शीतल तेली- उगले यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न

मनपा आयुक्त शीतल तेली-उगले यांनी या प्रकल्पावर विशेष लक्ष ठेवून आहेत. मक्तेदारास कार्यारंभ आदेश दिल्यापासून त्या दर शुक्रवारी समन्वय बैठक घेऊन कामाची प्रगती आणि अडथळ्यांचा आढावा घेत आहेत. त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच कामाला वेग प्राप्त होऊन, हा प्रकल्प लवकरच पूर्ण होण्याच्या मार्गांवर आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त



### शिवतेज प्रतिष्ठान जुळे सोलापूर अध्यक्षपदी हर्षवर्धन जाधव

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच्या २०२५ या वर्षीच्या अध्यक्षपदी हर्षवर्दन जाधव यांची एकमताने निवड करण्याती आली. यावेळी महेश घाडगे यांच्या हस्ते पदाधिकाऱ्यांसह सत्कार करण्यात आला. **अन्य पदाधिकारी याप्रमाणे :** उपाध्यक्ष-शुभम कांबळे, खजिनदार - मंगेश सुरवसे, सचिव- विजय कोंजारी, सहसचिव, नागेश सोनकांबळे, कार्याध्यक्ष- वेदांत भावार्थी. संस्थापक- शुभम शिरसागर, ओंकार नलावडे, मार्गदर्शक : महेश घाडगे, सिताराम शिखरे, अनिल लंकेश्वर, रतिकांत कांबळे, रवि माशाळ, प्रभाकर राऊत, संतोष इरकशेट्टी, धनराज शिंदे, बालाजी वानकर, संदिप नरोटे, ओंकार टोणपे, शिवा वाघमारे.



### पद्मशाली युवक संघटनेच्यावतीने श्रीनिवास संगा यांचा सन्मान

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

येथील पद्मशाली युवक संघटनेच्या वतीने राजमल बोमड्याल मंगल कार्यालयात अखिल भारत पद्मशाली युवजन संघमच्या अध्यक्षपदी श्रीनिवास संगा यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य पद्मशाली संघमचे प्रधानसचिव यशवंत इंदापुरे, पद्मशाली शिक्षण संस्थेचे विश्वस्त व्यंकटेश आकेन, सेवानिवृत्त संघाचे उपाध्यक्ष अनिल कन्ना, पद्मशाली युवक संघटनेचे अध्यक्ष शेखर कटकम अध्यक्ष नागेश बोमड्याल,सचिव विजय निली आदीच्या उपस्थिती होती. या कार्यक्रमास युवक संघटनेचे माजी अध्यक्ष साईराम बिर्रू,गिरीश कोटा, राकेश पुंजाल,रविंद्र गड्डम,तुषार जक्का,सुधाकर नराल,रोहन श्रीराम, श्रीनिवास यन्नम, अमर बोडा, कपिल आकेन आदी आजी माजी पदाधिकारी तसेच युवक युवती उपस्थित होते. युवक संघटनेचे उपाध्यक्ष अंबादास कुडक्याल, गोविंद राजूल,ॲड श्याम आडम सहसचिव अविनाश शंकू आदींनी कार्यक्रम यशस्वी होणेसाठी परिश्रम घेतले. सुत्रसंचलन व्यंकटेश आकेन मानले.




### भीमशक्ती संघटनेचे जोडेमारो आंदोलन

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी आक्षेपार्ह विधान करून या थोर राष्ट्रीय महापुरुषांचा अपमान केल्याच्या निषेधार्थ भीम शक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने राहुल सोलापूरकर यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन करण्यात आले. खा. चंद्रकांत हंडोरे यांच्या आदेशानुसार सोलापुरात पुनम गेट येथे आंदोलन करण्यात आले. यावेळी सुबोध वाघमोडे, राजा कदम, उमेश सुरते , मेजर सुखदेव साबळे, सलीम मुल्ला, इब्राहिम शेख, समिर मुजावर, सुरेश जाधव, प्रकाश बनसोडे, हरदीप बनसोडे, विश्वद्र मोरे , पंडित गायकवाड, विक्रम वाघमारे, मर्थ रावडे, प्रा ज्योती गायकवाड, मुमताज तांबोळी, इस्तर शिंदे, ज्युली डिसोजा, भारत शिरसगर, अलिशा साने, कमाल शिंदे आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

### मनपाच्यावतीने संत रोहिदासांना अभिवादन

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने संत रोहिदास यांच्या जयंती दिनानिमित्त कौन्सिल हॉल येथील कार्यालयामध्ये संत रोहिदास यांच्या प्रतिमेस विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अशोक लांबतुरे, संजय शिंदे, मधुकर गवळी, ॲड. प्रशांत कांबळे, अविनाश चाबुकस्वार, आप्पासो संनके,तुकाराम चाबुकस्वार, इस्माईल हूलसुरे,संतोष कबाडे, भाग्यश्री शिंदे,आशा सातपुते,डॉ. महादेव रायबान, कल्लाप्पा हुनकाय, अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते






# सोलापुरात भाजपाकडून दीड लाख सदस्य नोंदणी

## ● भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

भारतीय जनता पार्टी हे जगातील सर्वात मोठ्ठे राजकीय संघटन असून, संपूर्ण देशभर भाजपाचे सदस्यता नोंदणी अभियान चालू आहे. आत्तापर्यंत संपूर्ण देशात १० कोटीपर्यंत सदस्य जोडले गेले आहेत. तर सोलापूर शहरातील सदस्यता नोंदणी अभियान मोहिमेत येथील भाजपा आमदार, माजी नगरसेवक आणि भाजपा पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी एकत्रित येवून आजतागायत दीड लाख सदस्यता नोंदणी केल्याची माहिती भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी दै. तरूण भारतशी बोलताना दिली.

भाजपातील हायटेक नेत्यांनी शहरातील प्रत्येक बुथवर २०० सदस्य नोंदणी करायचे उद्दिष्ट कार्यकर्त्यांसमोर ठेवले. तसेच १० जानेवारी रोजी घर चलो अभियान राबविण्यात आले होते. इतकेच नाहीतर शहरातील आमदार खासदार सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, आ. देवेंद्र कोठे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी गेल्या काही दिवसांपासून परिश्रम घेवून दीड लाखाच्यावर सदस्यता नोंदणी केली आहे. तर १९ तारखेपर्यंत सदस्यता नोंदणी करता येणार असून, १ लाख ९१ हजाराचे दिलेले टार्गेट आम्ही लिलया पार करू अशीही ग्वाही शहराध्यक्ष काळे यांनी दिली. ८८००००२०२४ ह्या क्रमांकावर एक फोन करून सदस्य करून घेत असल्याचेही काळे यांनी सांगितले.

# शेळगी, तुळजापूर नाका पूल परिसराची केली स्वच्छता

## ▶ सहायक आयुक्त मनिषा मगर लहान मुलासोबत कर्तव्यावर हजर
## ▶ महापालिकेच्या वतीने आठ झोनमध्ये विशेष स्वच्छता मोहीम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

महापालिकेच्या वतीने विशेष स्वच्छता मोहीम २.० नेटक्या पद्धतीने नियोजनपूर्वक राबविण्यात येत आहे. शेळगी पुल , तुळजापूर नाका पूल, सिंधू विहार कॉलनी यासह आठ झोन अंतर्गत विविध अंतर्गत रस्त्यांची साफसफाई करण्यात आली.

विशेष म्हणजे, आज सहायक आयुक्त मनिषा मगर या आपल्या लहान मुलासोबत कर्तव्यावर हजर होत्या. महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या नियंत्रणाखाली १० ते २२ फेब्रुवारी दरम्यान सकाळी ६.३० ते ११ वाजेपर्यंत सोलापूर महापालिका प्रशासनाने शहरातील अंतर्गत रस्ते साफसफाई करण्यासाठी विशेष स्वच्छता मोहीम २.० राबविण्यात येत आहे.

मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, अनिल चराटे माध्यमातून आरोग्य निरीक्षक आणि कर्मचारी पथकांकडून नियोजनपूर्वक स्वच्छतेची कामे करण्यात येत आहेत.

दरम्यान, अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी विविध ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली. कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देऊन नेटक्या पद्धतीने स्वच्छता करून घेतली. आज या मोहिमे अंतर्गत शेळगी पूल, तुळजापूर नाका मलाच्या दुतर्फा स्वच्छता करण्यात आली. मातीचे ढिगारे काढण्यात आले.सिंधू विहार कॉलनी परिसर यासह विविध रस्त्यांची साफसफाई करण्यात आली. त्या त्या रस्त्यावरील मुता-या स्वच्छ करणे, डिव्हायडर, रस्त्याच्या कडेची सर्व अनावश्यक साहित्य, कचरा, प्लास्टिक उचलणे, रस्त्याच्या कडेची झाडांची छाटणी करणे, फुटपाथही पाण्याने स्वच्छ धुऊन घेणे आदी स्वच्छतेची कामे करण्यात आली.

### बुधवार व गुरुवारी हा परिसर केला स्वच्छ (विभागीय कार्यालय)

▶ एक : सोनाहिरा चौक (कस्तुरबा मार्केट कॉर्नर) ते बलिदान चौक, रेल्वे स्टेशन, भाजी मार्केट परिसर,

▶ दोन : केकडे नगर चौक ते राज मेमोरियल स्कूल, शेळगी पूल ते तुळजापूर नाका पूल,

▶ तीन : गणेश पेठ, विणकर बाग, साखर पेठ सोमपा वाहनतळ, २५६ गाळा, शांतीनगर झोपडपट्टी, गांधी नगर.

▶ चार : नागोबा मंदिर परिसर, लतिका नगर पूर्ण परिसर, प्रियदर्शिनीनगर संपूर्ण परिसर,

▶ पाच : साईसृष्टीनगर,शिवलोचना हुतीन, नागुनारायणवाडी चौक, सिंधू विहार कॉलनी संपूर्ण परिसर.

▶ सहा : आदित्यनगर, विजापूर नाका ते कंपली चौक.

▶ सात : जेल रोड, जमखंडी पूल , पेंटर चौक ते भारतीय चौक, आरिफ दुध डेअरी, कालिका मंदिर जांबवीर सोसाय, मातंग वस्ती परिसर

▶ आठ : चकोले बोळ, सरगम हॉटेल, साई बाबा मंदिर, दत्त नगर, कुचननगर बापूजी नगर, ओमराज कट्टा, आडम मास्तर घर, महिला आश्रम मैदान, विद्या नगर भाग.

# अपघात समयी मदत करणाऱ्यांचा मृत्यूंजय दूत पुरस्कार देऊन होणार सन्मान

## ● वैभव भोई व विनोद भोसले यांचा पोलिस अधिक्षकांच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी -**

अपघात समयी मदत करणाऱ्यांना मृत्यूंजय दूत पुरस्कार देऊन गौरव करण्याचा उपक्रम पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी सुरु केला असून गुरुवारी पोलिस अधिक्षकांच्या हस्ते वैभव भोई व विनोद भोसले या दोघांना हा पुरस्कार देण्यात आला.

मागील काही वर्षामध्ये शासनाकडून दळववळण सुलभ होण्यासाठी चांगल्या प्रकारचे रस्ते बांधणी सुरू आहे. यामुळे वाहनांना चांगल्या प्रकारचे रस्ते व सुविधा मिळत असल्याने प्रवासांचा वेळ कमी झाला आहे. तसेच रस्त्यावर अपघात देखील होत आहेत. रस्ते अपघातामध्ये अपघात मिळाल्यानंतर जखमींना वेळीच मदत मिळाल्यास तसेच वैद्यकीय उपचार मिळाल्यास त्यांचा प्राण वाचू शकतात. अपघातामध्ये वेळीच व तात्काळ मदत करणाऱ्या व्यक्तींचे कौतूक करण्यासाठी पोलिस अधिक्षक कुलकर्णी यांनी मृत्यूंजय दूत हा पुरस्कार सुरू केला आहे. त्यामध्ये महिनाभरामध्ये जिल्ह्यातील अपघातामध्ये मदत करणारे नागरिकांचा प्रशंसापत्र देवून गौरव करण्यात येत आहे.

१३ फेब्रुवारी रोजी पोलिस मुख्यालयातील संवाद हॉलमध्ये आयोजित क्राईम बैठकीत बोलावून वैभव भोई व विनोद भोसले यांना प्रशंसापत्र व पुष्पगुच्छ देवून सन्मानीत करण्यात आले. अपघातामध्ये मदत करणारे लोकांना पोलीस तपासाचा कोणताही त्रास होणार नाही याची हमी पोलीस अधीक्षकांनी यावेळी दिली.



### रुग्णवाहिका बोलावून जखमीस रुग्णालयात पाठविणारा विनोद भोसले

३ फेब्रुवारी २०२५ रोजी विनोद भास्कर भोसले (रा. लवंग, ता. माळशिरस) हे त्यांच्या मोटार सायकलवरून टेंभूर्णीहून अकलूजकडे जात असताना जांभूळबेट पाटीजवळ एका इसमास अज्ञात वाहनाने धडक देवून गंभीर जखमी केले होते. तो इसम जखमी अवस्थेत विव्हळत पडला होता. तेथे बऱ्याच बघ्यांची गर्दी जमली होती. परंतू कोणीही मदतीला धावले नाही. विनोद भोसले यांनी तेथील परिस्थीती पाहून ॲब्युलन्सचा टोल फ्री क्रमांक १०८ वर फोन करून ॲब्युलन्स घटनास्थळावर बोलावून जखमीस उचारासाठी रुग्णालयात पाठवून दिले. तसेच त्याबाबतची माहिती पोलीसांना देखील दिली. त्यांच्या या कार्यास देखील मृत्यूंजय दूत पुरस्कार देण्यात आला.

### कोळेगावजवळील अपघातात मदत करणारा वैभव भोई

९ फेब्रुवारी २०२५ रोजी मोहोळ पोलीस ठाणेच्या हद्दीतून जाणाऱ्या कोळेगावजवळ सोलापूरहून पुण्याकडे जाणारे खाजगी प्रवाशी बसचा अपघात झाला होता. अपघातामध्ये बस पलटी होवून बसममध्ये असलेल्या प्रवाशांपैकी १५ प्रवाशी जखमी झाले होते. अपघातानंतर थे हजर असणारा वैभव दत्तात्रय भोई (रा. वडापूर, ता. दक्षीण सोलापूर) यांनी आपल्या पायात चप्पल नसताना देखील आपल्या जिवाची परवा न करता पायाने लाथा मारून बसच्या काचा फोडून बसमध्ये अडकलेल्या जखमी व इतर नागरिकांना रस्त्यावरून येणारे जाणारे वाहनांना विनंती करून उपचारासाठी रुग्णालयात पाठविले होते. त्याच्या प्रशंसनिय व अतुलनिय कामासाठी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून दखल घेऊन मृत्यूंजय दूत पुरस्कार देण्यात आला.



# नियम पाळा... कारवाई टाळा

## शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी -**

शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने १९ तारखेला निघणाऱ्या विविध मंडळाच्या मिरवणूक संदर्भात पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्याशी शहर पोलीस आयुक्तालय येथे बैठक पार पडली.

यावेळी श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या ट्रस्टचे अध्यक्ष पद्माकर काळे, दिलीप कोल्हे, उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे, भाजपाचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, संजय शिंदे, सुनील रसाळे, बसवराज येरटे, सचिन स्वामी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.


श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्यावतीने निघणाऱ्या मिरवणूक परवानगीसाठी येणाऱ्या अडचणी संदर्भात यावेळी पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्याशी चर्चा करण्यात आली. येणाऱ्या दोन ते तीन दिवसात मंडळांना १९ फेब्रुवारीच्या मिरवणुकीसाठी परवानगी मिळेल, असे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले.

त्यामुळे सर्व मंडळांनी मिरवणूक परवानगी संदर्भात कोणतीही काळजी करून नये सर्व मंडळांना मिरवणुकीसाठी परवानगी मिळणार असून सर्व मंडळांनी उत्साही वातावरणात नियमांचे पालन करून छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करावी, असे आवाहन शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पेपर अवघड गेल्याने विद्यार्थीनीचा आत्महत्येचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी -**

पेपर अवघड गेल्याने विद्याथीनीने विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. धनश्री संतोष आहेर (वय १९, रा. कल्याण नगर, जुळे सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थीनीचे नाव असून तिच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. १२ फेब्रुवारी रेजी सायंकाळी सातच्या सुमारास राहत्या घरी १२ वी चा पेपर अवघड गेल्याच्या कारणावरून धनश्रीने विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे तिला त्रास होऊ लागल्याने उपचरासाठी पती सुधाकर तवर यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सोलापुरात उद्या अतुल बेले यांचे गझल गायन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रवारी-**

बज्मे-गालिब सोलापूरच्या वतीने गालिब डे च्या निमित्ताने मिर्झा गालिबचा गजल कार्यक्रम शनिवारी १५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता होणार आहे. नवा-ए- गालिब गजल गायक अतुल बेले गजल गायन रचना करणार आहेत. हा कार्यक्रम बज्मे गालिब मुस्लीम पाच्छा पेठ, इक्बाल फॅशन जवळ होईल. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन बज्मे गालिबचे इरफान कारीगर यांनी केले आहे.





## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### पोलिस अधीक्षकांच्या बंगल्यातील जॅक श्वानाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी -**

सोलापूर ग्रामीण पोलिस दलातील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या घरातील कौटुंबिक सदस्याप्रमाणे जीवन जगत असलेल्या जॅक या श्वानाचे गुरूवारी अचानक निधन झाले. त्याच्या निधनाबद्दल पोलिस अधिकाऱ्यांनी शोक व्यक्त केला आहे.जॅक हा अतिशय प्रामाणिक अन् चाणाक्ष श्वान होता. जॅक च्या कार्याची पोलिस दलात वेगळीच चर्चा असायची. आजवरच्या सर्वच पोलीस अधिक्षकांच्या जॅक हा कौटुंबिक सदस्य बनला होता. जॅक ची विशेष काळजी पोलिस अधिकारी घेत होते. दरम्यान, तत्कालीन पोलीस उपायुक्त वैशाली कडूकर - पाटील यांच्या निवासस्थानामध्ये लहानसे पिल्लू असताना तो तेथे वाढला. त्यानंतर कडूकर यांच्या शेजारीच असलेल्या पोलीस अधीक्षक बंगल्यामध्ये तत्कालीन पोलीस अधीक्षक तेजस्विनी सातपुते यांच्याकडे देण्यात आले, तेव्हापासून पोलिस अधीक्षकांच्या बंगल्यामध्ये ते वास्तव्यात होतं. दरम्यान, तत्कालीन पोलिस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी त्या जॅक ला आपल्यातला एक कौटुंबिक सदस्य म्हणून पाहिले व त्याची फार काळजी, खूप देखभाल केली. जॅक च्या निधनाबद्दल पोलिस अधीक्षक बंगल्यातील सर्व कर्मचाऱ्यांनी त्यास श्रध्दांजली वाहिली. त्यानंतर पोलिस मुख्यालय येथे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थित त्याच्यावर धार्मिक विधीनुसारअंत्यसंस्कार करण्यात आले.






### विद्यापीठात विकसित भारत-२०४७ विषयावर राष्ट्रीय परिषद

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

भारताच्या स्वातंत्र्याला २०४७ मध्ये शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. येणाऱ्या कालखंडात भारताने चिरंतन विकासासाठी कोणती ध्येय, धोरणे राबवली पाहिजेत. यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे विकसित भारत २०४७ : शाश्वत विकासाचा मार्ग या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे यांनी दिली. पीएम उषा अंतर्गत कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली १४ आणि १५ फेब्रुवारी रोजी ही राष्ट्रीय परिषद होणार आहे. या परिषदेचे उद्घाटन उद्या शुक्रवारी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन हैद्राबाद विद्यापीठातील अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक डॉ. फनिद्रा गोयारी या उपस्थित रहाणार आहेत. या राष्ट्रीय परिषदेसाठी ७५ संशोधन पेपरचे वाचन आणि सादरीकरण होणार आहे. या परिषदेसाठी महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यातुन ११५ संशोधक, प्राध्यापक सहभागी होणार आहेत, असेही डॉ. गौतम कांबळे यांनी सांगीतले. या परिषदेसाठी विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक आणि नागरिकांनी मोठ्या संखेने सहभागी व्हावे, असे आवाहन पुरातत्वशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले आहे.

### इंडिया एनर्जी वीक २०२५ मध्ये सादर केले तंत्रज्ञान

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी -**

ऊर्जा स्वावलंबन आणि २०७० पर्यंत नेट झिरो म्हणजेच शून्य कार्बन उत्सर्जन साध्य करण्याच्या भारताच्या दृष्टिकोनाशी आपली वचनबद्धता दृढ करत, टोयोटा किर्लोस्कर मोटर (टिकेएम) ने आज इंडिया एनर्जी वीक २०२५ मध्ये भाग घेतला.इंडिया एनर्जी वीक (आयईडब्ल्यू) २०२५ हे स्वच्छ ऊर्जा उपाय सादर करण्यासाठी आणि ऊर्जा स्वावलंबन तसेच कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या दिशेने महत्त्वाचे व्यासपीठ आहे. ऊर्जा परिस्थिती, तंत्रज्ञान, उद्योगातील ट्रेंड आणि धोरणात्मक दृष्टीकोनांवर चर्चा व्हावी म्हणून हा कार्यक्रम जागतिक राजकीय नेते, धोरणकर्ते, तज्ज्ञ आणि अंतिम उपभोक्त्यांना एकत्र आणते. गव्हर्नन्स विभागाचे कार्यकारी उपाध्यक्ष विक्रम गुलाटी यांनी कार्यक्रमादरम्यान सांगितले की ''इंडिया एनर्जी वीक हे ऊर्जा, गतिशीलता आणि तंत्रज्ञानआधारित कंपन्यांना एकत्र आणण्याचे महत्त्वाचे व्यासपीठ आहे.





# भारदस्त सिंहासनाधीश्वर शिवमूर्ती ठरताहेत लक्षवेधी!

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीवर मूर्तिकारांनी फिरवला शेवटचा हात!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ फेब्रुवारी-**

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती अवघ्या पाच दिवसात येऊन ठेपली आहे. शिवजयंतीच्या अनुषंगाने शहरात मूर्तिकार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आकर्षक मूर्तीवर शेवटचा हात फिरवण्यात व्यस्त असल्याचे चित्र दिसत आहे.

सोलापूर शहर हे नेहमीच उत्सव प्रिय शहर म्हणून ओळखले जाते. प्रत्येक थोर महापुरुषांची जयंती एखाद्या उत्सवाप्रमाणे साजरी केली जाते. १९ फेब्रुवारी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्सवाच्या औचित्य साधून अनेक मंडळांच्या वतीने भव्यदिव्य अशा मिरवणुका काढल्या जाणार आहेत. त्यापूर्वी शहरातील विविध सार्वजनिक शिवजन्मोतस्व मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंहासनाधीश्वर मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना केली जात आहे. प्राणप्रतिष्ठापना करण्यासाठी मूर्तिकार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीवर शेवटचा हात फिरवत आहेत. खड्डा तालीमच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या २१ मूर्तीचे वाटप यंदाच्या वर्षी केले जाणार आहे. त्याची तयारी देखील अंतिम टप्प्यात आली आहे.

### सिंहासनाधीश्वर मूर्तींचे वितरण

शिवजयंती निमित्त दरवर्षी नवीन मूर्तींची निर्मिती तसेच जुन्या मूर्तीचे कलर काम केले जाते. यंदाच्या वर्षी देखील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नवीन २१ मूर्तींची निर्मिती केली असून, काम अंतिम टप्प्यात आहे. सदरच्या मूर्ती बनवण्यासाठी २५० पोती पी.ओ.पी, कात्या, लाकूड, काळारंग २० लीटर, थिनर १० लीटर, ब्राँझ पावडर १० डब्बे अशाप्रकारे साहित्य लागले आहे. यासाठी विजय कोंतम, देविदास साळुंखे, गणेश गड्डम, इरेश सरला, कृष्णा कळसकर, शिवमुर्ती बनवण्यासाठी कारागीर आणि मूर्तिकरांना एक महिन्याचा कालावधी लागला आहे. सोलापूर शहर व जिल्ह्यासह तेलंगाणा, हैद्राबाद, शिवछत्रपतींच्या मूर्तीची मागणी वाढत आहे.

**- नरेश बोलू, मूर्तिकार**



## यंदा शिवजयंतीला महिलांची बाईक रॅली

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी -**

सोलापुरातील शिवजयंती सोहळ्यातील पाळणा सोहळ्याने सोलापुरी शिवजयंतीला देशभरात नेले. अशातच आता यंदाच्या शिवजयंतीपासून रणरागिर्गीची पारंपारिक वेशभूषेत हटके बाईक रॅली निघणार आहे. शिवजयंतीचे खास आकर्षण ठरलेल्या पाळणा सोहळ्याला यंदा ५० हजार रणरागिणींची उपस्थिती लाभणार आहे.

शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्यावतीने पाळणा कार्यक्रम संदर्भात डाळींबी आड शिंदे चौक येथे बैठक पार पडली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयघोष करून बैठकीस सुरुवात करण्यात आली. यावेळी अनेक महिलांनी वेगवेगळ्वासूचना मांडल्या. तर शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे उत्सव अध्यक्ष यांनी महिलांची बाईक रॅली संदर्भात सूचना मांडली, वावेळी सर्वांनी एकमताने सूचना मंजूर केली. त्यानुसार शिवजयंती दिनी पारंपारिक वेशभूषित बाईक रॅली काढली जाणार असून पाळणा कार्यक्रमास सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील साधारण ५० हजार रणरागिणींची उपस्थिती लाभणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच पाळणा कार्यक्रम हा अतिशय मोठया प्रमाणात होणार असून सर्व महिलांनी या पाळणा कार्यक्रमास सहकुटुंब सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

१६ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजता पहिल्यांदाच महिलांची पारंपरिक वेशभूशेत बाईक रॅली निघणार आहे, उत्कृष्ट पारंपरिक वेशभूषा करणाऱ्या महिलांना रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. यावेळी जनजगृती फलक महिलांच्या हातात असणार असून, जास्तीत जास्त महिलांनी या बाईक रॅली मध्ये पारंपरिक वेशभूषेत सहभागी व्हावे, असे आवाहन शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाकडून करण्यात आले आहे.

यावेळी उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे, पुरुषोत्तम बरडे, लता ढेरे, सुनंदा साळुंखे, लता फुटाणे, मनीषा नलावडे, विजया काकडे, प्राजक्ता बागल, निर्मला शेळवने, सुनीता गरड, माधुरी चव्हाण, स्मिता पुले, दीपाली भोसले, उज्वला साळुंखे, यशोदा डेंगळे, जयश्री पवार, मोहिनी चटके, उत्तरा बचुटे, अर्चना बरडे, सुवर्णा यादव, प्रतीक्षा चव्हाण, जया रणदिवे, ऐश्वर्या गायकवाड, मंदाकिनी तोडकरी, प्रगती डोंगरे, शुभांगी चराटे, वैष्णवी सुरवसे, मनीषा माने, सारिका फुटाणे वांच्यासह महिला, तसेच शिवप्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते.

### तेलंगी पाच्छा पेठेत धाडसी चोरी

## दिवसा दोन लाख ३८ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी -**

शहरातील तेलंगी पाच्छा पेठेतील शाब्दी अपार्टमेंट या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील घरात दिवसा चोरी करून चोरट्याने सुमारे दोन लाख ३८ हजारांचा ऐवज चोरून नेला. हा प्रकार ११ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी साडेचार दरम्यान घडला.

याबाबत फराह रशीद शेख (वय ५१, रा. शाब्दी अपार्टमेंट तेलंगी पाच्छा पेठ सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेच्या दिवशी म्हणजेच ११ फेब्रुवारी रोजी सकाळी ११वाजता कामानिमित्त घर बंद करून बाहेर गेल्या होत्या. त्या दुपारी साडेचार च्या दरम्यान घरी परतल्या. त्यावेळी त्यांना घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत दिसून आले. त्यांनी घरात जाऊन पाहणी केली असता, बेडरूम मधील असलेल्या कपाटातील नेकलेस, बोरमाळ, कर्णफुले, अंगठ्या तसेच रोख रक्कम असा सुमारे दोन लाख ३८ हजाराचा ऐवज नसल्याचे दिसून आले. त्यांनी घरात इतरत्र ऐवज शोधला. परंतु ऐवज मिळून आला नाही. यामुळे चोरट्याने घरात चोरी केल्याची त्यांची खात्री झाली. याबाबत त्यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे. सहायक पोलिस निरीक्षक सोनवणे तपास करत आहेत.

# नेहरूनगर शासकीय मैदानावरील अखेर ओपन जीम झाले दुरुस्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

जिल्हा क्रीडा कार्यालयाने नेहरूनगर शासकीय मैदानावरील ओपन जीम अखेर दुरूस्त केले. या मैदानावरील ओपन जीम दुरूस्त करण्याची मागणी मैदानावरील न्यू जॉगर्स फाउंडेशनने निवेदनाद्वारे जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांच्याकडे केली होती. परंतु त्यांच्याकडून फक्त आश्वासनच मिळत होते.

याबाबतचे वृत्त दैनिक भारतमध्ये बुधवारी (दि. १२) प्रसिद्ध झाले होते. त्यानंतर जिल्हा क्रीडाधिकारी पवार यांनी तातडीने याची दखल घेत बुधवारी (दि.१२) व गुरुवारी (दि.१३) हे ओपन जिम दुरूस्त करून घेतले. जिमचे सर्व साहित्य आता नागरिक व क्रीडाप्रेमींना व्यायामासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा. व्यायामाच्या साहित्याचा वापर नागरिकांनी काळजीपूर्वक करावा, तोडफोड होऊ नये याचीही काळजी घ्यावी, असे आवाहन श्री. पवार यांनी केले आहे. जिल्हा क्रीडाधिकारी पवार यांनी तातडीने ओपन जीम दुरूस्ती करून दिल्याबद्दल न्यू जॉगर्स फाउंडेशनचे अध्यक्ष सुहास साळुंके यांनी त्यांचे आभार मानले. नागरिकांनीही याचा वापर काळजीपूर्वक करावा, असे आवाहनही साळुंखे यांनी केले आहे.






## साचलेला कचरा जाळल्याप्रकरणी वोरोनोको प्रशालेला ५ हजारांचा दंड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी -**

वोरोनोको प्रशालेतील साचलेला कचरा बेकायदेशीररित्या जाळल्याप्रकरणी महापालिका प्रशासनाकडून ५ हजाराच्या दंडाची कारवाई करण्यात आली आहे. यापुढे असा प्रकार होऊ नये यासाठी महापालिका अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी नोटीसही बजावली आहे.

महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून शहरामध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. शहरातील दैनंदिन साफसफाई कामकाजाच्या पाहणी दरम्यान महानगरपालिका क्षेत्रातील रेल्वे लाईन्स परिसरात वोरोनोको माध्यमिक प्रशालेत साचलेला कचरा शाळेच्या आवारात जाळला जात असलेबाबतची बाब निदर्शनास आली. वास्तविक शाळेमधील निर्माण झालेला कचरा हा विल्हेवाटीसाठी महापालिकेच्या घंटागाडीस सुपूर्द करणे अपेक्षित आहे. बेकायदेशीरपणे कचरा जाळला गेल्याचे दिसून आल्याने प्रशालेस ५ हजार इतक्या दंडाची कारवाई महापालिकेकडून करण्यात आली आहे. तसेच या पुढे अशा घटनेची पुनरावृत्ती टाळणेत यावी. तसेच यापुढे आपले प्रशालेमध्ये निर्माण झालेला कचरा हा ओला व सुका कचरा असल्यास त्याचे प्रशालेच्या आवारात डस्टबिनमध्ये वर्गीकरण करून साठवावे व तो दररोज महानगरपालिकेच्या घंटागाडीस देण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीमध्ये कचरा जाळण्यात येऊ नये व पर्यावरणास हानी पोहोचणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना दिल्या.

# पशुगणनेमुळे देशी पशुसंवर्धनास मिळणार बळ

## • नवीन धोरणासाठी गतिमान कामगिरी; मार्चअखेरपर्यंत होणार पशुगणना पूर्ण

**तभा वृत्तसेवा । अमोगसिध्द मुंजे**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी**

संपूर्ण देशभरात केंद्र सरकारमार्फत सुरू असलेल्या पशुगणनेमुळे देश व राज्यात असणाऱ्या देशी पशुसंवर्धनासह संकरीत पशुंची संख्या स्पष्ट होणार आहे. शिवाय गाय, म्हैस, बैल, शेळ्या, मेंढ्या, कुत्रा, मांजर, ससा, उंट, घोडा यासह इतर प्राण्यांचीही गणना होणार असल्यामुळे पशुंसाठी नवीन धोरण राबवण्यासाठी पशुगणना उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे जिल्ह्याची पशुगणना प्रगतीपथावर आहे. ही गणना देशी पशुसंवर्धन बचाव करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

सोलापूर जिल्हा विस्ताराने व पशुंच्या दृष्टीने राज्यात दुसऱ्या अथवा तिसऱ्या क्रमांकाचा आहे. याठिकाणी खिलार गाय, बैल तसेच पंढरपूरी म्हैश या देशी पशूंची संख्या मोठ्या प्रमाणात असून दुग्ध उत्पादनासाठी संकरित जनावरांचेही संगोपन करण्यात येत आहे. त्यामुळे जिल्ह्याची पशुगणना झाल्यास देशी पशुंच्या संवर्धनासाठी मदत होणार आहे. संपूर्ण देशभरासह राज्यात सध्या पशुगणना सुरू असून २८ फेब्रुवारीपर्यंत पशुगणना पूर्ण करण्याचा आदेश देण्यात आला आहे. विधानसभेच्या निवडणुकांमुळे राज्यात पशुगणना सुरू होण्यास विलंब झाला. त्यामुळे मार्चअखेरपर्यंत पशुगणना पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. प्रगणकांमार्फत युध्दपातळीवर वस्तुनिष्ठ व अचूक पशुगणना सुरू आहे. मार्चअखेरनंतर जिल्ह्यात असणाऱ्या देशी पशु व संकरित पशुंची संख्या स्पष्ट होणार आहे. त्यामुळे पशुगणनेकडे पशुपालकांचे लक्ष लागले आहे. २०१९ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यात आठ लाख ७३ हजार २२६ कुटुंब संख्या आहे. त्यापैकी तीन लाख ९४ हजार ५९६ कुटुंबाचा सर्वे पूर्ण करण्यात आला आहे. यामध्ये १० ते १५ टक्के देशी गायी व १५ ते २० टक्के म्हशींची संख्या कमी झाल्याचे दिसून येत आहे. जिल्ह्यातील एकूण कुटुंबापैकी ४२ टक्के कुटुंबांची पशुगणना पूर्ण झाली असून यामध्ये गाय, म्हैस, बैल, ससा, हरिण, उंट, घोडा, शेळ्या, मेंढ्या, मांजर, कुत्रा यासह इतर पशुंची गणना करण्यात आली आहे. केंद्र सरकारने सुरू केलेल्या २१ व्या पशुगणनेमुळे शेती व्यवसायाशी संलग्न असणाऱ्या पशुपालन व्यवसायाची वाढ, प्रगती व विकास स्पष्ट होणार आहे. या पशुगणनेसाठी तीन टप्प्यावर सर्वे करण्यात येत आहे. प्रत्येक कुटुंबात प्रगणक जाऊन पशुंच्या संख्येची नोंद घेत आहेत. प्रत्येक प्रगणकाला ग्रामीण भागात तीन हजार कुटुंब तर शहरी भागात चार हजार कुटुंबांचे सर्वे करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. प्रगणकाला दहा रुपये किंवा त्यापेक्षा अधिक मानधन आहे. प्रगणकांनी सर्वे केल्यानंतर त्याची तपासणी करण्यासाठी सुपरवायझरची नेमणूक केली आहे. सुपरवायझरच्या सर्व नोंदी तपासण्यासाठी जिल्हास्तरीय नोडल अधिकारी नियुक्त आहे. सर्व कुटुंबापर्यंत जाऊन अचूक, वस्तुनिष्ठ व वास्तव पशुगणना सुरु आहे. २०१९ च्या सर्वेनुसार जिल्ह्यात साधारणतः दहा ते बारा लाख गायी व म्हैस तर दहा ते अकरा लाख शेळ्या-मेंढ्यांची संख्या होती. त्यानुसार २०१९ मध्ये जिल्ह्यात गाय, म्हैस, शेळ्या व मेंढ्या यांची संख्या २४ लाख होती. पशुगणनेमुळे त्यामध्ये घट व वाढ स्पष्ट होणार आहे.



### पशुगणनेचे फायदे

- देशी गायींवर संकरित गायींचा झालेला परिणाम
- देशी गाय, म्हैस संगोपन व संवर्धन करण्यासाठी उपाययोजना
- ३ हजार पशुंमागे दवाखाना, डॉक्टर स्थलांतर करण्यास मदत
- पशुसंवर्धन, संगोपनासाठी नवीन धोरण लागूसाठी मदत
- पशुसंवर्धनासाठी अनुदान ठरविणे
- जैवविविधतेसह दुर्मिळ पशु वाचविणे
- वाढत्या शहरीकरणाचा पशुधनांवर होणारा परिणाम स्पष्ट

### नवीन पशु धोरणासाठी पशुगणना आवश्यक

केंद्र व राज्य सरकारमार्फत जिल्ह्यात पशुगणना सुरू आहे. वस्तुनिष्ठ व अचूक पशुगणना सुरू असून या गणनेवरच सरकारचे नवीन पशुधोरण राबविण्यात येणार आहे. पशुगणनेमुळे जिल्ह्यातील देशी खिलार गाय व पंढरपुरी म्हैश यांच्या संवर्धनासाठी निधी उपलब्ध होणार आहे. सरकारकडून देशी पशुसंवर्धनास प्राधान्य दिले जात असल्याने त्यासाठी पाठपुरावा करता येऊ शकतो.

**विशाल येवले, प्रभारी उपायुक्त, जिल्हा पशुसंवर्धन**

### जिल्ह्याची पशुगणना प्रगतीपथावर

शासनाने जाहीर केलेल्या मुदतीमध्ये पशुगणना पूर्ण करण्यासाठी जिल्ह्यातील यंत्रणा कार्यरत आहे. दररोज बैठका घेऊन पशुगणना पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. मुदतीच्या आत पशुगणना पूर्ण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

**- नवनाथ नरळे, पशुसंवर्धन अधिकारी, जि. प. सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०२९

**करिसी तें देवा करीं माझें सुखें ।**
**परी मी त्यासी मुखें न म्हणे संत ।।**

प्रवचन, कीर्तन करणारा व्यक्ती कसाही असला तरीही आपण त्याला संत म्हणून त्याच्या पाया पडतो. अंगावर विशिष्ट प्रकारची वस्त्र, गळ्यात माळ, कपाळाला टिळा, मुखात नाम घेणाऱ्याला नांव ठेवण्याचे आपले धाडस होत नाही. त्याचे कारण म्हणजे आपण अशा लोकांकडे श्रध्दात्मक दृष्टीकोनातून पाहात असतो. श्री संत ज्ञानोबा, तुकोबा, चोखोबा आदि संतांनी समाजासाठी जे अत्यंत महत्वाचे कार्य केले आहे, ते कार्य ही मंडळी करीत आहे, असे आपणाला वाटते. त्यामुळे आपण या सर्व वेषधारी व प्रवचन कीर्तन करणाऱ्यांना संत ज्ञानोबा-तुकोबांच्या पंक्तीला नेऊन बसवित असतो. पण या मंडळीपैकी किती लोक खरोखरच नि:स्वार्थ भावनेने कार्य करतात याचा आपण विचार करीत नाही. स्वत:च्या जीवनात हे लोक चांगले वागतात का? याकडे आपण पाहात नाही. सुदैवाने म्हणा की दुर्देवाने म्हणा या लोकांपैकी कांहीचे वाईट वर्तन, व्यभिचार, दुष्कृत्य आपल्या नजरेसमोर आले तरी यांना वाईट म्हणण्याची आपल्यांपैकी अनेकांची इच्छा होत नाही किंवा धैर्य होत नाही. कारण त्यांना वाईट म्हटले तर आपले वाईट होईल अशी कळत न कळत भिती आपणास असते. पण तुकाराम महाराज मात्र अशांना संत म्हणणार नाही, असे स्पष्ट म्हणतात. संत महात्म्यांच्या पेहरावात जे वाईट वागत आहेत, त्यांना मी संत म्हणणारच नाही. माझ्या अशा वागण्याबद्दल ईश्वराने मला कांही शिक्षा दिली तरी चालेल. असे स्पष्टपणे बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, करिसी तें देवा करीं माझें सुखें । परी मी त्यासी मुखें न म्हणे संत।। चांगल्यांच्या पेहरावात वाईट वागणाऱ्यांना वाईट म्हणणे खरेच अवघड आहे. प्रवचन, कीर्तनकारांच्या वेषात राहून स्वार्थापोटी व्यवहार करणाऱ्यांची संख्या वाढत चालली असली तरीही यांना रोखण्यासाठी कोणी पुढे येत नाही. अध्यात्मिक क्षेत्रातील हा व्यवहार आत्मबलास, भावनेस तडा देत आहे. व्यवहारीक प्रवचन, कीर्तनकारांचे भाव दैनंदिन वाढत चालले आहेत. लोकांना मार्गदर्शन करण्याऐवजी हे लोक केवळ टिंगल, टवाळी करून हसविण्याचे म्हणजेच एका अर्थाने फसविण्याचे काम करीत आहेत. या लोकांच्या अशा व्यावहारिक व स्वार्थी वागण्यामुळे चांगल्या व खऱ्या प्रवचन, कीर्तनकारांकडेही लोक शंकात्मक नजरेने पाहू लागले आहेत. ज्ञानोबा-तुकोबांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या खऱ्या संत महात्म्यांकडे कोणी वाईट नजरेने पाहू नये, असे आपणाला वाटत असेल तर व्यभिचारी, व्यावहारी, स्वार्थी, ढोंगी लोकांना आपण आवर घातलाच पाहिजे. त्यांना आवर घालणे आपणास शक्य नसेल तर किमान यांच्या ढोंगीपणाला आपण पुष्टी तरी देऊ नये. जय जय राम कृष्ण हरी.



**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. १४ फेब्रुवारी २०२५ | कालाभैरव यात्रा गडहिंग्लज |
| विक्रम संवत् २०८०-८१ | शब-ए-बारात |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. द्वितीया (२१.५१) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पू.फाल्गूनी (२३.०८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - अतिगंड (०७.१९) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (०९.०२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल.

# सोलापूर रेल्वे स्थानकावर साप; सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

## ● वन्यजीव तस्करी रोखण्यासाठी एक्स-रे स्कॅनर बसवण्याची मागणी



**● वन्यजीव कायद्याचे काटेकोर पालन होणे गरजेचे**

डुरक्या घोणस हा साप १० वर्षांपूर्वी बऱ्यापैकी प्रमाणात आढळत होता. परंतु आज या सापाची प्रजात लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. अश्या गारुडी व तस्करांमुळे दुर्मिळ साप लुप्तप्राय होण्याच्या मार्गावर असल्याने वन्यजीव कायद्याचे काटेकोर पालन होणे गरजेचे आहे.

**-अनिल अलदार, संस्थापक अध्यक्ष, नाग फाउंडेशन**

**● गारुड्यांना प्राण्यांची वाहतूक करणे सोपे जाते**

कन्व्हेयर बेल्ट एक्स-रे बॅगेज स्कॅनर नसल्याने अश्या गारुड्यांना व तस्करांना प्राण्यांची वाहतूक करणे सोपे जाते. अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी रेल्वे स्थानकांवर एक्स-रे स्कॅनिंग यंत्रणा त्वरित बसवणे गरजेचे आहे. शिवाय एखादा साप रेल्वे मध्ये सुटल्यास प्रवाशांमध्ये प्रचंड खळबळ माजून भीतीपोटी प्रवासी चालत्या रेल्वेतून बाहेरही उड्या मारू शकतात ज्याचे परिणाम आपल्याला काही दिवसांपूर्वीच दिसून आले आहेत.

**- राहुल शिंदे, सर्प अभ्यासक**


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

सोलापूर रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ५ वर एक डुरक्या घोणस जातीचा साप सापडल्याने मोठी खळबळ उडाली. हा साप एक गारुडी प्लॅटफॉर्म क्रमांक पाच वरून घेऊन जात होता. मात्र ही बाब उपस्थितांच्या लक्षात येताच तो दुरडी (गारुड्या कडील साप ठेवण्याची वस्तू) टाकून पळून गेला. या घटनेने रेल्वे स्थानकांवरील सुरक्षेच्या त्रुटी स्पष्ट केल्या असून, तस्करी रोखण्यासाठी अधिक कडक उपाययोजना करण्याची गरज असल्याचे अधोरेखित झाले आहे.

ही घटना रेल्वे स्थानकांवरील सुरक्षा व्यवस्थेतील मोठी त्रुटी दर्शवते. या सापाच्या सुटकेसाठी रेल्वे कर्मचारी, वन विभाग आणि नाग फाउंडेशनच्या सर्पमित्रांनी वेळीच कार्यवाही केली, ही समाधानाची बाब आहे. मात्र, यापुढे असे प्रकार रोखण्यासाठी रेल्वे प्रशासनाने त्वरित कडक सुरक्षा उपाय राबवून तस्करीस आळा घालावा, अशी मागणी नाग फाउंडेशन तर्फे करण्यात आली.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख
राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (५१) तिरंगा

आपला तिरंगा राष्ट्रध्वज हा भारत मातेचे हृदय आहे व रा.स्व संघाचा भगवा ध्वज हा आपल्या राष्ट्रध्वजाचा संरक्षक आहे हे सिद्ध करणारं स्पष्टीकरण वाचा घडलेल्या घटनेतून. जळगाव जिल्ह्यातील यावल तालुक्यातील फैजपूर येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले होते. त्यावेळी अध्यक्ष होते पंडित जवाहरलाल नेहरू. तिथला ध्वजस्तंभ ऐंशी (८०) फूट उंचीचा होता. परंतु ध्वजारोहण करताना तिरंगी झेंडा मध्येच गुंतून पडला. तेव्हा शिरपूर शाखेतील एक संघाचा स्वयंसेवक किसनसिंग परदेशी पुढे होऊन बघता बघता स्तंभावर सरसर चढून गेला व वर चढून त्याने झेंडा मोकळा केला. व प्रारंभीच होणारा गोंधळ टळला. व तिरंगा ध्वज डौलाने फडकू लागला . सर्वांनाच त्याची धन्यता वाटली. आज या स्वयंसेवकाचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे यानंतर संध्याकाळी व्यासपीठावर तुझा सत्कार करू असे नेहरूंनी त्याला सांगितले. परंतु तो शाखेत जाणारा संघाचा स्वयंसेवक आहे असे कळले म्हणून काँग्रेसच्या अधिवेशनात त्याचा सत्कार करणे अक्षरशः टाळले. ही गोष्ट डॉक्टर हेडगेवार यांना समजताच त्यांनी त्याचा शाखेवर सत्कार केला व त्याला एक चांदीचा पेला दिला. तेव्हा डॉक्टर म्हणाले कोठेही देशाचे कार्य अडले; व ते पुढे नेण्याची शक्यता आपणाला वाटत असेल; तर पक्ष वगैरे न पाहता आपण पुढे सरले पाहिजे हीच दक्षता किसनसिंगाने दाखविली म्हणून त्यांनी खूप कौतुकांनी त्याची पाठ थोपटली. मग आता संघाचे नाव निघतात कपाळाला आठ्या पडणाऱ्यांची असहिष्णुता आणि डॉक्टरांच्या भक्तीतून उदीत झालेली सहिष्णुता सर्वांना जाणवली; तर भारत परम वैभवी होण्याला मदत होईल. हे निश्चित.

।। भारत माता की जय। ।। वंदे मातरम ।।

**क्रमशः**

# शहरात रेशनिंग कार्डधारक संघटना बांधणीचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

रास्त भाव धान्य दुकान हे सर्वसामान्य माणसाला राईट टू लाइफ देणारी व्यवस्था आहे. देशात कोणीही उपाशी राहू नये, कुपोषण होऊ नये, किमान त्यांना दोन वेळचे जेवण मिळाले पाहिजे म्हणून मायबाप सरकार अन्न सुरक्षा दिलेली आहे.



त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी पुरवठाधारकांना नोंदणीकृत परवाने दिलेले आहेत. मात्र यामध्ये मोठ्या प्रमाणात सावळा गोंधळ असून सोलापूर शहरातील नागरिकांना रेशनिंगचा प्रश्न भेडसावत आहे. रेशनिंग दुकानात कार्डधारकांना वेळेवर धान्य न मिळणे, रेशनिंग कार्ड बंद असलेले चालू न करणे, KYC न करणे, नाव कमी न करणे नाव न वाढवणे इ असे अनेक प्रश्न रेशनिंग कार्ड धारकांना होत आहे यावर प्रभावी उपाय करण्यासाठी सोलापूरातील सर्व रेशनिंग कार्ड धारक एकत्र येणे अत्यंत गरजचे आहे. यासाठी सोलापूर शहर रेशनिंग कार्ड धारक संघटना बांधणीचा निर्णय घेण्यात आला आहे. जो पर्यत सोलापूर शहरातील सर्व रेशनिंग कार्ड धारक एकत्र येणार नाहीत तो पर्यंत आपले हक्काचे रेशन धान्य मिळणार नाहीत म्हणून सोलापूर शहर रेशनिंग कार्ड धारक संघटना स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे सोलापूर शहरात एकूण अ,ब,क,ड, असे चार विभाग आहेत प्रत्येक विभागातील ३ ते ४ कार्डधारक संघटेनेच्या विश्वस्त म्हणून राहतील तसेच प्रत्येक रेशनिंग कार्ड धारक सभासद म्हणून राहतील. या संघटने मार्फत शासनाच्या नियमा प्रमाणे रेशनिंग धान्य वाटप करण्यासाठी सर्व रेशनिंग दुकादारांना दबाव असेल आणि प्रत्येक रेशनिंग कार्ड धारकांना आपल्या हक्काचे रेशनिंग धान्य मिळवणे व इतर मागण्यासाठी सोलापूर शहर रेशनिंग कार्ड धारक संघटना काम करेल या संघटने मध्ये प्रत्येक रेशनिंग कार्ड धारकांनी सहभागी व्हावे. अधिक माहितीसाठी शिवबा संपर्क कार्यालय, बोध्दूल निवास बोल्ली मंगल कार्यालय शेजारी अशोक चौक येथे संपर्क साधावे संपर्क नं ९५८८४९०२७४ या नंबरवर संपर्क साधू शकता असे आवाहन समाजिक कार्यकर्ते निरंजन बोध्दूल यांनी केले आहे.

# अ.भा. उर्दू साहित्य संमेलन समितीचे पुरस्कार जाहीर

**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

अ.भा.उर्दू साहित्य संमेलन समितीच्यावतीने यंदाचा वर्षी आनंद देशपांडे यांचा उर्दू मित्र म्हणून तर शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मुख्याध्यापक आसिफ इक्बाल तर साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनिय काम करणारे कवी इरफान कारीगर यांना गौरव पुरस्कार देण्यात येणार आहे, अशी माहिती माजी महापौर ॲड. यू. एन. बेरीया यांनी पत्रकार परिषदेत दिली.



दरवर्षी उर्दू दिनानिमित्त मराठी भाषिकातून उर्दू भाषा अवगत असणाऱ्या व उर्दू भाषेवर प्रेम करणाऱ्या एका मान्यवरांचा उर्दू मित्र, तर उर्दू साहित्य व शैक्षणिक क्षेत्रात तसेच उर्दू भाषेच्या विकासासाठी उल्लेखनिय कार्य करणाऱ्या मान्यवरांना गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. हा समारंभ शुक्रवार १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता कॉ. एन. आर. बेरिया शैक्षणिक संकुल, लष्कर येथे होईल. यावेळी इकबाल सय्यद, मोहम्मद शफी, नासिर आळंदकर आदी उपस्थित होते.

# पंचाक्षरी प्रशालेचा माजी विद्यार्थी, शिक्षक स्नेहमेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ फेब्रुवारी-**

पंचाक्षरी माध्यमिक उच्च माध्यमिक विध्यामंदिर इयत्ता १० वी सन २००४-०५ बॅचचा माजी विद्यार्थी शिक्षक मेळावा ताराई हॉटेल येथे संपन्न झाला. या कार्यक्रमास तब्बल वीस वर्षांनी सर्व वर्गमित्र मैत्रिणी व शिक्षक एकत्रित आले. डॉ. श्री. ष. ब्र. पंचाक्षरी गुरू पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्यसानिध्यात, सेवानिवृत्त प्राचार्य अमोगसिध्द कस्तुरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.



या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त प्राचार्य शिवानंद यलगोंडे, विद्यमान प्राचार्य मल्लिकार्जुन माकणे, भीमाशंकर थोरात, मल्लिनाथ प्रचंडे, निलप्पा जवळकोटे, यलप्पा लांबतुरे, गुलाब पवार, रमेश बिराजदार, सिद्धाराम काळे, षडाक्षरी स्वामी, अण्णाराव खट्टे, सिद्धाराम बगले, शंभुलिंग वाले, बेनुरे गुरुजी, हुलजंती, संगप्पा बिराजदार उपस्थित होते. सर्व गुरुवर्य शिक्षकांचे पुष्पवृष्टिने माजी विद्यार्थ्यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. माजी विद्यार्थी मंजुनाथ कस्तुरे, व्यंकटेश दांडूरे, अशोक कुलकर्णी, गीरमल्ला गुडडेवाडी, ज्ञानेश्वर काटकर, मुबारक मुल्ला, भाग्यश्री देवर, भाग्यश्री घेरडे, प्रज्ञा कुलकर्णी, प्रतिभा कुलकर्णी आदी माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. श्री.ष.ब्र.डॉ.पंचाक्षरी शिवाचार्य महास्वामीजी यांनी उपस्थित सर्व माजी शिक्षकवृंद व सन २००४-०५ मधील सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून सर्वांना शुभेच्छा दिले. माजी शिक्षक निलप्पा जवळकोटे, यलप्पा लांबतुरे, गुलाब पवार, मल्लिनाथ प्रचंडे, बेनुरे गुरुजी कार्यक्रमाचे अध्यक्ष अमोगसिध्द कस्तुरे यांनी माजी विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले. सूत्रसंचालन शिवानंद बगले तर आभार जगदेवप्पा पाटील यांनी मानले.

# संगणकीय ज्ञान असणे गरजेचे : डॉ. एक्कलदेवी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

पुस्तकी ज्ञानाबरोबरच संगणकीय ज्ञान असणे ही काळाची गरज झाली आहे. सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या युगात टिकायचे असेल तर विद्यार्थ्यांनी संगणक शास्त्रातील विविध कोर्सेस करायला हवेत. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही त्यांनी मोबाईल वरील विविध अँप वर येणारे मोफत संगणकीय कोर्स करू शकता.



ॲडव्हान्स एक्सेल, वर्ड, पॉवर पॉईंट, ग्राफिक डिझाईनिंग, सायबर सिक्युरिटी, डाटा सायन्स, डिजिटल मार्केटिंग, मोबाईल पडेव्हलपमेंट, वेब डिझायनिंग, प्रोग्रामिंग, डाटा एन्ट्री, कोरल ड्रॉ, फोटोशॉप, मिक्सिंग आदींमध्ये पारंगत व्हावे लागेल. तरच मोठ मोठ्या कंपन्यांमध्ये चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळू शकतात किंवा स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरू करता येऊ शकेतो असे प्रतिपादन ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक एक्कलदेवी यांनी केले.

ल. गो. काकडे एज्युकेशनल फाउंडेशन व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या मोफत बेसिक कॉम्प्युटर कोर्सच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते. यावेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, रोटरी ईक्लब ऑफ सोलापूर ईलाईटचे अध्यक्ष सचिन तोष्णीवाल, सदस्य डॉ. राजीव प्रधान, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, व्यंकटेश मच्छा, अर्चना पारशेट्टी, शिक्षक विश्वनाथ कंदी आदी उपस्थित होते. यावेळी दुसऱ्या व तिसऱ्या बॅचमध्ये उत्तीर्ण झालेल्या २७ मुला-मुलींना व महिलांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व बुके देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वागत प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले तर आभार मनीषा चव्हाण यांनी मानले.

# एकत्र राहिलो तरच शासनाकडून मागण्या मान्य होतील

## अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेच्या राष्ट्रीय अधिवेशनात ललित गांधी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ फेब्रुवारी-**

अनंत अडचणीवर मात करून हे अल्पसंख्यांक महामंडळ तयार झाले आहे. याप्रसंगी विविध राजकीय पक्षातील नेते मंडळींनी मोलाची भूमिका बजावली. दिगंबर, श्वेतांबर, पंचम, सैतवाळ, कासार असे वेगवेगळे गट न करता आपण सर्व जैनच आहोत. भगवान महावीरांनी दिलेल्या जैन धर्माच्या दीक्षेनुसार आपण सर्व जैन म्हणूनच एकत्र राहिलो तर शासनाकडून आपल्या पदरात काही फायदे पाडून घेऊ शकतो व आपल्या मागण्या मान्य करून घेऊ शकतो. तेव्हा आपण सर्वांनी एकजुटीचा निर्धार करून, खुल्या मनाने एकत्र येऊन फक्त जैन या धर्माखाली आपण एक होऊन अल्पसंख्यांकाचे फायदे घ्यावेत, असे आवाहन जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललितजी गांधी यांनी केले.

अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेचे दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशन हिराचंद नेमचंद दिगंबर जैन धर्मशाळेत उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी एक्साइड बॅटरीचे उद्योजक महावीर गुंडाळे यांच्या हस्ते धर्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. तदनंतर अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिलीपजी घेवारे यांच्या अध्यक्षतेखाली तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय अल्पसंख्यांक आयोगाचे



सदस्य फुलचंदजी जैन, निरंजनजी भुमकर यांच्या उपस्थितीत प. पु. १०८ आचार्य आर्यनंदी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दिपप्रज्वलन केल्यानंतर मंगलाचरण म्हणून साधारण ७५० जैन बंधू भगिनींच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.

अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष प्रकर्षजी सांगवे यांनी प्रास्ताविक केले. अखिल दिगंबर जैन संस्थेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व अधिवेशनाचे प्रमुख संयोजक डॉ. राजेश फडकुले यांनी अधिवेशनाचा हेतू स्पष्ट केला. अधिवेशनाचे दुसरे सत्र महिला संसद-ध्येय एक दिशा अनेक, नव्या पिढीतील नारीशक्ती अविष्कार या विषयावर झाले. तृतीय सत्रामध्ये शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांमधून मिहिका फडकुले हिने मनोगत व्यक्त केले. यावेळी समाजातील श्रेष्ठ श्रेष्ठ मान्यवरांचा स्मृती चषक, पंचरंगी व बुके देऊन सत्कार करण्यात आला. चौथ्या सत्रामध्ये सायंकाळी महाआरती, वाद्यपूजन व जैन सैतवाळ कलावंतांचा कलाविष्कार यामध्ये शिवरंजनी प्रस्तुत संगीत रजनी कार्यक्रमाचा अनोखा नजराणा पेश करण्यात आला. पाचव्या सत्रामध्ये श्री १००८ आदिनाथ भगवंतांचा प्रक्षाळ, बुबने जैन मंदिर, चाटी गल्ली येथून आर्यनंदी महाराजांची पालखी निघाली. स्वदेशी एवम उद्यमिता-उद्योजकतेची मनोभूमिक या सहाव्या सत्राचे, प्रिसिजन ग्रुप अध्यक्ष यतीन शहा यांच्या हस्ते उद्घाटन झाले. अध्यक्षस्थानी छ. संभाजीनगरचे ज्येष्ठ उद्योजक रवींद्र कोंडेकर होते. आठव्या सत्रांमध्ये भारतातील सर्व जिल्हाध्यक्ष, कार्यकारणी सदस्य व सर्व समिती प्रमुख यांचेसाठी खुले अधिवेशन घेण्यात आले. समारोपाचे नववे सत्र तीर्थरक्षा समिती, महाराष्ट्राचे अध्यक्ष मिहिर गांधी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यामध्ये समाजामध्ये उल्लेखनीय व कर्तृत्ववान कार्य केल्याबद्दल ज्येष्ठ नागरिक जीवन पुरस्कार, सेवाव्रती पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# बांगलादेशी घुसखोर शोधमोहीम राबवा

## हिंदु जनजागृती समितीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

राज्यभरात बांगलादेशी घुसखोरांचा अक्षरशः सुळसुळाट झाला आहे. यातून राज्याच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला असून सामाजिक अस्थिरता, गुन्हेगारी वाढ, रोजगाराची समस्या निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राची पश्चिम बंगाल, 'आसाम'सारखी स्थिती होण्याआधी मुख्यमंत्र्यांनी राज्यभरात 'बांगलादेशी घुसखोर शोध मोहिम' राबवून सर्व बांगलादेशी घुसखोरांना शोधून काढावे, तसेच या घुसखोरांना साहाय्य करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी राजन बुणगे यांनी केली.

सोलापूर जिल्हा परिषद येथे छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वार (पूनम गेट) जवळ १२ फेब्रुवारी २०२५ दिवशी आयोजित आंदोलनात ते बोलत होते. या आंदोलनात विविध हिंदुत्वनिष्ठ संघटना सहभागी झाल्या होत्या. या आंदोलनात सहभागींनी बांगलादेशी घुरखोरांना बाहेर काढा अश्या आशयाचे फलक हातात धरले होते. अधिवक्ता चंद्रशेखर वारद, हिंदु जनजागृती समितीचे मिनेश पुजारे, किशोर जगताप, राजश्री देशमुख, धनंजय बोकडे, लिंगराज हुळ्ळे, विनोद रसाळ, यश मुग्ड्याल इत्यादींनी आपले मनोगत व्यक्त केले. आंदोलन झाल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने तहसीलदार दिनेश पागरे यांनी निवेदन स्वीकारले.

# माळशिरस तालुक्यातील पाणी प्रश्न मिटला

## जलजीवन मिशन अंतर्गत झाली नळजोडणी; लोंढे मोहितेवाडीतील महिलांची थांबली पायपीट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी -**

पिण्यासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी पाणी पुरवठा योजना नादुरूस्त असल्यामुळे लोंढेमोहितेवाडी ( ता.माळशिरस ) येथील ग्रामस्थांना पिण्यासाठी पाणी मिळण्यास अडचण होती. परंतु आज जल जीवन मिशन ही योजना यशस्वीपणे मार्गी लागली आहे.त्यामुळे गावातील प्रत्येक कुटूंबाना पुरेसे व शुध्द पाणी पुरवठा होत आहे. पर्यायाने पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांची विशेषत: महिलांची पायपीट थांबल्याने ग्रामस्थ व महिलांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

दरम्यान, सोलापूर जिल्हयातील माळशिरस तालुक्यात तालुक्यापासून साधारणत: २४ कि.मी. अंतरावर सातारा जिल्हयातील प्रसिध्द तिर्थक्षेत्र असलेल्या शिखर शिंगणापूर या धार्मिक ठिकाणच्या शेजारी लोंढेमोहितेवाडी हे गाव आहे. याग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणूकीमध्ये निवडलेले सरपंच व ७ सदस्य तसेच सचिव ग्रामसेवक यांच्या सहकार्यातून ग्रामपंचायतीचे प्रशासन चालविले जाते.या गावची लोकसंख्या १४४६ असून २४० इतकी कुटूंब संख्या असलेले एक छोटस गाव आहे.गावात निवडणूक झाल्यानंतर गावचे पदाधिकारी व ग्रामस्थ गावातील निवडणूक, राजकारण विसरून गावामधील विकासकामे करण्यासाठी एकजूटीने एकत्र येतात हे या गावाचे विशेष आहे.

गावात पूर्वी ग्रामस्थांना पिण्यासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी जलस्वराज्य या योजनेमधून पाणी पुरवठा योजना करण्यात





आलेली होती पण ही योजना नादुरूस्त असल्यामुळे योजना पूर्णपणे बंद अवस्थेत होती.त्यामुळे गावातील ग्रामस्थांना पिण्यासाठी पाणी मिळण्यास अडचण होती.पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांना गावात व परिसरात असणा-या हातपंप व विहिरीमधून पाणी आणण्यासाठी पायपीट करावी लागत असे.ग्रामस्थांच्या या मुख्य अडचणींचा विचार करून लोंढेमोहितेवाडी या ग्रामपंचायतीच्या सरपंच अंजना विजयसिंह लोंढे, ग्रामसेवक दत्तात्रय गोरे यांनी ग्रामपंचायतीध्ये ग्रामपंचायतीचे सदस्य व ग्रामस्थ यांची बैठक बोलावली आणि या बैठकीमध्ये गावच्या पिण्याच्या पाण्याची अडचण दूर कशी करायची? याबाबत निर्णय घेऊन गावात पाणी पुरवठा योजना मार्गी लावण्याचा निर्णय घेतला.

त्यानुसार गावातील प्रत्येक कुटूंबाला पिण्यासाठी शुध्द व पुरेसा नळाद्वारे पाणी पुरवठा करणे अत्यंत गरजेचे होते म्हणून जल जीवन मिशन या योजनेमधून गावात पाणी पुरवठा योजना राबविण्याचे ठरले. त्यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग माळशिरस यांच्या सहकार्याने पंचायत समिती स्तरावर प्रस्ताव दाखल करून जिल्हा परिषद स्तरावरून जल जीवन मिशन ही योजना मंजूर करण्यात आली.या जल जीवन मिशन योजनेंतर्गत सन २०२२-२३ मध्ये पाणी पुरवठा योजनेसाठी विहीर खोलीकरण, पंपींग मशिनरी, उर्ध्वनलिका, वितरण व्यवस्था व नळ कनेक्शन आदी कामे करण्यात आली आहेत.या पाणी पुरवठा योजनेचे काम २९ ऑगस्ट २०२२ रोजी सुरू केल्यानंतर एका वर्षामध्ये म्हणजे २९ ऑगस्ट २०२३ रोजी काम पूर्ण करण्यात आले आहे.सदर कामासाठी ६३ लाख ४४ हजार रुपये इतका तर नळ नोडणी या कामासाठी २ लाख ६१ हजार ६१३ रुपये इतका निधी खर्च झालेला आहे.आज या लोंढेमोहितेवाडी गावाला पाणी पुरवठा विहीरीवरून विद्युत पंपाद्वारे पाण्याच्या टाकीमध्ये पाणी भरले जाते आणि टाकीमधून घरोघरी नळ जोडणी करून प्रत्येक कुटुंबांना प्रती माणसी ५५ लिटर याप्रमाणे पाणी पुरवठा केला जातो.

आज या गावातील महिलांना पिण्याचे पाणी आणण्यासाठी त्रास सहन करावा लागला पण ग्रामस्थ व पदाधिकारी यांची एकजूट व जल जीवन मिशन या योजनेमुळे महिलांची त्रासापासून मुक्तता झाली आहे.त्यामुळे आज गावातील महिलांच्या चेह-यावर समाधान दिसून येत आहे. म्हणून गावचे सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थ हे खूप आनंदी आहेत. आज या गावचा पिण्याच्या प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदिप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक अमोल जाधव, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संजय धनशेटटी, पंचायत समिती, माळशिरस, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, माळशिरस यांच्यासह माजी पंचायत समिती सदस्य मानसिंग मोहिते, माजी सरपंच सदशिव ननवरे, माजी उपसरपंच मोहन जाधव, सुवर्णा मोहिते, उपसरपंच ज्ञानेश्वर बोधले, सदस्य विशाल सोनमळे, शितल मोहिते, उज्वला पोतेकर, पुष्पा लोंढे,रुपाली ननवरे आदींचे महत्वपूर्ण असे योगदान दिले आहे.

### ग्रामस्थांना पिण्यासाठी पुरेसे व शुध्द पाणीपुरवठा

लोंढेमोहितेवाडी गावात पाणी पुरवठा योजना नादुरूस्त असल्यामुळे गावातील महिला व ग्रामस्थांची पिण्याच्या पाण्यासाठी तारांबळ उडत होती. परंतु आज जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या सहकार्यामुळे जल जीवन मिशन या योजनेची चांगल्या पध्दतीने अंमलबजावणी झाल्यामुळे सर्व ग्रामस्थांना पिण्यासाठी पुरेसे व शुध्द पाणी पुरवठा होत आहे.

**-अंजना विजयसिंह लोंढे, सरपंच, लोंढे मोहितेवाडी**

# कौशल्यपूर्ण शिक्षणाने बेरोजगारीवर मात करा

### सपोनि मनोज पवार : बसवनगर येथील एनएसएस शिबिरात आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

शिक्षण घेऊनही आजच्या युवकांपुढे बेरोजगारी, व्यसनाधीनता याबरोबरच समाजात सुरू असलेले महिला सुरक्षा असे प्रश्न आहेत. बेरोजगारी कमी झाली तर भ्रष्टाचाराला आपोआप आळा बसेल. कौशल्यपूर्ण शिक्षण घेतल्यास बेरोजगारीची समस्या सुटण्यास मदत होईल, असे प्रतिपादन मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी केले.

मंद्रुपच्या संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाच्या बसवनगर येथील शिबिरात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बसवनगरचे तंटामुक्त समितीचे उपाध्यक्ष भुताळसिद्ध गिरगाव होते. यावेळी जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे विश्वस्त नागेश




बिराजदार, उद्योगपती गणेश कोळी, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. एच. एल. जाधव, शिबिर संयोजक प्रा. डॉ. एस. ए. निंबर्गी आदी उपस्थित होते.

यावेळी पवार म्हणाले की, स्पर्धा परीक्षेत यश मिळवायचे असेल तर कष्ट, सातत्य आणि प्रामाणिकपणा आवश्यक आहे. व्यसनाधीनता आणि सोशल मीडियापासून दूर राहिल्यास यश हमखास मिळते. राष्ट्रीय सेवा योजनेमधून विद्यार्थ्यांचा मानसिक, बौद्धिक आणि सामाजिक विकास होतो.तंत्रज्ञानाचा योग्य वापर, प्रभावी संवाद कौशल्य आणि उद्योगशिलता अंगी बाणवली तर व्यक्तिमत्त्व विकासाबरोबर बेरोजगारीवरही मात करता येते.

बेरोजगारी ही केवळ बाह्य समस्या नसून ती मानसिकतेशी जोडली आहे. कौशल्यपूर्ण शिक्षण आणि आत्मविश्वास असेल तर कोणीही स्वतःच्या मार्गाने यश मिळवू शकतो. प्रास्ताविक आरती लिगाडे हिने केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय अक्षता अंबिगार हिने करून दिला. आभार ऐश्वर्या बिराजदार हिने आभार मानले.

# अंगणवाडी सेविका, मदतनीस पदाची भरती होणार

### बालविकास प्रकल्प अधिकारी रेश्मा पठाण यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ फेब्रुवारी-**

बार्शी तालुक्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस पदाची भरती प्रक्रिया शरु झाली असून अर्ज करण्याची प्रक्रिया सोमवारपासून सुरु झाली आहे. बार्शी तालुक्यात वैराग शहरासह अंगणवाडी सेविकेच्या ३० जागा रिक्त असून अंगणवाडी मदतनीसच्या १६ जागा रिक्त असल्याची माहिती बाल विकास प्रकल्प अधिकारी रेश्मा पठाण यांनी दिली. अंगणवाडी सेविका व मदतनीस पदासाठी १२ बारावी पासपासून पदवी, पदव्युत्तर, डीएड, बीएड असणाऱ्या महिला उमेदवारांना अर्ज दाखल करता येणार आहे. अर्ज करण्याची शेवटची मुदत २४ फेब्रुवारीपर्यंत असून या शैक्षणिक पात्रता असणाऱ्या महिलांनी या पदासाठी अर्ज करावे, असे आवाहन करण्यात आले.

अंगणवाडी सेविका रिक्त जागा-उपळे (दु), मळेगाव, महागाव, सासुरे, लाडोळे, आळजापुर, आंबेगाव, जवळगाव, सुर्डी, गुळपोळी, सर्जापूर, उक्कडगाव, नारी/नारीवाडी, धोत्रे, तावडी, वाणेवाडी, फफाळवाडी, आगळगाव, भोयरे, चुंब, साकत, सौंदरे, उपळाई ठोंगे, कव्हे, श्रीपतपिंपरी, शेंद्री, अलिपुर, देवगाव, धस, पिंपळगाव, बेलगाव, नांदणी, बावी (आ), धामणगाव, लाडोळे, इरले, वैराग, राळेरास, चिंचोली, ढेंबरेवाडी, चुंब, कळबवाडी, कोरफळे, शिराळे, श्रीपत, पिंपरी, धस, पिंपळगाव, मांडेगाव या गावातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या जागा रिक्त असून याचे प्रसिद्धीकरण त्या त्या भागातील गाव कामगार तलाठी, सार्वजनिक वाचनालयात करण्यात आले आहे.

# मंदिर परिसर बाधितांकडून तहसीलदार, नगरपरिषदेला निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ फेब्रुवारी-**

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली वटवृक्ष मंदिर परिसर वाईड प्लॉन -अंतर्गत येणारे भुखंडधारक यांच्या संयुक्त विद्यमाने,तहसीलदार व नगरपरिषद अक्कलकोट यांस वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर परिसर बाधित भुखंडधारक यांच्याकडून नगर परिषद अधिग्रहण संस्था अक्कलकोट यांच्या बाबत निवेदन देण्यात आले.

शासनाने १६ जुलै १९७३ पासून वटवृक्ष स्वामी मंदिर परिसरातील स्वमालकीचे (खाजगी) जमिनी आरक्षित केले आहेत . गेल्या ५२ वर्षांपासून नगरपरिषद किंवा वटवृक्ष स्वामी मंदिर ट्रस्ट ने कोणत्याही प्रकारे भूसंपादनाची प्रक्रिया पार पाडली नसल्याने १४ जून २०२५ रोजी सदर जमीनींचे आरक्षण संपुष्टात आल्याकारणाने मंदिर ट्रस्टच्या नावे असलेले जमीनी गट नं ५८८ वगैरे हस्तगत करून त्यावर आपले विकास कामे करून बाधित भूखंडधारकांचे जमीनी आरक्षण मूक्त करावेत, तशी अधिसुचना येत्या आठ दिवसांत काढावे दैनिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करावे. अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरून वेळ प्रसंगी आमरण उपोषण आंदोलन करू अश्या तीव्र शब्दात उबाठा शिवसेना तालुकाप्रमुख आनंद बक्कानुरे यांनी नगरपरिषदेस व शासनास इशारा दिला.

याप्रसंगी उबाठा तालुकाप्रमुख आनंद बुक्कानुरे, शिवसेनेचे शरण सुरवसे, आदित्य हिबारे, गुब्याड, मल्लिनाथ अर्वतकल, मोहम्मद पठाण, कार्यकर्ते, भूखंडधारक श्रीपाद पुजारी, प्रसाद पंडित, रमेश वाले, अमोल बिराजदार, नागनाथ सराफ, सुवर्णा मळगी, मीरा माने, सुधा बिराजदार, रेणुका माने, संगिता कोठावदे, संजय माशाळे, संदिप वाले, श्रीपाद पोतदार उपस्थित होते.

# सद्गुरु गहिनीनाथ अर्बन बँकेस आदर्श बँक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**माळीनगर, दि. १३ फेब्रुवारी-**

अकलूज येथील सदगुरू गहिनीनाथ अर्बन को-ऑप. बँकेस 'बँको अॅवार्ड २०२४' या प्रथम पुरस्कारानंतर आता प्रथम क्रमांकाचा आदर्श बँक पुरस्कार प्राप्त झाला आहे.

सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन सोलापुर तर्फे सोलापुर जिल्हयातील सहकारी बँकाना मागील तीन वर्षाच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेऊन आदर्श बँक पुरस्कार दिला जातो. सोलापूर येथे पार पडलेल्या सभारंभात दि. महाराष्ट्र अर्बन को-ऑप बँक्स फेडरेशन मुंबईचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा, सोलापुर जिल्हयाचे उपनिबंधक किरण गायकवाड, शहर उत्तर चे आमदार विजयकुमार देशमुख, आ.देवेंद्र कोठे, सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोशिएशनचे अध्यक्ष प्रकाश बाले यांचे हस्ते अकलूज येथील सदगुरू गहिनीनाथ अर्बन को-ऑप. बँकेस आदर्श बॅक या प्रथम पुरस्काराने



सन्मानित करण्यात आले. बँकेस ५० कोटीपर्यंत ठेवी असलेल्या विभागात प्रथम कमांकाचा पुरस्कार मिळाला असुन हा पुरस्कार बँकेचे अध्यक्ष डॉ. अरविंद गांधी, उपाध्यक्ष अॅड. शिरिष फडे, बँकेचे संचालक अजित गांधी, भरतेश वैद्य, निलेश गिरमे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नंदकुमार गोरे यांनी हा पुरस्कार स्विकारला. बँकेच्या आर्थिक स्थितीवर आधारीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला असून मार्च २०२४ अखेर बँकेच्या ३५ कोटी ठेवी आहेत. १८ कोटी ५० लाख कर्ज वाटप आहे. बँकेचा नेट एनपीएशून्य टक्के असून ३८ लाख १७ हजार इतका नफा झालेला आहे. बँकेचे अध्यक्ष डॉ. अरविंद गांधी यांनी सांगितले कि, बँकेच्या उत्तम आर्थिक स्थितीमुळे व बँकेचे सर्व संचालक, कर्मचारी, सभासद व ग्राहक यांच्या सहकार्यानेच बँकेस हा पुरस्कार मिळाला आहे.

# सोलापूरकरांचे मराठी, कन्नडवर प्रेम

## गडीनाड कन्नड संमेलनाचे अध्यक्ष डॉ. गुरुलिंगप्पा धबाले यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर वसलेल्या सोलापूरकरांचे कन्नड साहित्यात भरीव योगदान राहिले आहे. मराठी सोलापूरकर कन्नड भाषेवर आणि कानडी माणूस मराठी भाषेवर प्रेम करतो, ही आनंदाची बाब आहे, असे प्रतिपादन गडीनाड कन्नड संमेलनाचे अध्यक्ष डॉ. गुरुलिंगप्पा धबाले यांनी केले.

कर्नाटक सीमा क्षेत्र विकास प्राधिकरण बेंगलोर आणि न्यासा मानव विकास संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या गडीनाड कन्नड सांस्कृतिक संमेलनात ते बोलत होते. सकाळी शोभायात्रा काढण्यात



आली. शोभायात्रेत शंकरलिंग महिला मंडळाने सादर केलेल्या बसव वचनांवर आधारित लेझीम खेळाने उपस्थितांची मने जिंकली. उद्घाटन प. पू. कोरणेश्वर महास्वामी यांनी केले. याप्रसंगी बी. आर. पोलीस पाटील, डॉ. राजशेखर मठपती, कर्नाटक साहित्य अॅकडमीचे सिद्राम होनकल, चंद्रकला बिद्री, डॉ. सूर्यकांत पाटील, डॉ. बी. बी. पुजारी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कर्नाटक गडी प्रदेश अभिवृद्धी प्राधिकरणाचे अध्यक्ष सोमण्णा बेविनमरद, प्रकाश मत्तीहळ्ळी होते. स्वरयोगिनी साधना योगलक्ष्मी यांचे वचन अनुभुती कार्यक्रम झाला. अनिता काराजेनगी, डॉ. गुरुसिद्धय्या स्वामी, डॉ. शिवानंद तडवळ, डॉ. सुजाता शास्त्री यांनी मनोगत व्यक्त केले.

बहुभाषिक कवीगोष्टी आणि शंकरलिंग महिला मंडळ यांनी अमर ज्योती अक्कमहादेवी नाटक सादर के. सूत्रसंचालन रेणुका बागलकोटी, शिवानंद गोगांव यांनी केले तर आभार प्रा. रवीकुमार सोलापुरे यांनी मानले. कार्यक्रमाचे व्यवस्थापन जटायु अक्षरसेवाने केले.

### मंगळवेढा पोलीस ठाण्यातील दोन अधिकाऱ्यांच्या बदल्या

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १३ फेब्रुवारी-**

मंगळवेढा पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या दोन पोलीस अधिकार्यांची अन्यत्र बदली झाली असून बदलीचा आदेश पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून नुकताच मंगळवेढा पोलीस प्रशासनास प्राप्त झाला असल्याची माहिती पोलीस सुत्रांकडून देण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश वाघमोडे यांची बदली अकलूज येथे झाली असून त्यांच्या जागी सहाय्यक पोलीस निरीक्षक गिरीश जोग हे मंगळवेढा येथे बदलून नव्याने येत आहेत. तर पोलीस उपनिरीक्षक पुरुषोत्तम धापटे यांची बदली टेंभूर्णी येथे झाली आहे. अद्यापही त्यांना कार्यमुक्त करण्यात आले नाही. या बदल्या प्रशासकीय असून दोन वर्षाचा कालावधी पुर्ण झाल्याने या बदल्या करण्यात आल्या असल्याचे सांगण्यात आले.

## संक्षिप्त वृत्त



### किणी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये भरला बालआनंद मेळावा

**अक्कलकोट, दि.१३ फेब्रुवारी-**

तालुक्यातील किणी येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी बाल आनंद मेळावा भरुन आठवडा बाजार दिवशी विद्यार्थीच बनले चक्क व्यापारी. आपल्या शेतातून आणलेल्या विविध प्रकारच्या भाजीपाला व फळभाज्या, गावरान भाज्या, खाद्य पदार्थ, भेळ, पाणीपुरी, बनाना चिप्स, पँटीस, फ्रेश सेंद्रिय भाजीपाला, शेंगा लाडू, भजी, सँलड, समोसे, बासुंदी, पोहे, चिक्की, लिंबू शरबत, सुशिला, पाव भाजी, पुरी भाजी, कोबी मंच्युरियन, दाल चावल, उसळ, मसाला भात, पेढे, पापडी, फ्रेश ऊसाचे रस, इडली, नुडल्स, पास्ता, आलू पराठे, डहाळे हे विक्रीसाठी ठेवले होते. क्युआर कोडचा वापर करून ऑनलाईन व्यवहार व रोख व्यवहार करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात व्यवहार ज्ञान शिकले.



### अणदूरमध्ये सायबर गुन्हेगारी, दक्षता, उपाययोजनेवर कार्यशाळा उत्साहात

**अणदूर, दि. १३ फेब्रुवारी-**

जवाहर महाविद्यालयात स्व. शांताकाकी आलुरे महिला सक्षमीकरण कक्ष व इंग्रजी विभागाच्या वतीने ग्रामीण विद्यार्थी व महिलासाठी सायबर गुन्हेगारी, दक्षता आणि उपाययोजना विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. उद्घाटन आनंद कागुंणे यांनी केले. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव रामचंद्र आलुरे होते. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना अविनाश पाटील व त्यांच्या टीमने उत्तर दिले. ललिता हिप्परगे, मीरा घुगे, सुजाता पवार, अर्चना कांबळे, सुवर्णा झंगे, सना शेख, उषा जाधव, सम्यका मुखे यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक कार्यशाळा समन्वयक प्रा. डॉ. अनिता मुदकण्णा यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. विवेकानंद वाहुळे यांनी केले. आभार फौजिया टिनवाले हिने मानले. प्रा. डॉ. मानसी स्वामी यांनी कार्यक्रम नियोजनात सक्रीय सहभाग घेतला. प्रा. डॉ. प्रसन्न कंदले यांनी फलकलेखन केले. कार्यक्रमासाठी डॉ. ज्योती हत्तरगे, सोनाली जाधव, प्राजक्ता सदाफुले, सानिका स्वामी, सोनाली आलुरे, संतोष चौधरी, दिलीप चव्हाण, शुभांगी स्वामी, गणेश सर्जे, सुमित चौधरी, अमित आलुरे, विजय बसवंतबागडे, नामदेव काळे, महादेव काकडे यांनी परिश्रम घेतले.



### बांगलादेशी घुसखोर शोधमोहीम राबविण्याची मागणी

**सांगोला, दि. १३ फेब्रुवारी-**

राज्यभरात बांगलादेशी घुसखोरांचा अक्षरश: सुळसुळाट झाला आहे. यातून राज्याच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला असून सामाजिक अस्थिरता, गुन्हेगारी वाढ, रोजगाराची समस्या निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राची पश्चिम बंगाल, आसाम सारखी स्थिती होण्याआधी मुख्यमंत्र्यांनी राज्यभरात बांगलादेशी घुसखोर शोध मोहिम राबवून सर्व बांगलादेशी घुसखोरांना शोधून काढावे, तसेच या घुसखोरांना साहाय्य करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी सांगोला येथे हिंदू जनजागृती समितीच्या वतीने तहसीलदार संतोष कणसे यांच्याकडे मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तसेच जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या नावे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी हिंदू जनजागृती समितीच्या वतीने डॉ.मानस कमलापूरकर, विकास गावडे, रुद्रेश स्वामी, श्रेयस तोडकरी, भीमाराम चौधरी, निरंजन नवाळे, बिराजी आगलावे, गोपाळ माने, महेश गुरव, नामदेव पवार, प्रशांत राजमाने, राजू सुतार, संतोष पाटणे, प्रवीण जानकर उपस्थित होते.



### अकोले खुर्दमध्ये सर्व्हिकल कॅन्सरवर प्रबोधन

**टेंभुर्णी, दि. १३ फेब्रुवारी**

श्री गणपती इन्स्टिटयूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च, अकोले (खु) टेंभुर्णी महाविद्यालयामध्ये जागतिक कॅन्सर दिनानिमित्त जयश्री नर्सिंग होम टेंभुर्णी येथील डॉ. मदन कांबळे यांचे व्याख्यान पार पडले. डॉ. मदन कांबळे यांनी सर्व्हिकल कॅन्सर अगदी सध्या सोप्या भाषेत समजावून सांगितला. याप्रसंगी प्राचार्या डॉ. रुपाली बेंदगुडे व संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. रवींद्र बेंदगुडे यांनी सर्व विद्यार्थ्यांना या रोगाबद्दल तसेच कमी वयात लस घेण्याबद्दल आवाहन केले. यावेळी संस्था अध्यक्ष अॅड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे उपस्थित होते. कार्यक्रम समन्वयक म्हणून ट्रेनिंग प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा. नामदेव शिंदे यांनी काम पाहिले.

## वखारिया विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत १४ विद्यार्थी पात्र

**बार्शी, दि. १३ फेब्रुवारी-**



श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयाचे चौदा विद्यार्थी या वर्षी घेण्यात आलेल्या एन.एम.एम.एस. शिष्यवृती परीक्षेत पात्र झाले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांचा वैभवी ठोंगे, वैष्णवी ढावारे, श्रध्दा कसबे, दिपाली बुरगुटे, अक्षरा शिरगिरे, प्रमिला गलांडे, अर्पिता तांबारे, आसावरी काळे, अतिथी उपळेकर, साईराज बुरगुटे, करण माळी, निर्भय तंडे, आर्यन बुरगुटे, अलीम सय्यद आणि मार्गदर्शक शिक्षक अनिल वैद्य, मकरंद जगदाळे, महाले, विलास शिंदे, तवले, रोहिणी डोईफोडे-बुरगुटे यांचा मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांनी गुलाब पुष्प देऊन सत्कार केला.

## यशवंत रत्ने...

### सोनाली लोमटेची रेव्हेन्यू असिस्टंट क्लार्कपदी नियुक्ती

**बार्शी, दि. १३ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा निकाल जाहीर झाला. यामध्ये शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयातील सोनाली चर्तृभूज लोमटे हिने यश संपादन केले. तिची रेव्हेन्यू असिस्टंट क्लार्क म्हणून निवड झाली आहे. तसेच शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाच्या इतिहासात मुलीम धून पहिली अधिकारी होण्याचा मान तिने प्राप्त केला आणि अध्यापक विद्यालयाची यशस्वी परंपरा कायम ठेवली आहे. अध्यापक विद्यालयामध्ये सातत्याने स्पर्धा परीक्षा याविषयीचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले जाते. विविध तज्ञांची तसेच स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या अधिकाऱ्यांची मार्गदर्शनपर व्याख्याने अध्यापक विद्यालयात आयोजित केली जातात. त्याचबरोबर अध्यापक विद्यालयाने आय.ए.एस. श्री. रमेश घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली देखील स्पर्धा परीक्षा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचाही फायदा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना झाल्याचे दिसून येते. आजपर्यंत अध्यापक विद्यालयाचे जवळपास ७० पेक्षा जास्त माजी विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत यशस्वी झाले आहेत. लोमटे ही देखील या विद्यालयाची २०१५-१७ या बॅचची विद्यार्थीनी आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, खजिनदार जे. सी. शितोळे, सहसचिव ए. पी. देबडवार, शालेय समितीचे चेअरमन डॉ.जी. एम. पाटील व सर्व सदस्य व प्राचार्य डॉ. दीपक गुंड सर व सर्व स्टाफ यांनी हार्दिक अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.



### माढ्याच्या आरती राऊत यांची महसूल सहाय्यकपदावर निवड

**माढा, दि. १३ फेब्रुवारी-**

माढ्यातील आरती राजेंद्र राऊत हिची महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्तुंग यश मिळवत महसूल सहाय्यक या पदावर ती तिची निवड झाली. २०२३ साली झालेल्या चझडउ परीक्षेचा निकाल न्यायालयीन प्रक्रियेनंतर मोठ्या विलंबाने बुधवार १२ फेब्रुवारी रोजी लागला आहे. यामध्ये तिने हे यश संपादन केले आहे. तिचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद मुलींची शाळा माढा माध्यमिक शिक्षण सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशाला,माढा,तर उच्च शिक्षण सिंहगड कॉलेज पुणे येथे झाले आहे. आरती ही माढा येथील चार्टर्ड अकाऊंटंट ज्योती राऊत, दुय्यम निबंधक सागर राऊत यांची बहीण तर सरपंच दाम्पत्य राजेंद्र राऊत आणि सुनीता राऊत यांची सुकन्या आहे. सर्वसामान्य कुटुंबातील राऊत दांपत्याचे मुली व मुलाने अथक परिश्रम करून आई वडिलांच्या कष्टाचे पारने फेडल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. तसेच आरतीच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात येत आहेत. आपली तिन्ही मुले स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून यशस्वी झाली. केलेल्या कष्टाचे चीज झाले. आरतीने आणखी परीक्षा दिल्या आहेत. लवकरच आणखी चांगली पोस्ट मिळेल अशी आम्हाला आशा आहे, असे माजी सरपंच राजेंद्र राऊत यांनी सांगितले.



### पुनवरच्या निलेश धुमाळची महसूल सहायकपदी निवड

**करमाळा, दि. १३ फेब्रुवारी-**

करमाळा तालुक्यातील पुनवर येथील शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या निलेश भारत धुमाळ याने महसूल सहायक अधिकारी होण्याचा मान मिळवला आहे. त्याचे शालेय शिक्षण जिल्हा परिषद शाळा पुनवर, माध्यमिक शिक्षण लोणी मसदपूर, उच्च माध्यमिक शिक्षण इंदापूर येथे करून बी. एससी (अॅग्री) कडेगाव सांगली येथे पूर्ण केले आहे. त्यानंतर त्याने एम. एस्सी अॅग्री कोल्हापूर येथे पूर्ण केली. पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करत असतानाच त्याने स्पर्धा परीक्षा देण्याचा निर्णय घेतला. २०१६ ते २०२५ या नऊ वर्षांच्या कालावधीत काही काळ राहुरी विद्यापीठात राहून अभ्यास सुरू केला. परंतु सतत दोन-चार गुणांसाठी अपयश येत होते. तरीही माघार न घेता व निराश न होता सातत्याने नव्याने परीक्षेची तयारी चालू ठेवली. त्यानंतर २०२४ मध्ये पणन विभाग, महाराष्ट्र शासन, पुणे येथे सहाय्यक म्हणून काम केले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगांतर्गत झालेल्या परीक्षेत त्याला यश मिळाले.



### शेलगाव क येथील तन्मय काटुळे कर सहाय्यक परीक्षेत राज्यात प्रथम

**करमाळा, दि. १३ फेब्रुवारी-**

शेलगाव क (ता. करमाळा) येथील तन्मय तानाजी काटुळे याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या कर सहाय्यक (टॅक्स असिस्टंट) परीक्षेत ३०२ गुण प्राप्त करून राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तन्मय काटुळे याचे पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण करमाळा येथील नगरपरिषद शाळेत, पाचवी ते दहावी पर्यंतचे शिक्षण हे कर्जत येथील श्री अमरनाथ विद्यालयात तर अकरावी व बारावीचे शिक्षण दादा पाटील महाविद्यालय झाले. त्यानंतर त्याने महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत डॉ. अण्णासाहेब शिंदे कॉलेज ऑफ ग्रीकल्चरल इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी राहुरी येथे एग्रीकल्चरल इंजीनियरिंग (सीळश्र.एपसस) ही पदवी प्राप्त केली.



# पर्यटनामध्ये सेवामूल्य सुसंगत असावे

## अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ फेब्रुवारी-**

पर्यटनामध्ये सेवा आणि मूल्य सुसंगत असले पाहिजे. यामुळे पर्यटकांना आनंद मिळून पर्यटन केंदाला उत्पन्न मिळण्यास मदत होते, असे प्रतिपादन अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांनी केले.

पर्यटन संचलनालय, पुणे, असेन्सिव्ह एज्युकेअर लि. (राष्ट्रीय कौशल्य विकास यंत्रणा) यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचणी ग्रामीण कृषी पर्यटन केंद्र येथे मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी निवासी जिल्हाधिकारी मनिषा कुंभार, उपजिल्हाधिकारी अंजली मरोड यांच्या प्रशिणार्थी उपस्थित होते.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर म्हणाल्या, कृषी पर्यटन ही एक उद्योन्मुख आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारी संकल्पना आहे. कृषी पर्यटनामुळे नवीन अर्थजनाच्या संधी निर्माण होत आहेत. ग्रामीण व शहरी संस्कृतीचा संगम कृषी पर्यटनाच्या माध्यमातून होत आहे. गावाला व शेतीला नवी ओळख



करून देणारी संकल्पना म्हणून कृषी पर्यटन राज्यासह देशात विस्तारत आहे. तसेच चिंचणी ग्रामीण कृषी पर्यटन केंद्र चालवत असताना यापूर्वी प्रशिक्षण न घेता ही चिंचणी येथील कृषी पर्यटन केंद्र अतिशय उत्तम चालवून एक आदर्श निर्माण केला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी निवासी जिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. चिंचणी ग्रामीण कृषी पर्यटन महिला व पुरुषांना प्रशिक्षित करणे आवश्यक असल्यामुळे हा कार्यक्रम व्हिसा यांनी आयोजित केला आहे. या प्रशिक्षणामध्ये ४० प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला असून हे प्रशिक्षण शनिवार दि.१५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सुरु राहणार आहे. सदर प्रशिक्षण पर्यटन आणि आदरातिथ्य कौशल्य या आदीबाबतचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.यामधून पर्यटकांसोबत संवाद,आदरातिथ्य, स्वागत, काळजी घेणे आदीबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे.

**पाच दिवस मिळणार प्रशिक्षण**

प्रशिक्षण देण्यासाठी जनरल मॅनेजर सूर्या मुखर्जी व सत्यजित हे वरीष्ठ प्रशिक्षक पाच दिवस प्रशिक्षण देणार असून पाचव्या दिवशी परीक्षा घेवून प्रशिक्षणात सहभाग घेतलेल्यांना प्रशस्तीपत्र दिले जाणार आहे.

## माळशिरस तालुक्यामध्ये अंगणवाडी सेविका, मदतनीसांसाठी आतापर्यंत ८८ अर्ज दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. १३ फेब्रुवारी-**

एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प माळशिरस (ग्रामीण) व प्रकल्प अकलूज (ग्रामीण) मधील अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस भरतीसाठी ५ फेब्रुवारीपासून अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली असून या भरतीसाठी महिलावर्गातून अर्ज दाखल करण्यासाठी गर्दी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. आतापर्यंत ८८ अर्ज दाखल झाले आहेत.

एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प माळशिरस (ग्रामीण)मध्ये धर्मपुरी १ व काळमवाडी (अवताडेवस्ती) या दोन ठिकाणी अंगणवाडी सेविकाचे पद रिक्त आहे. तसेच गोरडवाडी (कर्णवरवस्ती), गोरडवाडी (नरळेवस्ती), गोरडवाडी (गोरडवाडी ३), बोंडले (जाधववस्ती), खळवे (चोपडेवस्ती), धानोरे (देवकातेवस्ती), धानोरे (भुसारेवस्ती), साळमुख (साळमुख चौक), निमगाव



(मदनेवस्ती), डोंबाळवाडी(खु) (शिंदेवस्ती), डोंबाळवाडी (खु) (डोंबाळवाडी २), फोंडशिरस (गोपाळमळा), मारकडवाडी (खडकवस्ती), कदमवाडी (भोसलेवस्ती), मांडवे (मांडवे ३), कोळेगाव (शिंदेवस्ती), नातेपुते (नातेपुते ३), नातेपुते (उमाजीनाईक नगर), एकाशिव (बागानवर मळा) या १९ ठिकाणी मदतनीस पद रिक्त आहेत.

एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प अकलूज (ग्रामीण) मध्ये तांबवे (तांबवे २), कोंडारपट्टा (कोंडारपट्टा २), या दोन ठिकाणी अंगणवाडी सेविकाचे पद रिक्त आहेत. तसेच प्रतापनगर (विठोबा पाटीलवस्ती), अकलूज (सांगोला नाका), अकलूज (माळेवाडी १), माळीनगर (चरवस्ती), मिरे (बाबर वस्ती), सवतगव्हाण (सवतगव्हाण १), चौंडेश्वरवाडी (चौंडेश्वरवाडी), चौंडेश्वरवाडी (उदयनगर २), लवंग (लवंग २), या ९ ठिकाणी मदतनीस पद रिक्त आहेत. अशा तालुक्यातील ४ अंगणवाडी सेविका तर २८ मदतनीसपदांसाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली असून १८ फेब्रुवारी सायंकाळी सव्वासहा वाजेपर्यंत सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प माळशिरस (ग्रामीण )पंचायत समिती माळशिरस येथे स्वीकारण्यात येणार असल्याची माहिती माळशिरस बाल विकास प्रकल्प अधिकारी आस्मा आतार यांनी दिली. एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प माळशिरस (ग्रामीण) आजअखेर ५८ अर्ज तर एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प अकलूज (ग्रामीण) ३० अर्ज दाखल झाले आहेत.



## विठ्ठल-रूक्मिणी मातेचरणी सोन्याचा हार, ठुशी, चांदीची नाणी अर्पण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ फेब्रुवारी-**

श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर समितीस पुष्पा नाथा शिंदे या भाविकाने सोन्याचा हार व ठुशी तसेच मोरया कन्स्ट्रक्शन आणि डेव्हलपर्स, पुणे यांनी चांदीची नाणी अर्पण केल्याची माहिती मंदिरे समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

पुष्पा नाथा शिंदे ह्या छत्रपती संभाजी नगर येथील रहिवाशी असून, त्यांनी ६.९ ग्रॅम वजनाचा सोन्याचा तीन पदरी हार व ठुशी चरणी अर्पण केली असून, त्याची अंदाजे किंमत ५० हजार आहे. त्यांचा विभाग प्रमुख विनोद पाटील यांनी सत्कार केला. मोरया कन्स्ट्रक्शन आणि डेव्हलपर्स, पुणे यांनी ११०० ग्रॅम वजनाचे गणपतीची प्रतिमा असलेली चांदीची ११ नाणी अर्पण केली असून, त्याची अंदाजे किंमत १ लक्ष होत आहे. यामुळे रमेश येवले यांचा विभाग प्रमुख राजेंद्र घागरे यांनी सत्कार केला. यावेळी देणगीदारांचे कुटुंबीब व भाविक उपस्थित होते.

## सांगोल्यात बेसिक लाईफ सपोर्टवर प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ फेब्रुवारी-**

डॉ.यशोदीप बाबुराव गायकवाड यांनी सांगोल्यातील शिवाजी पॉलीटेक्निक कॉलेजचे ८०० विद्यार्थी, सांगोला महाविद्यालयाचे २०० विद्यार्थी तसेच गायत्री मॉलचे ४० कर्मचारी आणि हॉटेल जयनिलाचे २५ कर्मचारी यांना बेसिक लाईफ सपोर्ट बद्दलचे प्रशिक्षण दिले. तसेच मार्गदर्शनपर व्याख्यानात सीपीआर कसा द्यावा याचे प्रशिक्षण करून दाखविले.




> कोविड कालावधीपासून हृदयविकाराच्या झटक्याची प्रकरणे वाढली आहेत. बरेच व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल आहेत, ज्यात लोक नृत्य, खेळणे, धावणे इ.गोष्टी करीत असताना हृदयविकाराचा झटका येऊ शकतो, अशावेळी आसपासच्या लोकांना सीपीआरचे ज्ञान असणे खूप महत्वाचे आहे जेणेकरून रुग्णाचे आयुष्य वाचू शकेल. सीपीआर प्रासंगिक वेळेत जीवन वाचावित असल्याचे सिद्ध झाले आहे.
>
> **- डॉ. यशोदीप गायकवाड**

यावेळी उपस्थित श्रोत्यांच्या शंकांचे निरसन अतिशय सोप्या पद्धतीने केले. डॉ. यशोदीप गायकवाड यांनी मार्गदर्शन करताना वैद्यकीय आणीबाणीच्या परिस्थितीत, जलद आणि निर्णायक कृती जीवन आणि मृत्यूमध्ये फरक करू शकते. बेसिक लाइफ सपोर्ट (इङड) म्हणजे हृदयविकाराचा झटका, श्वसनाचा त्रास, गुदमरणे किंवा बुडणे अशा व्यक्तींना त्वरित दिल्या जाणाऱ्या प्राथमिक मदतीमुळे प्रगत वैद्यकीय सेवा मिळेपर्यंत शरीरात ऑक्सिजनयुक्त रक्त फिरत राहील याची खात्री होते. हे आवश्यक प्रशिक्षण केवळ आरोग्यसेवा व्यावसायिकांसाठी नाही तर आपत्कालीन परिस्थिती पाहणाऱ्या प्रत्येकासाठी असते. तसेच हृदयविकाराच्या झटक्यात, प्रत्येक सेकंद महत्त्वाचा असतो. तात्काळ सीपीआर केल्याने जगण्याची शक्यता वाढते असे सांगितले.



## ४८ वर्षांनंतर वर्गमित्र एकमेकांना भेटले

### भंडारकवठेतील जीवन विकास प्रशालेत दहावीच्या वर्गमित्रांचा स्नेहमेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ फेब्रुवारी-**

भंडारकवठे येथील जीवन विकास प्रशालेतील सन १९७७-७८ दहावी ग्रुप माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा मोठ्या दिमाखात पार पडला. प्रारंभी संस्थेचे संस्थापक दी. शि. कमळे यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.प्रास्ताविक भीमाशंकर होमकर यांनी केले.

यावेळी माजी प्राचार्य बी. ए. जमादार. एम. डी. कमळे, बसवराज हाडसंगे, जीवराज टाकळीकर. पुंडलिक म्हमाणे, मल्लिकार्जुन डफळे, लक्ष्मणतात्या बिराजदार, संगप्पा भरले, प्राचार्य मलकारी या गुरुवर्यांचा मानाचा फेटा, शाल व पुष्पहार घालून स्वागत करुन सत्कार करण्यात आला. उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी शाळेतील जुन्या आठवणींना उज्जळा देत आपल्या यशस्वी जीवनाचे रहस्य कथन केले. यावेळी श्रीशैल कासे, प्रकाश जोशी, अंबादास चिंचोळे, श्रीशैल शेंडगे, विठ्ठल पाटील, महादेव बगले, शिवाजी वाघमारे, भीमाशंकर बिराजदार, गंगाधर हाडसंगे, शांतप्पा अरकेरी, संभाजी पाटील, बसू घोडके, कल्लप्पा बंदीछोडे, इरप्पा कोरे, कट्टय्प्पा कांबळे, हणमंत बिराजदार, बाळू माढे असे २४ माजी विद्यार्थी तब्बल ४८ वर्षानंतर एकत्रित येऊन हा स्नेहमेळावा यशस्वी केला.

## स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजनेच्या कामाचे सोमवारी भूमिपूजन

### माजी आ. शहाजीबापू पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ फेब्रुवारी-**

सांगोला तालुक्यातील शेतीच्या पाण्यापासून वंचित असणाऱ्या सुमारे २२ गावांसाठी वरदायिनी असणारी व गेली २५ वर्षे मंजुरीच्या प्रतिक्षेत असणारी स्व.बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना म्हणजे पूर्वीची उजनी उपसा सिंचन योजना या योजनेच्या पहिल्या टप्प्यातील ३०० कोटी रुपयांच्या कामाचा भूमिपूजन व शुभारंभ जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या हस्ते व पर्यटन मंत्रीशंभूराज देसाई, पालकमंत्री जयकुमार गोरे व माजी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या उपस्थितीत सोमवारी १७ फेब्रुवारी रोजी दु.२.३० वा. चिकमहूद येथे होणार आहे.



कार्यक्रम स्थळी शेतकरी मेळावा आयोजित केल्याची माहिती माजी आ. शहाजीबापू पाटील यांनी दिली. एकूण ८८४ कोटी रुपये खर्चाच्या या योजनेतील पहिल्या टप्प्यातील कामांची निविदा विधानसभा निवडणुकीपूर्वीच प्रसिद्ध होऊन निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कामाचे आदेश देण्यात आले होते. परंतु निवडणूक आचारसंहिता व मंत्रिमंडळ निवड यामुळे या कामाचे भूमिपूजन लांबले होते. माजी आ. शहाजीबापू पाटील यांनी काही दिवसांपूर्वीराधाकृष्ण विखे-पाटील, शंभूराज देसाई, जयकुमार गोरे यांची भेट घेऊन या योजनेच्या कामाचा शुभारंभ करण्याची मागणी मुंबई येथे केली होती. सर्व मान्यवरांनी सोमवारी १७ फेब्रुवारी रोजी या योजनेच्या भूमिपूजन व शुभारंभ कार्यक्रमाला वेळ दिली असून सर्व मान्यवर हेलिकॉप्टरने महूद येथे येणार असल्याचे माजी आ. शहाजीबापू पाटील यांना कळविले आहे.

**८८३ कोटींच्या कामला मंजुरी :** सन २०१९ साली आमदार झाल्यानंतर शहाजीबापू पाटील यांना या योजनेच्या मंजुरीसाठी प्रयत्न सुरू केला. त्यांनी या योजनेचे स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना सांगोला असे नामकरण शासनाकडून मंजूर करून घेतले. नव्याने १० गावांचा या योजनेमध्ये समावेश करून एकूण प्रत्यक्ष अप्रत्यक्ष २२ गावांना या योजनेच्या दोन टीएमसी पाण्याचा फायदा शेतकऱ्यांना होण्यासाठी सुधारित अंदाजपत्रक तयार करून २७ फेब्रुवारी २०२४ रोजी ८८३.७४ कोटी रुपयांच्या कामाला मंत्रिमंडळ बैठकीमध्ये सुधारित प्रशासकीय मान्यता मंजूर करण्यास आ. शहाजीबापू पाटील यांनी यश मिळवले.

## सांगोला लायन्सतर्फे आज हृदयरोग तपासणी शिबीर

**सांगोला, दि. १३ फेब्रुवारी-**

सांगोल्यातील लायन्स क्लब, विद्यामंदिर परिवार व हृदयस्पंदन हॉस्पिटल, पंढरपूर यांचे संयुक्त विद्यमाने माजी प्रांतपाल प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी १४ फेब्रुवारी रोजी स.११ ते ४ या वेळेत सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेज येथे हृदयस्पंदन हॉस्पिटल पंढरपूरचे डॉ. बसवराज कुंभार यांच्याकडून फक्त ६०० रुपये रजिस्ट्रेशनमध्ये सीबीसी, रक्त क्रिएटिनिन लेव्हल, शुगर टेस्ट, हृदयाचा ईसीजी रिपोर्ट या तपासण्या व मोफत वैद्यकीय सल्ला दिला जाणार आहे. तसेच गरजेनुसार ५० टक्के सवलतीमध्ये थायरॉईड, कोलेस्टेरॉल, इको, अँजिओग्राफी, टीएमटी टेस्ट केली जाणार आहे. याचा लाभ घ्यावा असे आवाहन विद्यामंदिरचे प्राचार्य अमोल गायकवाड, लायन्स क्लबचे अध्यक्ष उन्मेश आटपाडीकर यांनी केले आहे.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अखिल भारतीय धनगर समाजाच्या जिल्हाध्यक्षपदी प्रताप घोडके

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१३ फेब्रुवारी -**



अखिल भारतीय धनगर समाज महासंघाच्या धाराशिव जिल्हाध्यक्षपदी प्रताप घोडके याची तर जिल्हा कार्याध्यक्षपदी वैजनाथ कागे याची निवड करण्यात आली असून अखिल भारतीय धनगर समाज महासंघ संघटनेचे प्रदेश सरचिटणीस दत्तात्रय गाडेकर यांनी दि.११ फेब्रुवारी रोजी नूतन जिल्हा कार्यकारणी व तालुका कार्यकारणी घोषित केली असून लोहारा येथील प्रताप घोडके यांची जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तर जिल्हा कार्याध्यक्षपदी वैजनाथ कागे, जिल्हा सरचिटणीसपदी रघुवीर घोडके व लोहारा तालुकाध्यक्षपदी बालाजी कोरे, तुळजापूर तालुकाध्यक्षपदी प्रवीण घोडके, उमरगा तालुकाध्यक्षपदी विजयकुमार सोनकटाळे, लोहारा शहराध्यक्षपदी प्रेम लांडगे, लोहारा तालुका उपाध्यक्षपदी श्री सचिन केरुरे यांच्या निवडी घोषित करून सर्वांना नियुक्तीपत्र देण्यात आले व त्यांचा सत्कार करण्यात आला.

## संक्षिप्त वृत्त...



### रा.गे. शिंदे महाविद्यालयात परीक्षा सुरळीत

**परंडा, दि.१३ फेब्रुवारी -**

श्री भवानी शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव संचलित शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा येथे लातूर बोर्डाने आयोजित केलेल्या उच्च माध्यमिक शाळांत परीक्षा दि.११ फेब्रुवारी पासून सुरु झालेल्यल्या आहेत. या केंद्रावर एकूण ५२० विद्यार्थी संख्या असून बोर्डाने दिलेल्या नियमानुसार सूचनांचे काटेकोरपणे पालन करत परीक्षा सुरळीतपणे सुरू आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या परीक्षेचे केंद्र प्रमुख शंकर कुटे हे काम पाहत आहेत. कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. किरण देशमुख, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महेश कुमार माने यांचे या परीक्षेवर नियंत्रण असून काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाकडून पोलीस कर्मचारी नियुक्त करून त्यांचे सहकार्य लाभत आहे.

### येवतीत लक्ष्मण शक्ती सोहळ्याचे आयोजन

**इटकळ, दि.१३ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील येवती येथे रविवार दि.१६ फेब्रुवारी रोजी श्री. लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असुन गाव परिसरातील रामभक्त



भाविकांनी या राम कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन येवती येथील रामभक्त ग्रामस्थांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे. प्रतिवर्षाप्रमाणे या ही वर्षी येवती येथे श्री. लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न होत असुन श्री. संत एकनाथ महाराज लिखित श्री. भावार्थ रामायणाचे हे तिसरे वर्ष आहे. रविवार दि.१६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता ग्रंथ वाचन व निरुपणास सुरुवात होत असून सकाळी ५.३० वाजता श्री लक्ष्मण शक्तीतून सावधान झाल्यानंतर ग्रंथ वाचन निरूपण सांगता होणार आहे. तब्बल बारा तास हा सोहळा होणार असुन श्री. भावार्थ रामायणातील युद्धकांडातील अध्याय क्रमांक ४३ ते ४९ असे सात अध्याय ओव्या ११३५ याचे रात्रभर वाचन व निरूपण होणार आहे. तरी या श्री लक्ष्मण शक्ती मुक्ती सोहळ्यासाठी गाव परिसरातील व तुळजापुर तालुक्यातील सर्व रामभक्तानी उपस्थित राहून राम कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन येवती येथील रामभक्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आलेले आहे.



### रक्तदान शिबिरित २०१ रक्तदात्यांचे रक्तदान

**परंडा, दि.१३ फेब्रुवारी -**

परंडा येथे व्यापारी संतोषभाई शहा यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात परंडा तालुक्यातील ८१ रक्तदात्यानी रक्तदान केले आहे. दि.१० फेब्रुवारी रोजी बार्शी येथे आयोजीत रक्तदान शिबीरात २०१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. परंडा येथील कार्यक्रमासाठी सामनगावचे हभप. रामदास महाराज, हभप. धर्मराज महाराज, धनंजय सावंत, दत्ता साळूंके, माजी नगराध्यक्ष रमेशसिंह परदेशी, डॉ. देवदत्त कूलकर्णी, डॉ. आनंद मोरे, डॉ. ओंकार गायकवाड, परंडा पोलीस ठाण्याचे पो.नी. विनोद ईज्जपवार, बालाजी नेटके, व्यापारी नागेश काशीद, संजय कोळगे, मदनसिंह सद्दीवाल, सत्यजीतसिंह सद्दीवाल, पै. विशाल देवकर, पै. माउली गोडगे, आडस येथील मनोपसिंह बंजारद, सह परंडा शहरातील व तालुक्यातील नागरीक, व्यापारी उपस्थित होते.

# कुलस्वामिनी सूतगिरणीला आग लागून लाखोंचे नुकसान; महिलेचा मृत्यु

**सूतगिरणीला लागलेली आग महत्वाचे कागदपत्रे जाळण्यासाठी असल्याची शहरात चर्चा... घाबरलेल्या महिलेचा पाय घसरून मृत्यू...**





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ फेब्रुवारी -**

शहरापासून चार-पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या हंगरगा पाटी येथील कुलस्वामिनी सहकारी सूतगिरणीला दि.१३ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास मिशनरी जाम होऊन लागलेल्या आगीत मिलच्या मिशनरी साहित्य आणि कच्चा मालाचे लाखो रुपयाची नुकसान झाले ही आग एवढी भीषण होती की सुतमिलचे ३० ४० कर्मचारी मिळून आग विझवण्याचा प्रयत्न करत होती पण अवतीभवती असणारा कचरा आणि झाडीमुळे ही आग भडकत गेली.

सूतगिरणी गोडाऊनला चिटकून असलेल्या वस्तीत ही आग बघून रहिवासी असलेल्या लोकांची पळापळ चालू झाली. वस्तीत राहणारी लक्ष्मी अजय कोंडरु (वय १९) ही महिला आगीमुळे गॅस बंद करण्यासाठी केली असता पाय घसरून पडली आणि डोक्याला जबर मार लागून चक्कर येऊन पडली घाबरलेल्या अवस्थेत असणाऱ्या रहिवाशांनी त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सुतमिलला लागलेल्या आगीमुळे झालेल्या पळापळीमध्ये सदर महिलेचा जीव गेला असा आरोप महिलेचे सासरे नागप्पा कोंडरू, पती अजय कोंडरू, नातेवाईक लक्ष्मण विभुते, महादेव नगर वस्तीचे अध्यक्ष तानाजी विभुते आणि बसवराज विभुते यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना केले. तुळजापूर नळदुर्ग आणि तामलवाडी येथील अग्निशामक दलाच्या गाड्या बोलवण्यात आल्या अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नानंतर ही आग आटोक्यात आली पण तोपर्यंत सुत मिलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.क्षणार्धात आगीच्या ज्वाळांनी उग्र रुप धारण केले यात लाखो रुपयांचे नुकसान झाले, आग लागल्याची माहीती मिळताच अग्निशामक दलाच्या जवानांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन शर्थीचे प्रयत्न करुन रौद्र रूप धारण केलेल्या आगीवर नियंत्रण मिळवले.

सदर सूतगिरणी ही बंद अवस्थेत अखेरच्या घटका मोजत आहे ही सूतगिरणी मध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार करुन सूतगिरणी बंद पाडली. गेली अनेक वर्षे सदर सूतगिरणी बंद असुन स्थानीकांच्या म्हणण्यानुसार गत अनेक वर्षे आतील यंत्रसामुग्री हळूहळू गायब केल्या जात होत्या बंद पडलेल्या मिलमधील यंत्रसामुग्रीही गायब करुन त्याचाही तगडा भ्रष्टाचार गत अनेक वर्षे बिनबोभाट सुरू होता. स

दर आग ही महत्वाची कागदपत्रे किंवा चोरुन विकलेल्या यंत्रसामूग्रीचा हिशोब लावण्यासाठी कुणीतरी मुद्दामहून लावली अशी चर्चा घटनास्थळी जमलेल्या नागरिकांमधून होत होती.

## दिवसा घरफोडी करणारा आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ फेब्रुवारी -**

येरमाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वडगाव येथे घडलेल्या घरफोडी प्रकरणातील आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे.

दि.७ फेब्रुवारी रोजी रामभाऊ गहिनीनाथ नवले हे शेतात दैनंदिन कामासाठी गेले असता अज्ञात व्यक्तीने त्यांच्या घराचे लोखंडी कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला.

घरातील कपाटातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम मिळून एकूण १५ लाख ७९ हजार ६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरून




नेण्यात आला. या घटनेनंतर येरमाळा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपास करून संशयित आरोपीचे नाव शोधून काढले. तपासानंतर सुरज दादासाहेब शिनगारे (रा. शेलगाव, ता. कळंब, जि. धाराशिव) याने हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले.

पथकाने अत्यंत शिताफीने आरोपीचा शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले. चौकशीत सुरुवातीला आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली.

मात्र, अधिक तपास केल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली आणि चोरी केलेल्या मुद्देमालाबाबत संपूर्ण माहिती दिली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १८ तोळे सोन्याचे दागिने, रोख ४०,००० रुपये आणि गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण १५,०९,६०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला. पुढील कारवाईसाठी आरोपीला येरमाळा पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

## डॉ. जयश्री घोडके जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१३ फेब्रुवारी -**

नळदुर्ग येथील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील हिंदी विषयाच्या शिक्षिका डॉ. जयश्री घोडके यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबद्दल त्यांचे सर्वस्तरातुन कौतुक होत आहे.

काव्यमित्र संस्था पुणे व अपेक्षा मासिक परीवार पुणे यांच्या रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण निम्मित सदाशिव पेठ पुणे येथे आयोजित कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ट साहित्यिका व उद्योजिका चंद्रकला बेलसरे या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणुन सुरेश कोते, राजेंद्र बांदल, राजेंद्र सगर, दत्तात्रय उमे हे उपस्थित होते. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, सचिव उल्हास बोरगांवकर यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, कार्यालयीन अधिक्षक धनंजय पाटील, पर्यवेक्षक प्रा. मोतीराम पवार, महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१३ फेब्रुवारी -**

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त, जि.प. शाळा स्तरावर शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन पर्याय सामाजिक संस्थेने केले आहे. धाराशिव जिल्ह्यामध्ये पर्याय सामाजिक संस्थेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात.

त्याचाच एक भाग म्हणून, संस्थे चे प्रमुख आणी कार्यवाह जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते विश्वनाथ तोडकर यांच्या एकसष्टी निमित्त आणि रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त कळंब आणि वाशी तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी दोन गटांमध्ये स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.


पहिला गट इयत्ता पाचवी ते सातवी, दुसरा गट इयत्ता आठवी ते दहावी असा असणार आहे. निबंध स्पर्धेचा विषय:- रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज. दि.५ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी दरम्यान वरील विषयावर निबंध स्पर्धा आयोजित केली असून उत्कृष्ट निबंध लिखाण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रथम, द्वितीय, तृतीय असे पारितोषक आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

तरी अधिकच्या माहितीसाठी पर्याय संस्थेचे कार्यक्रम समन्वयक आश्रुबा गायकवाड मोबाईल नंबर ९४२२१०६५०० यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## श्री सिध्दीविनायक परिवारातील कारखान्यांच्या हंगामाची सांगता

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्ह्यातील श्री सिध्दीविनायक परिवार ही विविध क्षेत्रांत विश्वासार्ह सेवा देणारी अग्रगण्य संस्था आहे. संस्थेच्या माध्यमातून जिल्ह्यात सध्या दोन ऊस कारखाने अत्यंत यशस्वी आणि सुव्यवस्थित पद्धतीने कार्यरत आहेत.




२०२४-२५ च्या गळीत हंगामाचा सांगता समारंभ श्री सिध्दीविनायक परिवाराचे संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या हंगामात कारखान्याने एकूण १ लाख ५७ हजार मेट्रिक टन ऊसाचे यशस्वी गाळप केले. शेतकऱ्यांच्या विश्वासास पात्र राहण्याच्या वचनानुसार, जानेवारी महिन्यापर्यंतच्या उसाचे बिल शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले आहे. श्री सिध्दीविनायक परिवार शेतकरी हितासाठी नेहमीच प्रयत्नशील राहणार असून, भविष्यातील हंगाम अधिक सुव्यवस्थित आणि शेतकरी हितकारी करण्यासाठी कटिबद्ध आहे.

सदरील कार्यक्रमास व्यंकटेश कोरे, दिनेश कुलकर्णी, गणेश कामटे, राजकुमार जाधव, अरविंद गोरे, रामचंद्र सारडे, धनंजय गुंड, मंगेश कुलकर्णी, हेमंत कुलकर्णी, बालाजी जमाले, अभयसिंह शिंदे, प्रदीप धोंगडे तसेच कारखान्यातील अधिकारी, कर्मचारी, उस उत्पादक शेतकरी, वाहतूक ठेकेदार, वाहन मालक उपस्थित होते.

## शिवजयंतीनिमीत येरमाळ्यात रंगणार कबड्डीचा थरार

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१३ फेब्रुवारी -**

कळंब तालुक्यातील येरमाळा येथे शिवजयंती निमित्त येडेश्वरी स्पोर्ट्स क्लबच्या विद्यमाने दि.१५ रोजी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त ज्ञानोद्योग विद्यालयाच्या प्रांगणात होणाऱ्या या कबड्डी स्पर्धेमध्ये भरघोस बक्षिसे ठेवलेली आहेत. त्यामध्ये प्रथम पारितोषिक कळंब पं.स.चे माजी सभापती विकास बारकुल यांच्या वतीने २१ हजार रूपये रोख व ट्रॉफी, व्दितीय क्रमांकासाठी लहुजी शक्ती सेनेचे सागर कसबे यांच्या वतीने १५ हजार रुपये व ट्रॉफी आणि तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या संघास कैलास बारकुल यांच्या वतीने ७ हजार रुपये व ट्रॉफी तर चतुर्थ क्रमांकाचे बक्षिस प्रशांत बेदरे यांच्याकडून ५ हजार रुपये व ट्रॉफी अशा स्वरूपात बक्षिसे दिली जाणार आहेत.

त्याचबरोबर वैयक्तिक बक्षिसांमध्ये बेस्ट रेडर साठी बाळासाहेब बारकुल यांच्याकडून ५ हजार, बेस्ट डिफेंटरसाठी अनिल पवार यांच्या कडून ५ हजार, बेस्ट ऑल राउंडर खेळाडू साठी निळकंठ बारकुल यांनी ५ हजार तर शिस्तबंध संघासाठी समाधान बेदरे यांच्या वतीने ५ हजार रुपायांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. सर्व विजेत्या संघाला जनहित पतसंस्थेच्या संतोष तौर यांच्या सौजन्याने ट्रॉफी देण्यात येणार आहेत.

या पुरुषांच्या खुल्या कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन दि.१५ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता विकास बारकुल, डॉ. संदीप तांबारे व सागर कसबे यांच्या हस्ते होणार आहे .

सामने दिवस रात्र खेळवले जाणार आहेत. संघ नोंदणी अंतिम दि.१४ फेब्रुवारी असुन प्रवेश फी ५०१ रुपये असेल तरी या स्पर्धेत जास्तीत जास्त संघांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन संयोजन समितीचे संतोष जमदाडे, प्रणव बारकुल, आकाश बारकुल, अनिकेत पवार, सोहेल पठाण आदींनी केले आहे.

## न्यायालयात दोषारोपपत्र असताना खोट्या माहितीच्या आधारे तलाठी नोकरी; निलंबनासाठी कुटुंबियांचे उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ फेब्रुवारी -**

शासनाची फसवणूक करून खोट्या माहितीच्या आधारे तलाठी पदाची नोकरी मिळवणाऱ्या व्यक्तीची चौकशी करून त्याला सेवेतून निलंबित करावे, या मागणीसाठी लक्ष्मीबाई ऊर्फ रुक्मिणी बसवणे यांनी आपल्या दोन लहान मुलांसह उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

लक्ष्मीबाई बसवणे यांनी यापूर्वीही ४ जुलै आणि ४ फेब्रुवारी रोजी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन दिले होते.



त्यांच्या तक्रारीनुसार, शुभम श्रीमंत कोणे या व्यक्तीवर उमरगा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून, न्यायालयात आरसीसी नं. १८४/२०२२ अन्वये दोषारोपपत्र दाखल आहे.

असे असतानाही, त्याने शासनाची दिशाभूल करून तलाठी पदाची नोकरी मिळवल्याचा आरोप आहे. तक्रार अर्ज देऊनही प्रशासनाकडून कोणतीही कारवाई न झाल्याने संतप्त झालेल्या बसवणे कुटुंबीयांनी उपोषणाचा मार्ग स्विकारला आहे.

मी व माझ्या लेकरांसाठी न्याय मिळेपर्यंत उपोषण सुरूच राहील, असे लक्ष्मीबाई बसवणे यांनी सांगितले.

सदर प्रकरणाची चौकशी करून संबंधित व्यक्तीवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी बसवणे कुटुंबीय आणि स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

प्रशासन या प्रकरणाकडे लक्ष देते का, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## निधन वार्ता...

### राजाभाऊ नवले



**तुळजापूर, दि.१३ फेब्रुवारी -**

येथील तुळजाभवानी देवीचे पुजारी राजाभाऊ नवले (वय ६०) यांचे दीर्घ आजाराने दि.१३ फेब्रुवारी गुरुवार रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली , एक मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मोतीझरा स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. काँग्रेसचे युवा नेते शशीकांत नवले यांचे ते वडील होते.

### वसंत थिटे



**तुळजापूर, दि.१३ फेब्रुवारी -**

तालुक्यातील जेष्ठ नागरिक वसंत गणपती थिटे वय ८५ यांचे गुरुवार दि. १३ रोजी सकाळी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी सायंकाळी पाच वाजता येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. ते नेताजी थिटे व सुर्याजी थिटे यांचे वडील होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## शिव-बसव-राणा-काशीबा जन्मोत्सव समिती अध्यक्षपदी श्रीकार धुमाळ




**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१३ फेब्रुवारी -**
तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथील छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर, महाराणा प्रतापसिंग व संत काशीबा महाराज अर्थात शिव-बसव-राणा-काशीबा जन्मोत्सव समिती अध्यक्षपदी श्रीकार किशोर धुमाळ तर उपाध्यक्षपदी नितीन यशवंत यादव यांची निवड करण्यात आली.

वागदरी येथे नुकतीच शिव-बसव-राणा-काशीबा महाराज जन्मोत्सव समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीत शिवजन्मोत्सव निमित्ताने शिव सप्ताहाचे आयोजन करून विविध उपक्रम राबविण्याचे तर जन्मोत्सव समितीची नुतन पदाधिकारी निवडण्यात आले. अध्यक्ष श्रीकार धुमाळ, उपाध्यक्ष नितीन यादव, सचिव भगतसिंग ठाकूर, कार्याध्यक्ष शमसिंग चव्हाण, मिरवणूक प्रमुख नागेश बिराजदार, रमेश पवार, रामसिंग चव्हाण, बालाजी बिराजदार आदींची निवड करण्यात आली.

यावेळी मंडळाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

# तुळजापूरात एकेरी मार्गासाठी तीन दिवसाचा डेमो प्रात्यक्षिक राबवा

» राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष महेश चोपदार यांची मागणी... » जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंम्बासे यांची तहसीलदारांना दिल्या सुचना... » तुळजापूरात वाहन कोंडीमुळे भाविकांसह नागरिक त्रस्त...



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ फेब्रुवारी -**
आई तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी दररोज लाखोंच्या संख्येने श्रीक्षेत्र तुळजापूर नगरीत भाविक भक्त येत असतात. लाखोच्या संख्येने येणाऱ्या भाविकांच्या वाहनांची संख्या देखील त्याच प्रमाणे असल्याने शहरात होणाऱ्या वाहनांच्या कोंडीमुळे भाविकांसह शहरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. ही कोंडी टाळण्यासाठी शहरात दीपक चौक वनवे एकेरी मार्ग करा म्हणून राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष महेश चोपदार यांनी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे हे रविवार दि.९ फेब्रुवारी रोजी शहराची वाहतूक नियंत्रण पाहणी करत असताना त्यांच्याकडे केली.

दीपक चौकातून आत आणि कोर्टासमोरून बाहेर जाण्याचा मार्ग करण्याचे चोपदार यांनी सुचवले. त्यावेळी जिल्हाधिकारी यांनी मागणी योग्य असून तहसीलदार यांना यांच्या सूचना लक्षात घेऊन शहरात तीन दिवसाचे वनवे एकेरी मार्ग डेमो पद्धत राबवा आणि त्यामध्ये जर रिझल्ट चांगला आला तर तीच पद्धत पुढे कायम ठेवा अशा सुचना दिल्याचे समजते.

यावेळी तहसीलदार अरविंद बोळंगे, पोलीस निरीक्षक रवींद्र खांडेकर, तुळजाभवानी मंदिर संस्थांचे धार्मिक व्यवस्थापक अमोल पाटील, जनसंपर्क अधिकारी प्रशांत जाधव, मंदिरचे कर्मचारी पवन पाटील यांची उपस्थिती होती. भाविकांच्या वाहनाने शहरात प्रवेश केल्यानंतर दीपक चौकातून घाटशील रोड मार्गे पार्किंगमध्ये पाठवावीत आणि जाणारे वाहन पोलीस संकुलन इमारतीच्या समोरून कोर्टाकडून जाणाऱ्या रोडने छत्रपती शिवाजी महाराजांच्या चौकात सोडण्यात यावे.

शहराकडे येणाऱ्या सर्व प्रमुख चारही मार्गावर शहराबाहेर पार्किंग व्यवस्था उपलब्ध असताना देखील शहरांमध्ये वाहनांची कोंडी मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहे.

पोलीस प्रशासनाच्या नियोजन शून्य कारभारामुळे शहरात वाहन कोंडी होत आहे. शहरात वारंवार होणाऱ्या वाहन कोंडीसाठी वनवे एकेरी मार्ग करणे अत्यंत गरजेचे आहे.

यापूर्वी देखील विविध संघटना समाजसेवक यांनी वारंवार एकेरी मार्गाची मागणी केलेली असताना देखील आजतागायत प्रशासनाने याची दखल कधीही घेतली नाही.

पण जिल्हाधिकारी यांनी याची तात्काळ दखल घेऊन तीन दिवसाचे डेमो पद्धत अवलंबण्याचे आदेश दिल्यामुळे शहरात होणारी वाहतूक कोंडी नियंत्रणात येईल अशी आशा व्यापारी नागरिकांमधून केली जात आहे.

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वळसा घालूनच वाहने जावेत...

छत्रपती शिवाजी महाराज चौकात छोट्या मोठ्या अपघाताचे प्रमाण देखील मोठ्या प्रमाणात वाढले आहे. सोलापूर कडून येणाऱ्या वाहन महाराजांना वळसा घालून पुढे जाणे गरजेचे आहे. पण महाराजांना वळसा न घालता वाहन डायरेक्ट पुढे येते. शहरातून येणारे वाहन या वाहनाला धडकन्याची जास्त संभावना असते. त्यामुळे पोलीस प्रशासनाने सोलापूर कडून येणारे वाहन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वळसा घालून जाण्यासाठी आवश्यक असणारे बॅरिकेटिंग करणे गरजेचे आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला प्रत्येक वाहन वळसा घालून जाईल आणि चौकात होणारे छोटे मोठे अपघात टाळता येऊ शकतील.

## भातागळीतील जि.प.प्रा. शाळेचे एनएमएमएस परिक्षेत यश



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१३ फेब्रुवारी -**
डिसेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या एनएमएमएस या परिक्षेत याही वर्षी जि.प. प्रशाला भातागळी शाळेने अखंड यशाची उज्वल परंपरा कायम ठेवली आहे.

या शाळेतील विद्यार्थ्यांनी श्रद्धा प्रविण जगताप हीने तालुक्यातून प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. तसेच नंदिनी देडे, श्रेयश जगताप, साईराज जगताप, ऋतुजा देशमुख, शिवानी कुलकर्णी, शितल जगताप, सायली जगताप, अलिशा शेख, सोहम जगताप या विध्यार्थ्यानीही घवघवयीत यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या सर्व विद्यार्थ्याना शिक्षक बालाजी माने, मधुकर शिंदे आणि सुषमा जट्टे मॅडम यानी मार्गदर्शन केले आहे. त्याबद्धल सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचा प्रशालेचे मुख्याध्यापक नंदकिशोर गायकवाड प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक कोंडीबा कारभारी व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष तानाजी आनंदगावकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन आभिनंदन केले व पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक नंदकिशोर गायकवाड प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक कोडिंबा कारभारी, विठ्ठल कवाळे, बालाजी नाईक, मेघराज कदम, सुर्यकांत वैरागकर, शंकर काळे, विशाल साळवे, सोनाली जगताप आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## बावची विद्यालयात एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षा पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ फेब्रुवारी -**
परंडा तालुक्यातील बाची विद्यालायात, एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पार पडला. यानिमित्ताने घेण्यात आलेल्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे किरण सुर्यवंशी महिला व बाल कल्याण विकास अधिकारी करमाळा, हरिशचंद्र मिस्कीन संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती परंडा, संजय चोरमले, शहाजी शिंदे, नागनाथ खैरे, इ मान्यवर उपस्थित होते.

शहाजल शेख, आप्पाराव बन, रगडे लक्ष्मण, दोरगे योगिता, लटके दिपाली, वैशाली शुक्ला, धनश्री ढाळे, मैना खैरे, इ. मान्यवर उपस्थित होते. इयत्ता ८ वी वर्गाच्या राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती एनएमएमएस परीक्षेचा ऑनलाईन निकाल नुकताच जाहीर झाला होता. त्यामध्ये विद्यालयातील १८ विद्यार्थी पात्र झाले आहेत. त्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला व त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य नारायण खैरे यांनी केले.

यामध्ये बोलताना त्यांनी सांगितले की, सदरील विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी एनएमएम एसशिष्यवृत्तीसाठी १२ हजार रुपये व सारथीसाठी ९ हजार ६०० हजार रूपये प्रतिवर्षी मिळणार आहेत. असे सांगितले.

यातील गुणवंत विद्यार्थी खालीलप्रमाणे दोरगे जान्हवी दिपक हिचा जिल्ह्यात दुसरा क्रमांक आल्यामुळे सत्कार करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे किरण सूर्यवंशी यांनी स्पर्धेच्या युगात कष्टाला पर्याय नसल्याचे सांगितले व विद्यालयाच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या. या सर्व गुणवंत शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक प्रमोद डोके व मानसी निंबाळकर यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संदिप अनभुले यांनी केले.

### गुणवंत विद्यार्थी...

दोरगे जान्हवी दिपक १३१, तिंबोळे सुप्रिया दादासाहेब ९४, बन आदर्श आप्पाराव ९३, चौधरी आशितोष महेंद्र ८६, लोंढे प्रिया राजेंद्र ८४, लटके कार्तिकी अजितकुमार ८३, मारकड समर्थ सुभाष ८२, खैरे श्रावणी नागनाथ ८१, ढाळे मधुरा सुयोग ७८, ढगे पृथ्वीराज हरिदास ७८, मिस्कीन पृथ्वीराज हरिदास ७७, भोईटे निकिता सुखदेव ७७, शिंदे ऋतुजा शहाजी ७६, शेख आतिफ शहाजल ७५, मोरे ईश्वरी प्रशांत ७३, चोरमले सिद्धी संजय ७३, शुक्ला सुहासी सुशील ७२, ओव्हाळ आदित्य अमोल ६१.

## राज्य माध्यमिक शिक्षक महासंघ शासन परिपत्रकाला न्यायालयात आव्हान देणार

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१३ फेब्रुवारी -**
महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मध्ये नमूद शिक्षक संवर्गाची सेवाजेष्ठता निश्चित करण्याबाबत २८ जानेवारीचे परिपत्रक २४ मार्च २०२३ च्या अधिसूचनेलाच छेद देणारे आहे. यामुळे या परिपत्रकाविरोधात न्यायलाच आव्हान देणार असल्याचे महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक महासंघाच्या अध्यक्ष पद्मा तायडे, कार्याध्यक्ष नंदकिशोर गायकवाड, महासचिव बाळा आगलावे यांनी स्पष्ट केले आहे.



राज्यातील खाजगी शाळांचे व्यवस्थापन करण्यासाठी अधिनियम १९७७ व नियमावली १९८१ तयार केलेली आहे. यात माध्यमिक शाळांची व्याख्या केलेली आहे. माध्यमिक शाळेतील डी. एड. शिक्षकाला माध्यमिक शिक्षक म्हणूनच मान्यता दिल्या गेलेल्या आहेत. विधान परिषदेवर निवडून जाणाऱ्या शिक्षक मतदारसंघात मतदानाचा अधिकार दिला गेला. त्यांच्या नियुक्तीला व बदलीला माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारीच मान्यता देतात. शाळेची सेवाजेष्ठता यादी एकच असल्याने त्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक प्रात्रतेनुसार योग्य त्या क्रमांकावर दर्शविल्या जाते. अधिनियम व नियमावलीत डीटीएड (२ वर्ष) ची तरतूद क प्रवर्गात केलेली होती. हा अभ्यासक्रम बंद करून त्याऐवजी डीएड (२ वर्ष) असे त्याचे नामाभिधान करण्यात आल्याने २४ मार्च २०२३ च्या अधिसूचनेत डीएड (२ वर्षाचा) समावेश क प्रवर्गात करण्यात २४ मार्च २०२३ च्या अधिसूचनेला आव्हान देणारी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. यात शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने न्यायालयाचे निर्देशानंतरही त्यांचे म्हणणे सादर केले नाही. ती याचिका प्रलंबित असताना अधिसूचनेवर स्पष्टीकरण देण्याची गरज का भासली. ज्यामुळे राज्यात संभ्रमाचे वातावरण तयार झाले. २४ मार्च २०२३ च्या अधिसूचनेनुसार माध्यमिक शाळेतील डीएड शिक्षक पदवी प्राप्त तारखेला क प्रवर्गात समाविष्ट होतो. परंतु सदर परिपत्रकानुसार डीएड शिक्षकांना बीएड केल्यानंतर आणि माध्यमिक विभागात नियुक्ती दिल्यानंतर शिक्षक क प्रवर्गात समाविष्ट होईल, असे स्पष्टीकरण करण्यात आले.

ही बाब अधिसूचनेलाच छेद देणारी असल्याने सदर परिपत्रकाला न्यायालयात आव्हान देणार असल्याचे महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक महासंघाचे देविदास जांभुळे, लक्ष्मण राठोड, काळूराम धनगर, काशिनाथ सोलंकर, लहू कोर, आर.डी. पाटील, उपाध्यक्ष बंडू थोटे, राजेंद्र मसराम, विश्वनाथ मघाडे, प्रशांत सपकाळ, शहावन हुसेन आदिनी म्हटले आहे.

## युवासेना (शिंदे गट) विजयी दौरा तुळजापूरात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१३ फेब्रुवारी -**
महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे, कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या आदेशाने महाराष्ट्र राज्याचे युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईकयांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या महाराष्ट्र युवा विजय दौरा तुळजापूर येथे मराठवाड्याचे विभागीय सचिव निलेश शिंदे, मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, मराठवाडा युवती सेना युवा सेना निरीक्षक ॲड. आकांक्षा चौगुले, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी युवा सेनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते युवासेना संघटना बांधणी तसेच येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांच्या अनुषंगाने हा युवा सेनेचा युवा विजयी महत्त्वाचा दौरा यावेळी युवा सेना जिल्हाप्रमुख गणेश जगताप युवासेना उपजिल्हाप्रमुख सुरज कोठावळे, युवासेना सरचिटणीस निखिल घोडके, युवासेना जिल्हा संघटक आकाश कांबळे, युवासेना शहर समन्वयक धनंजय शिंदे, विधानसभा अध्यक्ष खंडू कुंभार, तसेच युवासेनेचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, तुळजापूर शहरातील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दिव्यांग व्यक्तींना नवीन वाहन खरेदीसाठी आरटीओ करमाफीचा लाभ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ फेब्रुवारी -**
दिव्यांग व्यक्तींना नवीन वाहन खरेदी करताना महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम १९५८ अंतर्गत आरटीओ करमाफीचा लाभ मिळणार आहे. शासनाच्या २७ जुलै २०२१ च्या अधिसूचनेनुसार आणि गृहमंत्रालय व अवघड उद्योग मंत्रालयाच्या निर्देशांनुसार हा लाभ देण्यात येणार आहे.



करमाफीचे निकष पुढील प्रमाणे आहे.१० लाखांपर्यंतच्या वाहनांसाठी १०० टक्के करमाफी.१० ते २० लाखांच्या वाहनांसाठी ७५ टक्के करमाफी तर वाहनाची किंमत २० लाखांपेक्षा अधिक असेल तर ५० टक्के करमाफी परंतू अशी सूट अशा व्यक्तीच्या नावाने नोंदणी केलेल्या प्रत्येक प्रवर्गातील केवळ एकाच वाहनासाठी वैध असेल. महत्वाची अट म्हणजे दिव्यांग व्यक्तीच्या नावावर फक्त एकाच वाहनासाठी ही सवलत लागू राहील. दिव्यांग व्यक्तींना वाहन खरेदी करताना आवश्यक सहकार्य व विविध सोयी-सुविधा पुरवाव्यात,याबाबत वाहन विक्रेत्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

दिव्यांग व्यक्तींना वाहन खरेदीदरम्यान कोणतीही अडचण आल्यास, त्यांनी तात्काळ आरटीओ कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांनी केले आहे.

## पिडीत गुंतवणूकदारांचा उमरग्यात राज्यव्यापी मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१३ फेब्रुवारी -**
समृद्ध जीवन या सोसायटी मध्ये गुंतवणूक केलेल्या गुंतवणूक दारांची मॅंच्युरिटी परत मिळावी या मागणी साठी मागच्या अनेक दिवसांपासून विविध प्रकारचे अंदोलन मोर्चे करण्यात आले आहेत.

समृद्ध जीवन या महेश मोतेवार याच्या सोसायटीच्या सर्व मालमत्ता एमपीआएडी कायद्यानुसार महाराष्ट्र शासनाने ताब्यात घेतल्या असुन, या सोसायटी वर २०१६ मध्ये अवसायक ची नियुक्ती करण्यात आली आहे. व २०१८ मध्ये उपविभागीय अधिकारी हवेली पुणे यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून जप्त करण्यात आलेल्या सर्व मालमत्ता त्यांच्या निगराणीमध्ये ठेवण्यात आल्या आहेत. व एमपीआएडी कोर्टात म्हणजे शेषन कोर्टात पुणे येथे शासकीय अभियोक्ता यांना बाजु मांडण्याकरीता सहकार्य करून पिडीत लोकांना न्याय देणे गरजेचे असताना आज आठ वर्षे झाली हे शासकीय अधिकारी ढिम्म गतीने काम करत आहेत त्यामुळे पिडितांना न्याय मिळत नाही. उलट ताब्यात घेतलेल्या मालमत्ता वर महेश मोतेवार पुन्हा कब्जा करुन



सर्व मालमत्ता हडप करण्याचा प्रयत्न करत आहे. याबाबतीत अवसायक, सक्षम प्राधिकारी, केंद्रीय सहकार राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या समोर जन संघर्ष समिती महाराष्ट्र राज्याच्या वतीने अंदोलन करुन प्रशासनाला जागे करण्याचे काम मागच्या सहा महीन्यात करण्यात आले आहे.त्याच अनुषंगाने समीतीचे अध्यक्ष श्री शाहुराज माने यांच्या नेत्रत्वात पुढील अंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील प्रमुख कार्यकर्त्यांचा मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात सर्वानुमते येणाऱ्या मार्च महिन्यात होणाऱ्या अर्थ संकल्पिय अधिवेशन काळात मुंबई येथे आझाद मैदानात मोर्चा काढण्यात येणार असल्याचे ठरवले महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप करून पिडितांना न्याय द्यावा यासाठी मागणी करण्यात येणार आहे.

यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष शाहुराज माने, आनंद नरवाडे, रणजित सरोदे, प्रशांत गरड, महादेव भोसले, राजकन्या जावळे, शिला धुमाळ, गोजर बनसोडे, शुभांगी माने, दिलीप गरड आदिंची उपस्थिती होती. यावेळी महाराष्ट्र राज्य भरातुन शेकडो सहकारी उपस्थित होते.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## 'राजमाता'च्या २० विद्यार्थ्यांचे जेईई मेन्स परीक्षेत घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ फेब्रुवारी -** नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्यावतीने (एनटीए) जानेवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या जेईई-मेन्स परीक्षेच्या पहिल्या सत्रात येथील राजमाता जिजामाता कनिष्ठ महाविद्यालयाने घवघवीत यशाची परंपरा कायम राखली असून या महाविद्यालयातील २० विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश मिळविले आहे.

या महाविद्यालयातील आशिष आनंदराव बिरादार याने ९७ पर्सेंटाईल मिळवून महाविद्यालयात प्रथम, निशा शिवाजी मोरे ९३ पर्सेंटाईल द्वितीय तर करण माधव शिंदे हा ८५ पर्सेंटाईल मिळवून तृतीय आला आहे. तसेच निलेश बलभिम गुराळे ७६ पर्सेंटाईल, यश प्रकाश गायकवाड ७०, रेणू महेंद्र यादव ६८, ईशान शैलेश अष्टेकर ६५, स्नेहा विनोद माळी ६४, आदित्य संतोष गडदे ६३, दिपाली संजय धुप्पे ६३, पृथ्वीराज अजय शितोळे ६०, प्रथमेश रवि कुलकर्णी ५४, जय प्रकाश चेवले ५२, करण संतोष खुपसे ५२, बल्लभ घनशाम कुलकर्णी ५०, प्रतिमा बद्रीनारायण चांडक ५०, यश विशाल पारसवार ५०, ममता बसवराज म्हेत्रे ४२, श्रवण सुधीर गडदे ३१ तर अनिकेत विद्यासागर मेखले याने २२ पर्सेंटाईल मिळवले आहे.



या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, राजीव मुंढे, प्राचार्य जी. आर. मुंडे, प्रा. बी. बी. खटके, प्रा. अरविंद खोत, प्रा. वैशाली पाटील, प्रा. डी. ए. फंड, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर आदींनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...

### अनधिकृत बांधकाम आढळल्याने इमारतीवर पडला हातोडा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ फेब्रुवारी -** मनपाच्या बांधकाम विभागाची कसलीही परवानगी न घेता टोलेजंग सहा मजली इमारतीचे कॉलम उभे केले. दरम्यान, क्षेत्रीय अधिकाऱ्याच्या पथकाने इमारतीचा बांधकाम परवाना नसल्याने बांधकामावर हातोडा चालवला आहे.

वरच्या मजल्यापासून कॉलम पाडण्यास प्रारंभ केला आहे. दयानंद गेट परिसरात ही टोलेजंग इमारत उभारली जात होती. कॉलम उभारले होते. छत पडण्याच्याही कामाला प्रारंभ झाला होता. दरम्यान, मालमत्ता, बांधकाम आणि क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या पथकाने पाहणी केल्यानंतर अनधिकृत बांधकाम असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सहाव्या मजल्यापासून कॉलम पाडण्यास प्रारंभ करण्यात आला आहे. या इमारतीच्या आजूबाजूला निवासी घरे आहेत. त्यामुळे जेसीबीद्वारे ही इमारत न पाडता मनुष्यबळाकरवी इमारत पाडली जात आहे. क्षेत्रीय अधिकारी निर्मला माने यांच्याशी संपर्क साधला असता त्या म्हणाल्या, सहा मजली इमारतीचे बांधकाम सुरू होते. परंतु परवानगी नसल्यामुळे बाधकाम पाडण्यात येत आहे.

### आजपासून शहरात योगासन शिबीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ फेब्रुवारी -** राष्ट्रीय आर्यवीर दलाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. देवव्रत आचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी योगासन शिबीराचे आयोजन आर्षयोग प्रतिष्ठान, एम.एन.एस. बँक, पतंजलि योग समिती व जेएसपीएम शिक्षण संस्थेच्या वतीने केले जाते. याहीवर्षी आर्य समाज मंदिर सभागृह, महात्मा गांधी चौक येथे दि. १४ ते २० एप्रिल २०२५ या कालावधीत योगासन शिबीराचे आयोजन करण्यात आली आहे.

सदरील योगासन शिबीराच्या पूर्व तयारीसाठी माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी सायंकाळी मजगे नगर येथील 'कैलास' निवासस्थानी प्रमुख पदाधिकाऱ्यांची व मार्गदर्शकांची दर्शकांची योग कार्यकर्ते आदींची बैठक बोलाविण्यात आलेली आहे.

### पत्रकारिता पुरस्कार प्रवेशिका पाठविण्यासाठी मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ फेब्रुवारी -** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आलेली आहे.

या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रवेशिका मागविण्यात आल्या होत्या. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम ३१ डिसेंबर २०२४ असा होता. या प्रवेशिका मागविण्याकरीता २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुन संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

### अंगणवाडी सेविका पदांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ फेब्रुवारी -** बालविकास प्रकल्प अधिकारी एकात्मिक बालविकास सेवा योजना लातूर ग्रामीण योजनेतंर्गत रेणापूर तालुक्यातील मोटेगाव, सिंधगाव, रामवाडी को. , सुकनी, लहानेवाडी, नरवटवाडी, मानुसमारवाडी, इटी, डीघोळ देशपांडे येथील प्रत्येकी एक अंगणवाडी सेविका तसेच भोकरंबा, मोटेगाववस्ती, दामोदर तांडा, राठोडनगर तांडा, बिटरगाव, गोढाळा, यशवंतवाडी, कोष्टगाव, आखाडावस्ती, खरोळा, रामवाडी ख. , मोहगाव, पानगाव, दिवेगाव, वालावस्ती, घनसरगाव तांडा, भंडारवाडी वस्ती, शेरा, खानापूर, सांगवी अंगणवाडीतील प्रत्येकी एक व कामखेडा, डीघोळ देशमुख येथील दोन मदतनीसांची पदे भरण्यात येणार आहे. यासाठी गावातील स्थानिक रहिवाशी असलेल्या पात्र महिलांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

## देवस्थान यात्रा समिती, शासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करावे: जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ फेब्रुवारी -** श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवालयातर्फे आयोजित केली जाणारी ७२ वी महाशिवरात्री यात्रा २६ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५ या कालावधीत होणार आहे. या यात्रेसाठी जिल्ह्यातील ग्रामीण भागातून, तसेच जिल्ह्याबाहेरून मोठ्या संख्यने भाविक उपस्थित राहतात. या भाविकांना आवश्यक सुविधा पुरविण्यासाठी देवस्थान यात्रा समिती आणि जिल्हा प्रशासनातील सर्व प्रशासकीय यंत्रणांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या.

श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थान महाशिवरात्री यात्रेच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, लातूर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाचे निरीक्षक तथा श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानचे देवस्थानचे प्रशासनक सचिन जांबुतकर, विश्वस्त विक्रम गोजमगुंडे, अशोक भोसले, बाबासाहेब कोरे, नरेश पंड्या, सुरेश गोजमगुंडे, रमेश बिसेन, विशाल झांबरे, व्यंकटेश हालींगे, राजेंद्र पतंगे, ओमप्रकाश गोपे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर शिंदे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. भूपेंद्र बोधनकर, कृषि उपसंचालक महेश क्षीरसागर यांची यावेळी उपस्थित होते.

श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानची यात्रा हे लातूरचे वैभव आहे. या यात्रेची महती जिल्ह्याबाहेर इतर राज्यातही पोहचली आहे. विविध राज्यातूनही याठिकाणी भाविक येतात. त्यामुळे मंदिर परिसरात भाविकांच्या होणाऱ्या गर्दीचा विचार करून वाहतूक, पार्किंग, सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक नियोजन करावे. यासाठी देवस्थान लातूर शहर महानगरपालिका व पोलीस यांनी आवश्यक कार्यवाही आतापासूनच सुरु करावी. मंदिर परिसरात स्वतंत्र पोलीस नियंत्रण कक्ष स्थापन करावा. तसेच ध्वनिक्षेपक यंत्रणा आणि धोक्याची सूचना देणारी यंत्रणा सज्ज ठेवावी. भाविकांच्या रांगा लावण्यासाठी, तसेच भाविकांना मदत करण्यासाठी देवस्थानमार्फत स्वयंसेवक नेमून त्यांना गर्दीत ओळखू येतील, असे गणवेश व ओळखपत्र पुरविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

मंदिराकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गांची दुरुस्ती करावी, तसेच सुरक्षेच्या दृष्टीने या मार्गांवरील स्ट्रीट लाईट्स तातडीने सुरु करण्याची कार्यवाही महानगरपालिकेने करावी. मंदिर परिसरातील स्वच्छतेला



प्राधान्य द्यावे. तसेच आत्पकालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, यंत्रणा, रुग्णवाहिका सज्ज ठेवावी. अन्न व औषध प्रशासनाने यात्रा कालावधीत विक्री होणाऱ्या खाद्यपदार्थांचे वेळोवेळी नमुने घेवून तपासणी करावी. विषबाधेसारखे प्रकार टाळावेत, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या. तसेच यात्रा कालावधीत पशुसंवर्धन विभागामार्फत पशुप्रदर्शनाचे आयोजन केले जाणार आहे. यासोबतच कृषि विभागानेही विविध योजनांची माहिती देणारी दालने उभारून कृषि प्रदर्शनातून यात्रेमध्ये येणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करावी, असे त्यांनी सांगितले.

आरोग्य विभागामार्फत विशेष तपासणी शिबिराचे आयोजन करण्याच्या सूचना

श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानची यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेवून आरोग्य विभागाने स्वतंत्र पथके तैनात करावीत. भाविकांना आरोग्यविषयक सुविधा देण्यासोबतच त्यांच्यासाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करावे. विशेषतः महिलांसाठी हिमोग्लोबिन आणि थायरॉईड तपासणी शिबिरांचे आयोजन करावे. यासोबतच आयुष्मान भारत कार्ड आणि आभा कार्ड तयार करण्यासाठी विशेष शिबीर घेण्याचे नियोजन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

यात्रा कालावधीतील गैरप्रकार रोखण्यासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. तसेच गर्दीमध्ये साध्या वेशातील पोलीस तैनात केले जाणार असल्याची माहिती जिल्हा विशेष शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी दिली.

## दयानंद महाविद्यालयात संत रोहिदास जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ फेब्रुवारी -** येथील दयानंद कला महाविद्यालयात संत रोहिदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. संत रोहिदास यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक प्रा. प्रशांत दीक्षित, संजय व्यास, पोलीस कॉन्स्टेबल विनोद कातळे, तालुका कृषी अधिकारी अमोल बनसोडे, बिभीषण क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी प्रा. अंगद भुरे म्हणाले, संत रोहिदास यांनी एकेश्वरवादाचा स्वीकार करून समाज प्रबोधनाचे कार्य केले. तत्कालीन परिस्थितीत जातिभेद, वर्णभेद मोठ्या प्रमाणात होता. त्याला विरोध करून समाजामध्ये समन्वय, समता निर्माण करण्याचे कार्य ईश्वर भक्ती, सेवा, सत्संग आणि शास्त्रीय ज्ञानाच्या मार्गातून त्यांनी केले. सत्कर्म, मानवधर्म, सत्य व ईश्वर नामभक्तीचे महत्त्व त्यांनी सांगितले. गुरु स्वामी रामानंद यांच्याकडून संत रोहिदास यांना ज्ञानप्राप्ती झाली.

गुरुरूप परीस स्पर्शाशिवाय जंग लागलेले तांबे सोन्याप्रमाणे चमकत नाही. संत रोहिदास यांनी जीवनात गुरुचे महत्त्व असल्याचे सांगितले. भारतभर फिरून त्यांनी महान कार्य केले. त्यांच्या 'गुरुग्रंथ साहेब'मध्ये असलेल्या रचना आजही लोकप्रिय आहेत. भक्ती आणि साधूसेवांचे वेड असलेल्या रोहिदासांनी आपला चर्मकाराचा व्यवसाय करीत ईश्वरभक्ती, सत्संग व सेवाधर्म कायम ठेवला.यावेळी प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## सोशल मीडियाचा अतिवापर घातक : कळसे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ फेब्रुवारी -** सध्या सोशल मीडिया पाहण्यात अधिक वेळ जात आहे. त्यामुळे अभ्यास, व्यक्तिमत्त्वावर परिणाम होऊन विविध समस्या निर्माण होत आहेत. विद्यार्थ्यांनी पालक, शिक्षकांचे मार्गदर्शन घेऊन आपल्या जीवनात मार्गक्रमण केले पाहिजे. त्यामुळे संस्कारशील पिढी निर्माण होते, असे प्रतिपादन प्राचार्य चंद्रशेखर कळसे यांनी केले.


शहरातील सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आशा मुंडे होत्या. यावेळी प्रा.डॉ. बालासाहेब भोसले, डॉ. सुषमा मंडले, विद्यार्थिनी प्रतिनिधी अंकिता बिराजदार यांची उपस्थिती होती. प्राचार्य कळसे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपला अधिक वेळ अभ्यास, वाचन, लेखनासाठी द्यावा. सध्याच्या स्पर्धेच्या युगात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच विविध कौशल्य आत्मसात करुन आपली गुणवत्ता सिध्द केली पाहिजे, असे प्राचार्य डॉ. आशा मुंडे म्हणाल्या. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

## तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाचे जेईई मेन्स परीक्षेत घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ फेब्रुवारी -** नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्यावतीने (एनटीए) जानेवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या जेईई-मेन्स परीक्षेच्या पहिल्या सत्रात येथील तुळजाभवानी कनिष्ठ महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली असून या महाविद्यालयातील ११ विद्यार्थ्यांनी या परीक्षेत यश मिळविले आहे.

या महाविद्यालयातील अनिकेत अशोक मस्के हा ८६ पर्सेंटाईल मिळवत महाविद्यालयात प्रथम, संपदा बालाजी कटकमवार ७१ पर्सेंटाईल मिळवून महाविद्यालयात द्वितीय तर प्रणव जीवनराव गरड हा ७१ पर्सेंटाईल मिळवत महाविद्यालयात तृतीय आला आहे.



तसेच सार्थक सतीश शेळके ७० पर्सेंटाईल, समिक्षा दत्ता गरड ७०, रोहन रमेश पांचाळ ६९, संकेत अविनाश नरवडे ६०, सृष्टी दिनकर मुळे ६०, गोविंद जोतीराम भोसले ५७, माहेश्वरी कमलाकर अंधारे ५२ तर शांभवी किशोर सास्तूरकर हिने ५२ पर्सेंटाईल मिळवले आहेत. या यशाबद्दल संस्थेच्या सचिव के. ए. जायेभाये, राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, राजीव मुंढे, प्राचार्य जी. आर. मुंडे, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते आदींनी या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



## ॲड. रुद्राली पाटील यांचा मराठी साहित्य संमेलनात सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ फेब्रुवारी -** माजी केंद्रीय गृहमंत्री, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शिवराज पाटील - चाकूरकर यांच्या नात तथा सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अर्चनाताई पाटील -चाकूरकर यांच्या कन्या ॲड. रुद्राली पाटील - चाकूरकर यांचा दिल्ली येथे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात दिल्लीतील मराठीजनांचा सन्मान म्हणून सन्मान करण्यात आला. यावेळी महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते खा. शरद पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, प्रतापराव जाधव, डॉ. सदानंद मोरे, राम सुतार आदीची उपस्थिती होती. या सन्मानाबद्दल अनेकांनी रूद्राली चाकूरकर यांचे अभिनंदन केले.

## शेतकऱ्यांना सोयाबीन हमीभाव फरकाची रक्कम द्या : देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ फेब्रुवारी -** सोयाबीनला बाजारात हमीभावापेक्षा कमी भाव मिळत आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना बाजारभाव व हमीभाव यातील फरक रक्कम सरकारने द्यावी आणि हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी केंद्राने दिलेली २४ दिवसांची मुदतवाढ कायम ठेवावी, अशा मागण्या लातूर ग्रामीणचे माजी आमदार धीरज देशमुख यांनी शासनाकडे केली आहे.



महाराष्ट्रात हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी तीन दिवसांपूर्वी केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी २४ दिवसांची मुदतवाढ जाहीर केली होती. पण केंद्राने कोणतीही मुदतवाढ दिली नसल्याचे राज्याच्या पणन विभागामार्फत सांगितले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये गोंधळाचे आणि निराशेचे वातावरण निर्माण झाले आहे. याकडे माजी आमदार धीरज देशमुख यांनी शासनाचे लक्ष वेधून घेतले आहे. नाफेडच्या माध्यमातून सोयाबीन खरेदी केले जात आहे. यासाठी नोंदणी करूनही अनेक शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदी करण्यात आले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी २४ दिवसांची मुदतवाढ कायम रहावी म्हणून राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी यात संवेदनशीलतेने लक्ष घालावे. राज्यातील नोंदणी केलेल्या ७ लाख ६४ हजार ६५४ शेतकऱ्यांपैकी २ लाख ५३ हजार शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी अद्याप झाली नाही. अनेक शेतकऱ्यांना नोंदणीही करता आली नाही. याची सरकारने दखल घ्यावी, सोयाबीन खरेदी व नोंदणीला मुदतवाढ द्यावी, अशी मागणी देशमुख यांनी केली आहे. केंद्रीय कृषीमंत्री चौहान यांनी २४ दिवसांची मुदतवाढ जाहीर केली असताना मुदतवाढ दिली नसल्याचे पणन विभागाने जाहीर केले आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारमध्ये कुठलाही ताळमेळ नाही हे स्पष्ट होत आहे, अशी खंत धीरज देशमुख यांनी व्यक्त केली.

## भगवंताच्या नि:स्वार्थ भावनेतील सेवेतून ज्ञानप्राप्ती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ फेब्रुवारी -** आपल्याला आयुष्यात आरोग्य, सुख, शांती चांगली पाहिजे असेल तर आपण भगवंताची, आई-वडिलांची नि:स्वार्थ भावनेने सेवा करून आज्ञा पाळली पाहिजे. त्या बदल्यात भगवंताकडून ज्ञानप्राप्ती मिळते, असे मौलिक विचार श्री उत्तरादी मठाचे सत्यात्मतीर्थ स्वामी महाराज यांनी मांडले.



येथील श्री उत्तरादी मठात महाराजांचे प्रवचन झाले. यावेळी लातूरकरांतर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी उत्तरादी मठाचे दिवाण शशी आचार्य, लक्ष्मी आचार्य, विष्णूतीर्थ आचार्य, नंबी वासुदेव आचार्य (बेंगलोर), लातूर येथील उत्तरादी मठाचे प्रतिनिधी रघुत्तमाचार्य जोशी, श्री मध्व मंडळाचे अध्यक्ष ॲड. श्रीराम देशपांडे, संजय राजहंस, हरिराम कुलकर्णी, प्रवीण सौंदत्ती, बाळासाहेब देशपांडे, किशोर कुलकर्णी, भानुदास भातांब्रेकर, प्रवीण देशपांडे, शैलेश देशपांडे, मनोज जोशी आदी भक्तगण उपस्थित होते. यावेळी सत्यात्मतीर्थ स्वामी महाराज यांनी गायत्री मंत्राचा जप, एकादशी व्रत, पूजा, तसेच १ कोटी स्तोत्र पारायनाचा संकल्प करून शिष्य परिवाराने तो पूर्ण करावा, असे आवाहन केले. यावेळी विनायकाचार्य, अनंताचार्य काशीकर, श्रीपाद आचार्य हलगरकर, गोपी आचार्य, रामाचार्य, जीवन कुलकर्णी, सुनील सबनीस आदी उपस्थित होते.



## लातुरात क्रीडा स्पर्धांचे बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.१३ फेब्रुवारी -** श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्था व लातूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय पुरणमल लाहोटी यांच्या स्मृतिदिनानिमित्त सोमवार व मंगळवारी आयोजित विविध क्रीडा स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ मंगळवारी सायंकाळी एसएमआर स्विमिंग पूल येथे प्रमुख मान्यवरांच्या उपस्थित संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. कल्याण बरमदे होते कमलेश ठक्कर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. यावेळी व्यासपीठावर लातूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष सतीश देशमुख, श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे सचिव आशिष बाजपाई, शरदकुमार नावंदर, सूर्यप्रकाश धूत, सुहास शेट्टी, आनंद लाहोटी, स्पर्धा संयोजक चैतन्य भार्गव, आशिष सोमाणी, अभय शहा, मनीष राठी, एन एस रेड्डी, आशिष अग्रवाल वाघमारे गुरुजी आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

बालवाडी ते दहावी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी झालेल्या धावणे, दोरीवरच्या उड्या, जलतरण, टेबल टेनिस, बॅडमिंटन स्पर्धेत संस्था अंतर्गत राजा नारायणलाल लाहोटी, श्री गोदावरीदेवी लाहोटी, श्री बंकटलाल लाहोटी, राजस्थान विद्यालय, केशरबाई भार्गव, पुरणमल लाहोटी, सुरज कुंवरदेवी लाहोटी विद्यालयातील एकूण ५४५ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. यापैकी सर्व स्पर्धातील मिळून १७४ विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण समारंभात ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

अध्यक्षीय समारोपात डॉ. कल्याण बरमदे यांनी विद्यार्थी जीवनात क्रीडा स्पर्धांचे महत्त्व सांगून खेळात हुशार असणारे विद्यार्थी अभ्यासात पण हुशार असल्याचे सांगितले. निरोगी राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी दररोज आपल्या आवडीप्रमाणे मोबाईलच्या आहारी न जाता मैदानावर खेळ खेळला पाहिजे, असेही डॉ. बरमदे म्हणाले. संस्था सचिव आशिष बाजपाई यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

CMYK

लातूर
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तिरु मध्यम प्रकल्प तलाव, रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी निधी द्या

### आ. बनसोडे यांची जलसंधारण मंत्र्यांकडे मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१३ फेब्रुवारी -**

मतदार संघातील उदगीर तालुक्यातील चिमाचीवाडी तिरु मध्यम प्रकल्पाची निर्मिती साधारणतः ५० वर्षापूर्वी झाली आहे.

त्यामुळे सदरील प्रकल्पाच्याही कालव्यांची अत्यंत दुरावस्था झाली असून त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच उदगीर तालुक्यातील करखेली, बामाजीची वाडी, निडेबन, चांदेगाव, गुत्ती-१, गुत्ती-२, धोंडवाडी, डावुळ, कोदळी, एकुर्का, केसगरवाडी, केकतसिंदगी, हावरगा, चेरा-१ व चेरा-२, जंगमवाडी, देवर्जन हे सर्व साठवण तलाव व यातील बरेच साठवण तलाव हे मागील २९-३० वर्षापूर्वी तयार झाले असून या साठवण तलावांची दुरुस्ती करणे गरजेचे असून सदरील ठिकाणच्या जोड रस्त्यांचीही आवस्था ही अत्यंत खराब झाली असल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना वाहतूकीसाठी फार मोठी अडचण निर्माण होत आहे.

त्यामुळे या भागातील सदरील रस्ते व साठवण तालावाची दुरुस्ती व कालव्यांची दुरुस्ती करण्याबाबत आपण निधी उपलब्ध करुन द्यावा जेणेकरून या भागातील शेतकऱ्यांना सोयीचे होईल अशी लेखी मागणी उदगीर - जळकोट मतदारसंघाचे आमदार संजय बनसोडे यांनी जलसंधारण मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



#### संत शिरोमणी रविदास महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

**कळंब, दि.१३ फेब्रुवारी -**

६४८ वी श्रीसंत शिरोमणी रविदास महाराज जयंती ज्ञान प्रसार माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सहशिक्षक शेवाळे कमलाकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा संस्थेचे प्रशासकीय अधिकारी रमेश मोहेकर, ज्ञान प्रसार माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य संजय जगताप, प्रशालेचे पर्यवेक्षक मडके धनंजय, गुरव शैलेश, क्रीडा शिक्षक संजय मडके, सतीश मडके, आडणे संजय, पवार एम.एम., राऊत अशोक, भामरे जनार्दन, सोनवने निता, शिंदे दिगंबर, अंगद आगलावे, प्रथमेश साडेकर आदीं प्रशालेतील विद्यार्थी, विद्यार्थिनी यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

#### १० वी व १२ वी खेळाडू विद्यार्थ्यांसाठी ग्रेस गुण अर्ज प्रक्रिया ऑनलाईन

**धाराशिव, दि.१३ फेब्रुवारी -**

इयत्ता १० वी व १२ वीच्या खेळाडू विद्यार्थ्यांचे ग्रेस गुण अर्ज यावर्षीपासून फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जाणार आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ही सुविधा आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध करून दिली आहे. ऑनलाईन अर्ज प्रक्रिया बंधनकारक असून जिल्ह्यातील जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील पात्रता धारक खेळाडू विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी आपले सरकार पोर्टलद्वारे अर्ज भरून द्यावा लागेल. यासोबतच, जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून कोणताही अर्ज ऑफलाईन पद्धतीने स्वीकारला जाणार नाही. त्यामुळे शाळा किंवा महाविद्यालयाने जर वेळेत अर्ज भरला नाही, तर संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य त्यासाठी जबाबदार असतील. अर्ज करण्याची अंतिम तारीख ३१ मार्च ही आहे. तरी जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी ३१ मार्च पूर्वी आपले सरकार पोर्टलद्वारे अर्ज सादर करावे. अर्ज वेळेत भरले नाहीत तर संबंधित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते. त्यामुळे सर्व शाळा व महाविद्यालयांनी ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.



#### वैजीनाथ झोंबाडे यांची तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती

**वाशी, दि.१३ फेब्रुवारी -**

वैजनाथ बसी झोंबाडे यांची वाशी बहुजन जनता पक्षाचे तालुका उपाध्यक्ष म्हणून पक्षाचे जिल्हाध्यक्ष नवनाथ भंडारे यांनी नियुक्तीपत्र दिले आहे या नियुक्ती पत्रात बहुजन जनता पक्ष या राजकिय व वैचारिक चळवळीसाठी आपण वेळ, श्रम, बुद्धी, पैसा, कौशल्य हे पंचदान देऊन पक्षात सातत्याने कार्यरत आहात. आपण केलेल्या कार्याची दखल घेत, आपणास हे कार्य व्यापकरितीने करण्याची संधी मिळावी, तसेच आपल्या माध्यमातून पक्ष अधिक अधिक बळकट व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली असून सदरिल नियुक्ती नियुक्तीपत्र दिलेल्या तारखेपासून एक वर्ष असेल. याप्रसंगी धनराज झोंबाडे, राजेंद्र कांबळे, दगडू झोंबाडे, भारत झोंबाडे यांची उपस्थिती होती.



#### नळदुर्गमध्ये रोहिदास महाराजांची जयंती उत्साहात साजरी

**नळदुर्ग, दि.१३ फेब्रुवारी -**

नळदुर्ग येथे नळदुर्ग शहर श्री संत रोहिदास चर्मकार समाज सेवा मंडळाच्या वतीने दि.१२ फेब्रुवारी रोजी श्री संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची ६४८ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सालाबादाप्रमाणे याहीवर्षी दि.१२ फेब्रुवारी रोजी नळदुर्ग येथे नळदुर्ग शहर श्री संत रोहिदास चर्मकार समाज सेवा मंडळाच्या वतीने श्री संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी झालेल्या कार्यक्रमात श्री संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन सेवानिवृत्त शिक्षक बाबुराव पोतदार व चर्मकार समाजाचे राजेंद्र कांबळे यांच्या हस्ते पुजन करण्यात आले. यावेळी नळदुर्ग शहर चर्मकार समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष शंकर वाघमारे, उपाध्यक्ष लक्ष्मण कांबळे, सौदागर अंगुले, सचिव अमोल कांबळे, कोषाध्यक्ष विठ्ठल कांबळे, महेश वाघमारे, बाळु वाघमारे, सौदागर कांबळे, बाबु गायकवाड, सुभाष कांबळे मारुती घोडके, अजय कांबळे, जमन ठाकुर, किसन ठाकुर, बबलु दस, लक्ष्मण अंगुले, नारायण कोकणे, विष्णु वाघमारे व दयानंद कांबळे आदिजण उपस्थित होते.

## वलांडी बाजारपेठेत मुख्य रस्त्यावर पुन्हा व्यापाऱ्यांकडून अतिक्रमण

### ग्राम पंचायतीकडून व्यापाऱ्याची पाठराख... नागरिक त्रस्त...



**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१३ फेब्रुवारी -**

तालुक्यातील वलांडी येथील बाजारपेठेत रोडवरती दुकानातील वस्तु थाटणाऱ्या व्यापारी व दुकानदारांवर कारवाईची बडगा ग्राम पंचायत केव्हा उलगडणार हा एक मोठा प्रश्न चिन्ह निर्माण झाला आहे. यावरून ग्राम पंचायतीच या व्यापाऱ्यांची पाठराखण करीत असल्याची चर्चा ग्रामस्थांतून केली जात आहे.

वलांडी येथील बाजारपेठतील तालूक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून ओळखली जाते. तर या बाजारपेठेतील छोटे मोठे व्यापारी आपला माल दुकानात न लावता गावात जाणाऱ्या मुख्य एकमेव रहदारीच्या रस्त्यावर आपली दूकाने थाटत आहेत.तर व्यापारी एवढ्यावरच थांबत नाहीत तर आपली वाहने व दुकानात येणारा माल मोठ्या मोठ्या वाहनाने उतरवतात व एसटी. बसेस व गावात येणाऱ्या जाणाऱ्या वाहतूकीस जाणीवपूर्वक अडथळा निर्माण करीत आहेत.

दुसरीकडे यांच्या दुकानासामोर थाटलेल्या मालामूळे आजूबाजूच्या दूकानदारात किरकोळ भांडणे दररोज होत असतात व एकमेकांचे पाहून सर्व दुकानदारांनी आपला माल रोडवरती थाटून एक प्रकारचा अतिक्रमण वलांडीतील बाजारपेठेत केला आहे. ग्रामपंचायत प्रशासन याकडे जाणून बुझून डोळेझाकपणा करीत आहे का? असा प्रश्न नागरीकांतून निर्माण होत आहे. कांही वर्षापूर्वी वलांडीतील मूख्य चौक व गावातील अतिक्रमण सर्वांना नोटीस बजावून ग्राम पंचायतीमार्फत काढण्यात आली होता. मात्र गावातील व्यापाऱ्यांनी कांही दिवस रोडवर अतिक्रमण व आपला माल थाटला नाही. परंतु पुन्हा आता ग्राम पंचायत हरकत करत नसल्याने व्यापाऱ्यांनी आपले माल रोडवरती थाटायला सुरूवात केली आहे.

वलांडीतील ग्राम पंचायत प्रशासन यावर काय भुमिका घेईल व दंडात्मक कारवाई करेल का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## तीन एकर हरभऱ्याची गंजी जळून शेतकऱ्याचे नुकसान



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१३ फेब्रुवारी -**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील येरोळ येथील लक्ष्मण शिवराज तांबोळकर या होतकरू शेतकऱ्याची दि.११ फेब्रुवारी वार मंगळवार रोजी संध्याकाळी सात ते नऊ च्या सुमारास तीन एकर हरभऱ्याचे कापणी करून गोळा करून ठेवलेल्या बनीमिस आग लागल्याची घटना उघडकीस आली.

या घटनेत लक्ष्मण तांबोळकर या शेतकऱ्याचे तीन एकर पेरा असलेली हरभऱ्याची गंजी जळून खाक झाल्याने सुमारे दीड-दोन लाखाचे नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

या घटनेची माहिती महसूल विभाग, शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्यात देण्यात आली.

या घटनेचा पंचनामा करण्यात आला असून याप्रकरणी अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला असल्याची माहिती शेतकरी लक्ष्मण शिवराज तांबोळकर यांनी सांगितली.

अगोदरच शेतकऱ्याच्या शेतमालास योग्य तो भाव मिळत नाही.

त्यात सततची नैसर्गिक आपत्तीम ुळे येणारी संकटे यांना चार हात करत हातातोडांशी आलेल्या हरभऱ्याच्या गंजी जळून खाक झाल्याने सदरील शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून प्रशासनाने तात्काळ आर्थिक मदत करावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

## अतुल सावे यांचे हस्ते मुंढेचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१३ फेब्रुवारी -**

संघटन पर्वा अंतर्गत भारतीय जनता पार्टी सदस्य नोंदणी अभियाना राबवण्यात आले होते. या अभियानात अहमदपूर तालुक्यातील सदस्य नोंदणीत रामानंद मुंढे यांनी १००० सदस्य नोंदण्या पूर्ण केली.



यावेळी राज्याचे दुग्धविकास, बहुजन विकास कॅबिनेट मंत्री अतुल सावे अहमदपूर येथे आले होते. त्यावेळी लांजी येथील रामानंद मुंढे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशम ुख, ॲड. भारत चामे, अशोक केंद्रे, त्र्यंबक गुट्टे, जिल्हाध्यक्ष भाजयुमो अमोल निडवदे, प्रदेश उपाध्यक्ष युवराज पाटील, माजी उपसभापती सज्जन लोणाळे, काथवटे, नितीन रेड्डी आदीसह मान्यवर कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुंढे महाविद्यालयातर्फे नेत्र तपासणी शिबीर



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१३ फेब्रुवारी -**

गंगाखेड येथील कै सौ शेषाबाई सिताराम मुंढे महाविद्यालय, लायन्स क्लब गंगाखेड टाऊन आणि लायन्स नेत्र रुग्णालय नांदेड त्यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान विद्यालय किनगाव येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात किनगाव व परिसरातील एकूण १२५ नेत्र रुग्णांची तपासणी करण्यात आली. ३३ नेत्र रुग्णांना डोळ्याच्या शस्त्रक्रियेसाठी लॉयन्स नेत्र रुग्णालय नांदेड येथे पाठवण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष भगवान विद्यालयाचे मुख्याध्यापक कराड, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व उद्घाटक प्राचार्य डॉ. दीनानाथ फुलवाळकर, आयोजक प्राचार्य डॉ. बालाजी ढाकणे, रा.से.यो.चे प्रमुख प्रा.डॉ. अशोक केंद्रे आणि लॉयन्स क्लब गंगाखेड टाऊनचे सचिव प्रा.डॉ. राजीव आहेरकर, लॉयन नेत्र रुग्णालयाचे टीम प्रमुख डॉ. पौळ, डॉ. पावडे व त्यांचे सहकाऱ्यांनी नेत्र रुग्णांची तपासणी केली. त्यासाठी डॉ. अरुण मुंडे, बेंजामिन अवचित प्रा. विठ्ठल टेकाळे, डॉ. रेखा बने, डॉ. किरण पिनाटे, प्रा. सिद्धार्थ शिंदे, डॉ. लहू फड, डॉ. साहेबराव सातपुते, प्रा. नामदेव लटपटे, गंगाधर मुरकुटे, श्रीकांत केंद्रे, चव्हाण रघुनाथ, मुंडे ज्ञानोबा उर्फ माऊली व कृष्णा मुंडे या सर्वांनी उत्कृष्ट सहकार्य करून सदरील शिबिर यशस्वीपणे पार पाडले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. यादव सूत्रसंचालन प्रा.डॉ. बबन गित्ते व आभार प्रा.डॉ. औचित्ये यांनी मानले.

## विलास पाटील-चाकूरकर यांनी जखमी झालेल्या तरुणाचे वाचवले प्राण

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१३ फेब्रुवारी -**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे चाकूर तालुकाध्यक्ष विलासराव पाटील चाकूरकर चाकूरहुन लातुरकडे जात असताना लातुर-नांदेड राष्ट्रीय महामार्गावर एका तरुणाचा अपघात झाला होता. त्या अपघातात एक तरूण रक्तबंबाळ अवस्थेत रस्त्यामध्ये तळमळत पडला होता. जखमी तरूणांस कोणीच मदत करीत नव्हते बघ्याची गर्दी जमली होती. जमलेली जणता अपघातातील तरूणाचा व्हिडीओ बनवत होते. मात्र कोणीही मदत करीत नव्हते.

चाकूर शहरातील माझी माय मंगल कार्यालयासमोर संध्याकाळी अंदाजे चार वाजता दोन मोटार सायकलचा समोरासमोर अपघात होऊन चाकूर येथील तरूण काशीनाथ कवठाळे हा अपघातात जखमी झाल्यामुळे रस्त्यावर पडला होता. रस्त्यातून जाताना एक तरुण रोडवर पडून तळमळतांना दिसला.

याचे गांभीर्य लक्षात घेऊन विलासराव पाटील चाकूरकर यांनी त्या तरुणावर प्राथमिक उपचार करण्यासाठी स्वतःच्या गाडीमध्ये बसवून चाकूर येथील ग्रामीण रूग्णालयात घेऊन आले. त्यांनी गाडीत जखमी तरूणांस गाडीमध्ये बसवून त्याला धीर दिला. चाकूर येथील डॉक्टरांनी अपघातग्रस्त तरूणांनावर प्राथमिक उपचार केले.



प्राथमिक उपचार चाकूर येथील ग्रामीण रूग्णालयात डॉक्टरांनी केल्यानंतर त्या तरूणांस पुढील उपचारासाठी लातूर येथील शासकीय रूग्णालयात पाठवण्यात आले. त्या तरुणावर उपचार होईपर्यंत विलासराव पाटील ग्रामीण रूग्णालयात बसून होते.

विलासराव पाटील यांच्यामुळे शहरातील एका तरूणांस जीवनदान मिळाल्यामुळे चाकूर शहरात त्यांनी केलेल्या कामाचे कौतुक होत आहे.

लातुर येथील शासकीय रूग्णालयात कशीनाथ कवठाळे उपचार घेत आहेत. त्यांची प्रकृती चांगली आहे.

## सामाजिक कार्यासाठी स्वयंसेवकांनी पुढाकार घ्यावा : पोनि. डोके




**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.१३ फेब्रुवारी -**

सामाजिक कार्य करण्यासाठी स्वयंसेवकांनी पुढाकार घ्यावा, असे मत पोलीस निरीक्षक डोके यांनी रासेयो शिबिराच्या समारोपप्रसंगी व्यक्त केले. देवणी येथील कै. रसिका म हाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन आंबेगाव (ता. देवणी) येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे उपस्थित होते. प्रमुख उपस्थिती म्हणून गावच्या सरपंच मुक्ताबाई सूर्यवंशी, सचिन पाटील हे मंचावर होते.

यावेळी पोलिस निरीक्षक डोके यांनी सायबर गुन्हेगारी व त्यापासून बचाव याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता व इतर बदलत्या सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकला. आपल्या शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक कार्यात विद्यार्थ्यांनी रुची घ्यावी असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. गोपाल सोमानी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पुरुषोत्तम मोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन सहकार्यक्रम अधिकारी प्रा. धनराज बिराजदार यांनी केले.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रा. शुभम जाधव, शंकर म्हेत्रे व रासेयो स्वयंसेवक यांनी पुढाकार घेतला. यावेळी उत्कृष्ट स्वयंसेवक व स्वयंसेविकेचा सत्कार शिबिरात करण्यात आला.

### उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारासाठी प्रवेशिका पाठविण्यासाठी मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ फेब्रुवारी -**

माहिती व जनसंपर्क म हासंचालनालयाकडून उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे.

आता या स्पर्धेला २८ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या स्पर्धे साठी दि.१ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत.

## प्रशासनाच्या माध्यमातूनच समाजाची सेवा करण्याची संधी मिळते : तहसिलदार तांदळे

### ‘युवा रंग’ स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१३ फेब्रुवारी -**

शिक्षण आजच्या काळाची गरज असून प्रत्येकांनी शिक्षण घेणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी यावरच न थांबता स्पर्धा परिक्षेची तयारी करावी. प्रशासकीय सेवेच्या माध्यमातूनच समाजाची सेवा करण्याची संधी मिळते, असे प्रतिपादन तहसिलदार सौदागर तांदळे यांनी केले.

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी हासेगाव, लातूर कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, लातूर कॉलेज ऑफ नर्सिंग, राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलीटेक्निक, लातूर कॉलेज ऑफ आयटीआय यांच्या संयुक्त विद्यमानाने ‘युवा रंग २०२५’ स्नेहसंमेलनाचे उद्घाटन सौदागर तांदळे तहसीलदार लातूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. भाजपा ओबीसीचे जिल्हाध्यक्ष सुधीर पोतदार, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष मुकेश बीदादा व् यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून युवा रंग संमेलनास सुरुवात करण्यात आली. यावेळी संस्था सचिव वेताळेश्वर बावगे यांनी प्रास्ताविक केले.

या युवा रंग सांस्कृतीक महोत्सवातून विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस नृत्य, गायन, ग्रुप नृत्य, नाटक करीत या व्यासपिठावर आपल्या कलागुणांना वाव दिला. संस्थेचे अध्यक्ष भीमाशंकर बावगे, उपाध्यक्ष जयदेवी बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे संचालिका माधुरी बावगे, योगिता बावगे, प्राचार्य नंदकिशोर बावगे, डॉ. श्रीनिवास बुमरेला, डॉ. नितीन लोणीकर, संतोष मेदगे, डॉ. वीरेंद्र मेश्राम, माधव सोनहिवरे, कालिदास गोरे तसेच संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

